



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


■ अमरावती, रविवार १४ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४








# आशिया कप 2025: आज भारत-पाक सामना



- BCCIचे बहुतेक अधिकारी भारत-पाक सामना पाहायला दुबई जाणार नाहीत:
- पहलगाममध्ये मारल्या गेलेल्या शुभमच्या पत्नीने म्हटले- बहिष्कार टाका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आज रविवारी आशिया कपमध्ये भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) या स्पर्धेचे अधिकृत यजमान आहे. असे असूनही, बहुतेक बोर्ड अधिकारी सामना पाहण्यासाठी दुबईला जाणार नाहीत. तथापि, बोर्डाचे कार्यवाहक अध्यक्ष राजीव शुक्ला जाउ शकतात. शुक्ला हे आशियाई क्रिकेट परिषदेचे सदस्य आहेत. दरम्यान, सामन्याच्या एक दिवस आधी भारतात अनेक ठिकाणी या विरोधात निदर्शने केली जात आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कानपूर येथील शुभम द्विवेदी यांची पत्नी ऐष्ण्यानेही लोकांना सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आहे.

आम आदमी पक्षाने (आप) दिल्लीतील क्लब, पब आणि रेस्टारंट्सना सामना दाखवण्याविरुद्ध इशारा दिला आहे. शिवसेना यूबीटी प्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे की, जेव्हा रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, तर सामना का आयोजित केला जात आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले - पहलगाममध्ये जे घडले ते दुर्लक्षित करता येणार नाही. फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज ने पंतप्रधान मोदींना पत्र लिहून भारत-पाकिस्तान आशिया कप सामन्याचे प्रसारण थांबवण्याचे आवाहन केले आहे.



पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर नंतर दोन्ही देशांचे संघ समोरासमोर येण्याची ही पहिलीच वेळ असेल. पहलगाम हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता.

**'आप'ने म्हटले- हा देशाशी विश्वासघात आहे-** दिल्लीत झालेल्या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याचाही 'आप'ने निषेध केला. 'आप'चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल म्हणाले की, क्लब, पब आणि रेस्टारंट्सनी सामना दाखवू नये. जर असे झाले तर आम्ही निषेध करू. हा देशाशी विश्वासघात आहे. पत्रकार परिषदेत सौरभ भारद्वाज यांनी पाकिस्तानी क्रिकेटपटूंनी शेअर केलेल्या सोशल मीडिया पोस्टचा उल्लेख केला. या पोस्टमध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर एका महिलेच्या केसांना सिंदूर लावताना दाखवण्यात आले (पान २ वर)




लखनौ विद्यापीठाच्या गेट क्रमांक 3 वर विद्यार्थ्यांनी बीसीसीआयचा पुतळा जाळून भारत-पाकिस्तान सामन्याचा निषेध केला.



दिल्लीत आम आदमी पक्षाने भारत-पाकिस्तान सामन्याचा निषेध करत एका पाकिस्तानी खेळाडूचा पुतळा जाळला.

## आदित्य बुरखा घालून भारत-पाकिस्तान सामना पाहणार

### नितेश राणेंची आक्षेपार्ह टीका



आशिया कप २०२५ मध्ये उद्या म्हणजेच १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात टी-२० सामना रंगणार आहे. जगभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी भारत व पाकिस्तान यांच्यातील सामना पाहण्यासाची उत्सुकता पाहायला मिळते. मात्र जम्मू काश्मीर येथील पहलगममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध बिघडले आहेत. याच पार्श्वभूमीवर आशिया कप स्पर्धेत भारतानं (पान २ वर)

## 'देशापेक्षा व्यापार मोठा, भारत-पाक सामन्यातून कमवायचाय पैसा'



ज्या पाकिस्तानसोबत आपण युद्ध पुकारलं होते, त्याच पाकिस्तानसोबत आपण क्रिकेट मॅच खेळतोय. ऑपरेशन सिंदूरनंतर जगभरात आपले शिष्टमंडळ मोदींनी पाठवले होते. मात्र आता देशभक्तीची थट्टा नाही तर देशभक्तीचा व्यापार चालवला आहे. सीमेवर जवान शहीद होणार, भारतीय नागरिकांना हिंदू म्हणून गोळ्या घातल्या, मग देशापेक्षा, हिंदुत्वापेक्षा भाजपाला व्यापार मोठा वाटतो का? . भारत-पाकिस्तान सामन्यावर बहिष्कार टाकून आपण दहशतवादाविरोधात आहोत हे दाखवून देण्याची संधी पंतप्रधानांना आहे. आपण कुठलेही (पान २ वर)

# मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या २ वर्षांनंतर पंतप्रधानांचा दौरा



- चुराचंदपूरमधील मदत शिबिरात पोहोचले
- इम्फाळमधील हिंसाचार पीडितांना भेटले

**इंफाळ/ वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी मणिपूरच्या दौ-यावर आहेत. मे २०२३ मध्ये राज्यात हिंसाचार उसळल्यानंतर हा त्यांचा पहिलाच दौरा आहे. पंतप्रधानांनी इम्फाळ आणि चुराचंदपूरमध्ये ८,५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले.इम्फाळमधील कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले - मणिपूरला हजारो वर्षांचा समृद्ध वारसा आहे. येथे होणारी कोणतीही हिंसा दुर्दैवी आहे. हा हिंसाचार आपल्या पूर्वजांवर आणि आपल्या भावी पिढ्यांवर मोठा अन्याय आहे. आपल्याला मणिपूरला शांतता आणि विकासाच्या मार्गावर घेउन जायचे आहे.

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी हिंसाचाराच्या काळात सर्वाधिक हिंसाचारग्रस्त जिल्हा असलेल्या चुराचंदपूरमध्ये रोड शो आणि जाहीर सभा घेतली. ते म्हणाले, 'मी सर्व संघटनांना शांततेच्या मार्गावर पुढे जाण्याचे आवाहन करतो. मी वचन देतो, मी तुमच्यासोबत आहे.' पंतप्रधानांनी इम्फाळमध्ये १,२०० कोटी रुपयांच्या आणि चुराचंदपूरमध्ये ७,३०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. त्यांनी चुराचंदपूर येथील मदत शिबिरात हिंसाचारग्रस्तांना भेट दिली. इम्फाळमधील कार्यक्रमस्थळी त्यांनी हिंसाचारग्रस्तांशी संवाद साधला. पंतप्रधान आज सकाळी मिझोरमहून मणिपूरला पोहोचले. ते इम्फाळ विमानतळावर उतरले. तेथून ते रस्त्याने कुकीबहुल जिल्हा चुराचंदपूरला गेले. इम्फाळ हा मैतेईबहुल भाग आहे. २०२३ मध्ये झालेल्या हिंसाचारानंतर कुकींनी इम्फाळला आणि मैतेईबहुल चुराचंदपूरला येणे बंद केले आहे.

**या सुंदर प्रदेशावर हिंसाचाराची सावली पडलेली-**पंतप्रधान

मणिपूर हे सीमेला लागून असलेले राज्य आहे. येथे कनेक्टिव्हिटी नेहमीच एक आव्हान राहिले आहे. चांगल्या रस्त्यांच्या कमतरतेमुळे तुमची समस्या मला समजते. आम्ही यावर काम केले आहे. मणिपूरमध्ये (पान २ वर)

## सोने झाले स्वस्त

**नागपूर/प्रतिनिधी :** सोन्याचे दर गेल्या महिन्याभरापासून १ लाखापेक्षा जास्त आहेत. मागील आठवड्याभरात सोन्याचे दर सर्वाधिक वाढले आहेत.



आज जरी सोन्याचे दर काही प्रमाणात कमी झाले असले तरीही ते सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे नाहीत. आज (१३ सप्टेंबर) सोन्याचे दर १,११,१७० रुपये प्रति तोळा आहेत. सणासुदीच्या दिवसांत अनेकजण सोने खरेदी करतात. सणासुदीच्या काळात सोने खरेदी केलेले चांगले असते, असे म्हटले जाते. परंतु सध्या सोन्याने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे सोने खरेदी करावे की नाही असा प्रश्न (पान २ वर)

## कोकण, विदर्भात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठं पाउस तर कुठं उघडीप झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, गेल्या चार ते पाच दिवसांपासून राज्याच्या विविध भागात मुसळधार पाउस सुरु आहे. तर काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. यामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. शेती पिकांना देखील फटका बसला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस राज्यात कसं असेल हवामान याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

***अतिजोरदार पावसाची शक्यता-*** मान्सूनच्या सक्रियतेनंतर आजपासुन सुरु होणा-या संपूर्ण आठवड्यात म्हणजे गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर पर्यन्त महाराष्ट्रात मध्यम ते जोरदार अश्या पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातही उद्या व परवा, म्हणजे रविवार व सोमवार दि.१७ व १५सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता जाणवत आहे.पुणे व सातारा जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर म्हणजे मावळ मुळशी ताम्हिणी लोणावळा खंडाळा वेल्हे तसेच पोलादपूर महाबळेश्वर जावळी पाटण व लागतच्या परिसरात ह्या दोन दिवसात अत्याधिक पावसाची शक्यता जाणवते. १६ सप्टेंबरपासून संपूर्ण मराठवाडा, खान्देश नाशिक अहमदनगर पुणे (पान २ वर)






## मोदींच्या आईचा AI व्हिडीओ बनवणे भोवले

### दिल्ली पोलिसांची कारवाई, गुन्हा दाखल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहार विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असल्यामुळे बिहारमध्ये चांगलंच राजकारण तापलं आहे. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी यांच्या आईचा उल्लेख झाला आहे. बिहार काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडलवरून पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या मातोश्रींचा एआयवर तयार केलेला व्हिडीओ शेअर करण्यात आल्याने राजकारण तापलं आहे. या व्हिडीओमध्ये पंतप्रधान मोदींच्या स्वप्नात त्यांची आई त्यांच्यावर ओरडताना दिसत आहे. या व्हिडीओनंतर भाजपाने काँग्रेसवर टीका केली असून अशा व्हिडीओमुळे काँग्रेसने खालचा स्तर गाठल्याचं म्हटलं आहे. तसेच सदर व्हिडीओ (पान २ वर)

## *'होय, मतचोरी झाली!' मत चोरीतूनच भाजप सत्तेत;*

### काँग्रेसच्या आरोपाला नक्षल्यांचे समर्थन

**गडचिरोली :** काँग्रेसने भाजपवर केलेल्या कथित मतचोरीच्या आरोपला माओवाद्यांनीही समर्थन दिले आहे. प्रतिबंधित कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) पक्षाच्या २१ व्या स्थापना दिनानिमित्त ६ सप्टेंबरला केंद्रीय समितीने जारी केलेले १० पानी पत्रक १३ सप्टेंबरला समोर आले. यात वर्षभरात सुरक्षा यंत्रणांच्या मोहिमांमुळे चळवळीचे मोठे नुकसान झाल्याची कबुलीही दिली आहे. काँग्रेसने देशव्यापी मोहिमेद्वारे भाजपवर मत चोरीचे गंभीर आरोप करत कथित पुरावे राहुल गांधींच्या माध्यमातून सादर केले आहेत. या आरोपाला नक्षलवाद्यांनी दुजोरा देत, भाजपने मत चोरीचा प्रयोग प्रथम गुजरात विधानसभेत करून तोच देशभर राबवल्याचा दावा केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६पर्यंत माओवादाचे समूळ उच्चाटन करण्याची घोषणा केल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी आक्रमकपणे मोहिमा राबविल्या. यामुळे चळवळीची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याचे नक्षलवाद्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, सरकारने कारवाया थांबवून शांतीवार्तेचा मार्ग स्वीकारला तर आम्ही देखील सकारात्मक प्रतिसाद देउ, असे आवाहन पत्रकातून केले आहे. विकसित भारत म्हणजेच हिंदूराष्ट्र (पान २ वर)

## सचिनच्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

**टोरँटो / वृत्तसंस्था-** मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकर प्रवास करत असलेल्या एका छोटेखानी विमानाची केनियाच्या जंगलातील एका सपाट जागेवार (मातीच्या रस्त्याचा छोटा विमानतळ) आपत्कालीन लँडिंग करण्यात आली. केनियाच्या मासाई मारा जंगलात ही जागा आहे. एका मोठ्या वादळामुळे त्याचे विमान पुढे जाउ शकत नव्हते. यामुळे या विमानाला घनदाट जंगलातील या जागेवर उतरावे लागले, अशी माहिती सचिन तेंडुलकरने दिली आहे.तेंडुलकरने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला, यात तो ते छोटेखानी विमान दाखवत आहे. मातीच्या रस्त्यावर हे विमान उतरविण्यात आले होते. वादळी वारा आणि पाउस (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# पंतप्रधान मोदी यांच्या मातोश्रींच्या अपमानाविरोधात भाजपचे निषेध आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींवर काँग्रेस–राजद पक्षाच्या व्यासपीठावरून करण्यात आलेल्या अमानुष शिवीगाळीचा, तसेच प्रधानमंत्री यांच्या आई वरून विविध चित्र रेखाटन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या माध्यमातून विविध व्हिडिओ तयार करून प्रधानमंत्री मोदीजींची बदनामी आणि त्यांच्या स्वर्गवासी आईचा अपमान केला जात आहे. याच सर्व विषयाचा तीव्र निषेध म्हणून आज भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा महिला मोर्चाच्या वतीने राजकमल चौक, अमरावती येथे आंदोलन करण्यात आले. भाजपा महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांच्या सूचनेनुसार व भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महिला मोर्चा अध्यक्ष सुधा तिवारी यांच्या नेतृत्वाखाली सदर आंदोलन पार पडले, या निषेध आंदोलनात भाजपा तथा महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाल्या झाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मातोश्री यांचा हा घोर अपमान आहे हा केवळ पंतप्रधानांचा नव्हे तर देशातील प्रत्येक आई, बहिण आणि मुलीचा अपमान असल्याचे भाजपा पदाधिकाऱ्यांनी सांगितले,

मात्र भारतीय जनता पार्टी किंवा भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा अशी कृत्य कधीही सहन करणार



नाही हा संदेश आजच्या आंदोलनाच्या माध्यमातून देण्यात आला, यावेळी अतिशय तीव्रते आंदोलन करून काँग्रेस पार्टी आणि त्यांच्या मित्र पक्षाच्या विरोधामध्ये जोरदार नारबाजी करण्यात आली .यावेळी भाजपा प्रदेश सचिव जयंत डेहनकर, प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, भाजपा अमरावती शहर जिल्हा सरचिटणीस बादल कुलकर्णी, ललित समदूरकर, राधा कुरील, ॲड.प्रशांत देशपांडे गंगा खारकर, सुरेखा लुंगारे, लता देशमुख, महिला आघाडी सरचिटणीस शितल वाघमारे, जया माहोरे, सविता भागवत, जयश्री कुबडे, मेघवानी, भारती गुहे,सुरेखा लुंगारे,संजय तीरथकर,प्रणीत सोनी,मिलिंद बांबल,अजय सारस्कर,चंदू बोमरे,हरिहर गिलोरकर,रविकांत कोल्हे, लखनराज,अशोक नागवानी,राजू राजदेव,श्रीचंद तेजवानी,राजू कुरील, विविध चुटके,आशीष अतकरे,दीपक पोहेकर,नीलेश काजे,प्रसाद जोशी,गजानन देशमुख,महिला मोर्चा सरचिटनीस सविता भागवत,शीतल वाघमारे,जयश्री कुबड़े,वनमाला सोनोने,भारती गुहे,संगीता बुरंगे,नूतन भुजाड़े,ज्योति वैद्य,रेखा भूतड़ा,स्वाति कुलकर्णी,प्रतिभा तिडके,पद्मजा कौंडण्य,अनीता राज,मांला हरवानी,रेखा शेंद्र, बरखा भोज्जे ,दीपा बेलबागकर,मीणा पवार,वंदना हरने,वंदना मढ़घे कुसुम साहू,पंचफूला चव्हाण तृप्ति वाठ,अनीता तीखीले,सारिका तिवारी,प्रीति दुबे,आशा चावला,डॉ.अलका राजपुरिया,अलका सदार, रीता मोकलकर,लविना हर्षे,नलिनी चिखलकर,लीना जावरे,माया लकड़े,अंजली पाठक,किरण मूंधड़ा,कल्याणी मुदलियार,मीणा उपाध्याय,भारती शर्मा,इत्यादि भाजपा तथा महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवणी गावाजवळ गोवंश तस्करी उघडकीस

**■ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई,तिघांना अटक**
**■ १५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध गोवंश वाहतुकीवर ग्रामीण पोलिसांनी शिवणी गावाजवळ कारवाई केली. या मोहिमेत तीन तस्करांना जेरबंद करत तब्बल ३३ जनावरे आणि दहा चाकी ट्रक असा एकूण १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १३ जानेवारी रोजी पहाटे स्थानिक गुन्हे शाखेच्या गोवंश पथकाने केली. पो.उप.नि. विशाल रोकडे हे सहकाऱ्यांसह नांदगाव खंडेश्वर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना समृद्धी टोलनाक्याजवळून शिवणीकडे जाणाऱ्या एका ट्रकमध्ये जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी शिवणी गावाजवळ नाकाबंदी केली असता, संशयित ट्रक थांबविण्याऐवजी वेगाने पळाला. पण पोलिसांनी थोड्याच पाठलागानंतर तो ट्रक थांबवत आरोपींना ताब्यात घेतले. अटक आरोपींमध्ये झनकलाल हरदवसिंग मारकाम (वय ३६, रा. नागपूर), गुलाम रसूल मोहम्मद अली नदी (वय ३९, रा. नागपूर) आणि मोहम्मद अली विकाधत अली (वय ३२, रा. कामठी, नागपूर) यांचा समावेश आहे. ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये ३३ जनावरे कोंबून



नेल्याचे उघड झाले. जनावरांची अंदाजे किंमत ५ लाख रुपये असून ट्रकासह मिळून १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त जनावरे व ट्रक पुढील कार्यवाहीसाठी नांदगाव खंडेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विशाल रोकडे, तसेच अंमलदार संतोष तेलंग, दिपक पाल, राजेश कासोटे, दिपक पाटील, मारोती वैद्य व चालक किशोर सुने यांनी केली.

# सामरा नगर परीसर बेनोडामध्ये समाविष्ट करण्यावर आक्षेप

**■ नागरीकांनी व्यक्त केला प्रचंड रोष**
**■ महापालिका प्रभाग रचना वादात**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मनपा निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रभाग रचनेत मागील वर्षी प्रमाणे रचना करण्यात आली आहे. त्यावर परिसरातील नागरीकांनी आक्षेप घेतला आहे. या संदर्भात नागरिकांनी निवेदनाच्या माध्यमातून आपली मागणी ठेवली आहे. त्यानुसार प्रभागाच्या सीमे लगत असलेले मेहरबाबा कॉलोनी, बोंडे लेआऊट, गोदावरी कॉलोनी, गणपती नगर,विदर्भ प्रीमियम,खारकर ले आऊट,ठाकुर लेआऊट,उषा कॉलनी, छत्रपती नगर, जानकीबाई राठी नगर व इत्यादी परिसर हा भौगोलिक दृष्ट्या व नैसर्गिक सीमे नुसार प्रभाग १० ला जोडण्यात अतिशय सोपा होता. तसे न करता १० ते १५ कॉलोनी ची तोडफोड करून प्रभाग २० सुतगिरणी व २१ जुनिवस्तीमध्ये जोडण्यात आला. प्रभाग २१ बडनेरा ला आहे. यात विदर्भ प्रिमियर व सामरा नगग अशा २ कॉलन्या जोडल्या आहे. या कॉलन्यांपासुन प्रभाग २१ जुनिवस्ती हे ५ किलोमीटर दूर आहे आणि प्रभाग २० सुतगिरणी हा १ किलोमीटर दूर आहे आणि प्रभाग १० बेनोडा लागून आहे. या ठिकाणी मागील १० वर्षा पासून नगरसेवक फिरकले सुद्धा नाही. त्याच प्रमाणे नागरिकांना आपल्या कामाकरीता मनपा झोन ३ दस्तुर नगर जवळ असून सुद्धा बडनेरा झोन ४ मध्ये जावे लागणार आहे. त्यामुळे मेहरबाबा कॉलनी ते सामरा नगर या मधील मेहरबाबा कॉलोनी, बोंडे लेआऊट, गोदावरी कॉलोनी, गणपती नगर,विदर्भ प्रीमियम,खारकर ले आऊट,ठाकुर लेआऊट,उषा कॉलनी छत्रपती नगर जानकीबाई राठी नगर हा परिसर प्रभाग १० मध्ये समाविष्ट करण्यात यावा याकरीता निवडणुक अधिकारी यांच्याकडे प्रचंड रोष व्यक्त करुन निवेदन देऊन आक्षेप नोंदविण्यात आला. यामध्ये विजय पवार ,अतुल देशमुख,प्रशांत कवाने, रविंद्र मनोहर जोशी, संजय गोविंदराव दुपार्ते , सागर तिवारी या नागरीकांनी आपला आक्षेप नोंदविलेला आहे.

पान १ व १० वरून

## आशिया कप 2025:

होते, जे भारतीय तिरंग्याने रंगवले होते. दुसरीकडे, जम्मू आणि काश्मीर विद्यार्थी संघटनेने शनिवारी एक सल्लागार जारी केला. यामध्ये काश्मिरी विद्यार्थ्यांना खेळाडू भावनेने सामना पाहण्याचे आणि आक्षेपार्ह सोशल मीडिया पोस्ट टाळण्याचे आवाहन करण्यात आले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार म्हणाले, 'भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याबाबतचा निर्णय योग्य व्यासपीठावर घेण्यात आला आहे. देशाची लोकसंख्या १४० कोटी आहे. इतक्या मोठ्या देशात क्रिकेट सामन्याबाबत मतभेद असणे स्वाभाविक आहे.' पहलगाम दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या कानपूर येथील शुभम द्विवेदी यांच्या पत्नी ऐष्ण्यानेही लोकांना सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आहे. तिने वृत्तसंस्था एएनआयला सांगितले - माझ्या डोळ्यासमोर माझ्या पतीला गोळ्या घालण्यात आल्या. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ लोक मारले गेले. ऑपरेशन सिंदूरमध्ये अनेक सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. तरीही, सामना आयोजित केला जात आहे. मला वाटतं बीसीसीआयमध्ये भावना नाहीत. या सर्व लोकांच्या हौतात्म्याची तुमच्यासाठी काहीच किंमत नाही. कदाचित त्यांच्या कुटुंबातील कोणीही गेले नसल्यामुळे.

## आदित्य बुरखा घालून भारत-

पाकिस्तानशी क्रिकेट सामना खेळू नये अशी मागणी राजकीय वर्तुळातून होत आहे.यादरम्यान राज्यात शिवसेना (ठाकरे गट) यांच्याकडून या सामन्याला विरोध होताना दिसत आहे. उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडून या समान्याच्या दिवशी सरकारविरोधात आंदोलन केले जाणार आहे. यादरम्यान भाजपाचे नेते आणि राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी विरोधकांवर आक्षेपार्ह भाषेत टीका केली आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यावरू न आदित्य ठाकरे यांनी सरकार तसेच बीसीसीआयवर टीका केली होती. यानंतर आदित्य ठाकरे हे भारत पाकिस्तान सामना लपून पाहतील असे नितेश राणे म्हणाले आहेत. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर आक्षेपार्ह टीका देखील केली. पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना ते म्हणाले की, अरे हेच आदित्य ठाकरे लपून, बुरखा घालून भारत-पाकिस्तान सामना पाहणार आणि त्याचा फायदा असा आहे की आवाजाचीही त्यांना मदत होईल मै औरत हूं (महिलेच्या आवाजाची नक्कल करत) बुरखा घातला, असा आवाज येईल कोण म्हणेल ते आदित्य ठाकरे आहेत, असेही मंत्री नितेश राणे म्हणाले.

***आदित्य ठाकरे नेमकं काय म्हणाले होते?-*** काही दिवसांपूर्वी आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना भारत-पाकिस्तान सामन्याला विरोध दर्शवला होता. ज्या पाकिस्तानं आपल्या देशावर असंख्य हल्ले केले आहेत. दहशतवाद पसरवला आहे. पहलगाममध्ये ज्या पाकिस्तानने खूप सारे सिंदूर पुसून टाकले, त्या पाकिस्तानशी खेळण्यासाठी बीसीसीआय इतके उत्सुक का झाले आहे? हे पैशांसाठी आहे का? हे चॅनलचा फायदा, जाहिरातींमधून फायदा की खेळाडूंना मिळणा-या मानधनासाठी आहे? एकीकडे पाकिस्तानं ह?कीच्या आशिया चषकावर बहिष्कार टाकला कारण ते सामने भारतात होते, तर मग बीसीसीआय असा बहिष्कार का टाकू शकत नाही? असे आदित्य ठाकरे म्हणाले होते.

## 'देशापेक्षा व्यापार मोठा,

संबंध पाकिस्तानसोबत ठेवणार नाही हे जाहीर करावे अशी मागणी करत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजपावर हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर पत्रकार परिषद घेतली. त्यात ते म्हणाले की, शिवसेनेच्या वतीने भारत-पाकिस्तान सामन्याचा निषेध करत आहोत. पहलगाम हल्ल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर हाती घेतले. आता पाकिस्तानसोबत मॅच खेळली जाते. आम्ही याचा निषेध म्हणून राज्यभर महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून घराघरातून सिंदूर जमा करून पंतप्रधान कार्यालयाला पाठवले जातील. हर घर से सिंदूर अभियान आम्ही राबवतोय. अजूनही वेळ गेली नाही. ही मॅच होणार नाही हे मोदींनी दमदारपणे सांगायला हवे. पहलगाम हल्ल्यात महिलांचे सौभाग्य उजाडले त्यानंतर देशभक्तीच्या नावाखाली भाजपा दांडियाचं आयोजन करत आहे. भारत-पाकिस्तान मॅचला फारसा प्रतिसाद मिळत नाही. जय शाह उद्या मॅच पाहायला गेले, त्यांना देशद्रोही ठरवणार का असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तसेच आपल्या देशाला कणखर पंतप्रधान लाभेल म्हणून आम्ही पाठिंबा दिला होता. मात्र कणा हिन सरकार असल्याने पाकव्याप्त काश्मीर आपल्या देशात हे पंतप्रधान आणू शकतील यावर मला आता वि□ास नाही. जावेद मियादाँद मातोश्रीवर आला होता, त्याला ठणकावून भारत-पाकिस्तान मॅच होउ देणार नाही असं बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते. मात्र यांचे नेते न सांगता नवाज शरीफांच्या वाढदिवशी केक खायला गेले होते. त्यामुळे भाजपाने आम्हाला देशभक्ती शिकवू नये. सगळीकडे व्यापार सुरू ठेवला आहे. क्रिकेट सामन्यातून मिळणारे पैसे देशापेक्षा मोठे आहे का असंही उद्धव ठाकरेंनी भाजपाला विचारले.

दरम्यान, भाजपाने देशभक्तीचा व्यापार सुरू केला आहे. पहलगाम हल्ल्याला ३-४ महिने झाले असतील. त्यात आपले भारतीय नागरिक ज्यारितीने मारले गेले. बहिणीचं कुंकू पुसले गेले. आजही ही जखम भरली नाही. पाकिस्तान आपल्या देशात दहशतवाद पसरवतो, हल्ले करतो. त्याविरोधात भारताने ऑपरेशन सिंदूर हाती घेतले. आपल्या भारतीय सैन्याने कठोर उत्तर पाकला दिले. आपले सैन्य पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेईल असं वाटत होते. परंतु आपल्या सैन्याला थांबवण्यात आले. हे युद्ध कुणी थांबवले? युद्ध थांबवणारे कोण आहेत? खून और पानी साथ मै नही बह सकता, मग क्रिकेट आणि खून एकत्र कसे होउ शकतात. यांना फक्त क्रिकेट मॅचमधून पैसा कमवायचा आहे असा आरोप उद्धव ठाकरे यांनी भाजपावर केला आहे.

## मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या 2 वर्षानंतर

रेल्वे मार्ग अनेक पटीने वाढवले. शहरांसह गावांना रस्ते देण्यावर भर देण्यात आला. मणिपूरची भूमी ही आशा आणि आकांक्षांची भूमी आहे. दुर्दैवाने, या सुंदर प्रदेशावर हिंसाचाराची सावली पडली होती. विकास कुठेही रु जण्यासाठी शांतता आवश्यक आहे. गेल्या ११ वर्षांत, ईशान्येकडील अनेक संघर्ष आणि वाद सोडवले गेले आहेत. लोकांनी शांततेचा मार्ग निवडला आहे आणि विकासाला प्राधान्य दिले आहे. अलीकडेच डोंगर आणि द-यांमधील विविध गटांशी करार करण्यात आले आहेत.शांतता प्रस्थापित करण्यासाठी काम केले जात आहे, असे मोदी म्हणाले. चुराचांदपूरमध्ये मेडिकल कॉलेज सुरु केले आहे. येथे सुमारे ६०,००० घरे आधीच बांधली गेली आहेत, ज्यामुळे हजारो कुटुंबांना सन्मानाचे आणि सुरक्षिततेचे जीवन मिळाले आहे. ७-८ वर्षांपूर्वीपर्यंत, मणिपूरमध्ये फक्त २५-३० हजार घरांमध्ये पाईपद्वारे पाणीपुरवठा होता. आज, येथील ३.५ लाखांहून अधिक घरांमध्ये नळाच्या पाण्याची सुविधा आहे, असे मोदी म्हणाले.

## सोने झाले स्वस्त

सर्वसामान्यांना पडलेला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सोन्याचे दर वाढत आहेत. दरम्यान, आज सोन्याचे दर कमी झाले आहेत. प्रति तोळ्यामागे ११० रुपयांनी घसरण झाली आहे. १० ग्रॅम सोन्याचे दर १,११,१७० रुपये आहेत. दर ८ ग्रॅम सोन्याचा भाव ८८,९३६ रुपये आहे. १० तोळ्यांमागे सोन्याच्या दरात १,१०० रुपयांची घट झाली आहे. हे दर ११,११,७०० रुपये झाले आहेत.

## कोकण, विदर्भात पावसाचा

सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अश्या १८ जिल्ह्यात पावसाचा जोर (तीव्रता) पूर्णपणे नव्हे परंतु काहीसा कमी जाणवेल.

कोकण, विदर्भातील पावसाचे सातत्य-मुंबईसह संपूर्ण कोकण व विदर्भ अशा १८ जिल्ह्यात मात्र जोरदार पावसाचे सातत्य सध्या तरी आजपासुन पुढील १० दिवस म्हणजे २२ सप्टेंबर पर्यन्त टिकून राहण्याची शक्यता जाणवते. वेध परतीच्या पावसाचे -परतीच्या पावसाचे वेध जरी लागले असले तरी पावसाच्या इतर प्रणाल्यांचे अस्तित्व पाहता तो १५ सप्टेंबरच्या आसपास किंवा त्यानंतर परत फिरण्याची शक्यता आज जाणवते. वातावरणीय निरीक्षणा नंतरच त्याच्या तारखे संबंधी घोषणा होउ शकते. आज वाशिम जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळं जिल्ह्यात अनेक नदी नाल्यांना पूर आल्याचं चित्र होत आहे. मानोरा तालुक्यातील अरणावती नदीला मुसळधार पावसामुळं पूर आला आहे. नदीवरील पुलावरु न पाणी वाहू लागले आहे. त्यामुळं कोलार ते हिवरा, पारवा हा मार्ग बंद झाल्यानं वाहनधारकांसह शेतकरी अडचणींचा सामना करावा लागला. तसेच नदीकाठच्या शेतांमध्ये पाणी घुसल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच चिखलागढ नदीला पूर आल्याने जवळपास ४ ते ५ गावाचा सम्पर्क तुटल्याच चित्र आहे.

## मोदींच्या आईचा AI व्हिडीओ

कुणाचाही अनादर करण्यासाठी तयार केलेला नसल्याचं काँग्रेसने म्हटलं.

या AI व्हिडीओ बनवल्याच्या प्रकरणी आता काँग्रेसविरु द्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पंतप्रधान मोदींच्या आईचा एआय व्हिडीओ बनवून बिहार काँग्रेस युनिटने त्यांच्या एक्स हँडलवर पोस्ट केल्याप्रकरणी भाजपा कार्यकर्त्याच्या तक्रारीवरू न दिल्ली पोलिसांनी शनिवारी एफआयआर नोंदवल्याची माहिती एका अधिका-याने दिली आहे. वृत्तानुसार, भाजपाचे पदाधिकारी संकेत गुप्ता यांनी शुक्रवारी नार्थ अव्हेन्यू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत आरोप केला की, या व्हिडिओने पंतप्रधानांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. कायदा, नैतिकता आणि महिलांच्या प्रतिष्ठेचं उल्लंघन केलं आहे. ही क्लिप भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, बिहार युनिटच्या अधिकृत एक्स हँडलवर १० सप्टेंबर रोजी पोस्ट करण्यात आली होती, असं तक्रारीत म्हटलं.

***व्हिडीओमध्ये काय आहे?-*** बिहार काँग्रेसने १० सप्टेंबर रोजी ३६ सेकंदाचा एआयने तयार केलेला व्हिडीओ शेअर केला होता. ज्यात पंतप्रधान मोदी म्हणतात, आजची मतदान चोरी झाली. आता झोपायला जातो. यानंतर पंतप्रधान मोदींच्या स्वप्नात त्यांच्या मातोश्री दाखविल्या गेल्या. त्या म्हणतात, तू नोटबंदीनंतर मला रांगेत उभे केलेस. माझे पाय धुण्याचे रिल बनवलेस आणि आता बिहारमध्ये माझ्या नावावर राजकारण करत आहेस. तू माझ्या अवमानाचे बॅनर लावत आहेस, पोस्टर छापत आहेस. तू पुन्हा बिहारमध्ये नाटक करत आहेस. राजकारणाच्या नावावर किती खाली पडशील. यानंतर पंतप्रधान मोदी झोपेतून दचकून उठताना दाखवले गेले आहे.

## 'होय, मतचोरी झाली!' मत

हा सत्ता पक्षाचा गुप्त अजेंडा असल्याचा आरोप देखील नक्षलवाद्यांनी केला आहे. प्रतिबंधित सीपीआयच्या (माओवादी) २१ व्या स्थापना दिन२१ ते २७ सप्टेंबर दरम्यान सर्वत्र उत्साहात साजरा करावा, असे आवाहन देखील पत्रकातून करण्यात आले आहे.

**वर्षभरात ३६६ नक्षल ठार-** नक्षल चळवळीचा संस्थापक चारू मजुमदार याच्या मृत्यूनंतर पाच दशकांत सर्वाधिक नुकसान गेल्या वर्षभरात झाल्याची कबुली नक्षलवाद्यांनी दिली आहे. विविध चकमकीत ३६६ नक्षलवादी ठार झाल्याचे पत्रकात म्हटले आहे. महासचिव बसवाराजू, चलपती सह चार केंद्रीय समिती सदस्यांचा मृत्यू, १७ महत्त्वाचे नेते ठार झाल्याने चळवळीचे नुकसान झाल्याचे नमूद आहे.

**गृहमंत्र्यांच्या घोषणेला दिले आव्हान-** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपवू, अशी घोषणा केली आहे. मात्र, नक्षलवाद्यांनी हे लक्ष्य आम्ही खोडून काढू, अशा शब्दांत आव्हान दिले आहे.

## सचिनच्या विमानाचे इमर्जन्सी

असल्याने हे विमान पुढे उड्डाण करू शकत नाही. यामुळे त्याला नेण्यासाठी जीप येत असल्याचे तो म्हणाला. परंतू, जर या जीप नाही आल्या तर रात्री या जंगलात थांबावे लागणार असल्याचे त्याने सांगितले. तसेच हा ही एक अनुभव एन्जाय करण्यासारखा आहे, असेही तो म्हणाला.

मसाई मारावरू न उड्डाण करत असताना त्याला दुरू न एक भयानक वादळ दिसले. खराब हवामानामुळे पायलटला दोनदा लँडिंग रद्द करावे लागले, ज्यामुळे विमानात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. रनवे मोकळा झाल्यानंतर विमान दुस-या बाजूला लँड करण्यात आल्याचे सचिनने म्हटले.

## यवतमाळ येथे ३३५ कोटींच्या

देण्यात येणार आहे, असे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी सांगितले. आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदी कर्मयोगी उपयुक्त ठरेल.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या व्यापक दृष्टीमुळे महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी होत आहे, असे पालकमंत्री राठोड यांनी सांगितले.

**विविध विकासकामांचा शुभारंभ-** मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे आज एकूण ३३५ कोटी रु.च्या विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन तसेच उपक्रमांचा शुभारंभ झाला. त्यात आदिवासी विकास विभागाच्या पाच वसतिगृहे व इतर कामे मिळून ५१ कोटी रुपये किंमतीच्या कामांचा समावेश आहे. तसेच बांधकाम विभागाची ६७ कोटींची कामे, मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजनेत ११ सौर ऊर्जा प्रकल्प व इतर कामांसाठी १५८ कोटी व इतर विविध विभागांच्या ५९ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे मिशन कॉम्पिटिटिव्ह एक्सलन्स, रोड मेंटेनन्स डिजीटल प्लॅटफॉर्म, ई-मित्र चॅटबॉट, मिशन उभारी, समग्र डॅशबोर्ड, प्रोजेक्ट सॅन्ड मॅप, शासन आपल्या मोबाईलवर, सी आर एफ ॲन्ड वार रुप डॅशबोर्ड यासह इतर विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला. यातील ई-मित्र चॅटबॉटद्वारे ३४ योजनांची माहिती केवळ २ क्लिकवर नागरिकांना उपलब्ध होणार आहे. 'उभारी' ॲपद्वारे गेल्या पाच वर्षातील ७७० आत्महत्याग्रस्त कुटुंबांचा ऑनलाईन सर्वे करण्यात आला. या कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी उभारी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. जिल्हा डॅश बोर्डच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा रिअल टाइम आढावा आणि मॉनिटरिंग करणे सोपे होणार असून कमी कालावधीत योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे.धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी १७ विभागांच्या २५ योजना-उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याला जोडून आदि कर्मयोगी अभियान हे विकेंद्रित आदिवासी नेतृत्व व आदर्श प्रशासन निर्माण करण्यासाठीची चळवळ आहे. जिल्ह्यातील ३६६ गावांचा त्यात समावेश असून, आदिवासी बांधवांना त्याचा लाभ होईल. प्रधानमंत्री किसान सन्मान व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून २ लाख ९४ हजार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे. जिल्ह्यात अनुकंपा तत्वावर २७ उमेदवारांना सेवेत घेण्यात आले. त्यातील ४ उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. विविध विभागांतर्फे योजनांची माहिती देणारे कक्षही उभारण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## भरधाव ट्रक खुल्या

झाडावर जाऊन आदळला.या भीषण अपघातात चालक शिवसेवक आदिवासी (वय ५०, रा. रिवा, मध्यप्रदेश), मुनिराम (रा. गढवा शंकरगड, अलाहाबाद, उत्तरप्रदेश) व रामवती वर्मा (वय ५०, रा. अंगावरी, उत्तरप्रदेश) हे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिस स्टेशनचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. पुढील तपास नांदगाव पेठ पोलिस करत आहेत.

## चेन स्नॅचिंगमधील सराईत

हद्दीतही असाच गुन्हा केला होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छांगानी नगर येथून जावरेला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने दोन्ही गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्याकडून हिरो होंडा स्प्लेंडर, हेल्मेट आणि सोन्याचे मणी असा एकूण ७८,५०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जितेंद्र जावरे हा पोलिसांच्या यादीतील सराईत गुन्हेगार असून, अमरावती ग्रामीण, अमरावती शहर व यवतमाळ जिल्ह्यात त्याच्याविरुद्ध तब्बल १६ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे आणि चांदूर रेल्वे ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मूलचंद भांबुरकर, विना पंडे, नंदलाल लिगोंट, अमोल देशमुख, सचिन मिश्रा, मंगेश लकडे, शिवाजी घुगे, प्रशांत ढोके, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, वृषाली वाळसे, हवालदार हर्षद घुसे, प्रकाश बिरोले यांनी केली.

## केळीने भरलेला ट्रक

भरून अकोट-अंजनगाव मार्गे मध्यप्रदेश कडे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक थेट डिव्हायडरवर चढल्याने पलटी झाला. ट्रक मध्ये भरलेली केळीचे कॅरेट रस्त्यावर विखूरल्याने काही वेळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली व जखमींना रुग्णालयात हलविले. अपघातात गंभीर जखमी देवरी येथील राहणारा आहे. त्याला उपजिल्हा रुग्णालयात तर ट्रकचालक आणि वाहक किरकोळ जखमी झाल्याने त्यांना प्राथमिक उपचारानंतर अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

## अप्पर वर्धा धरण

मध्ये वाढ होण्याची शक्यता बघता व अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता धरणामध्ये येणाऱ्या येव्यानुसार जलाशय प्रचलन सूची नुसार पुन्हा विसर्ग वर्धा नदी पात्रात सोडण्याची वेळ आली आहे. २ सप्टेंबर रोजी पाण्याच्या साठवण्याची टक्केवारी ९६.२७ एवढी होती. अप्पर वर्धा धरणाची निर्धारित पाण्याची पातळी ३४२.५० मिलिमीटर एवढी ठेवण्यात आली आहे. सध्या ही पातळी ३४२.३७ मिलिमीटर झाली आहे. त्यामुळे जवळपास बांध ९७.८७ टक्के भरलेला आहे. यामुळे धरणाचे १३ ते १३ दरवाजे उघडण्यात आले आहे.

## आदिवासी महिलेची रस्त्यावरच

असून बाळाचे वजन २ किलो ४०० ग्रॅम आहे. स्थानिक नागरिकांनी धारणी वैरागड रस्त्यावरील खोल खड्ड्यामुळे प्रवास धोकादायक असल्याचे सांगितले आहे. गरोधर महिला व पादचारी नागरिकांच्यासाठी हा रस्ता जीव घेणा ठरू शकतो असे नागरिकांचे म्हणणे आहे. कोट्यावधी रुपये खर्चूनही रस्त्याची दुरुस्ती होत नाही. फक्त कागदोपत्रीच काम प्रशासन दाखवते का, असा प्रश्न नागरिकांनी केला आहे.

## घराचे कुलुप तोडून

३२,००० व २४००० असा एकुण ७१००० चोरट्याने लंपास केलेला आढळला तसेच घराचे मागच्या राहत असलेल्या इरफान खान इनायत खान यांचे घराचे दरवाजाचे कुलुप तोडुन घरात चालवत असलेल्या किराणा दुकानातुनही चोरट्यांनी गल्ल्यातील २५०० रुपयाची रोख रक्कम चोरुन नेली. अ. खालीक अ. जलील यांनी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन येथे चोरी बाबत तक्रार दाखल केली असुन पोलीसांनी अज्ञात चोरट्या विरोधात भा.न्या.स. ३०५,३३१(५) प्रमाने गुन्हे दाखल केले आहेत.

## चांदूर रेल्वे तालुक्यात

तासांसाठी वाहतुकीस बंद होता. वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागला. सदर नाल्याला कठडे नसल्याने नाला आणि रस्ता अक्षरशः एकसमान दिसत होते. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केल्या जात होती. या पुलावर तातडीने संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली. दरम्यान, या नाल्या जवळील रेल्वे ब्रिज खालील रस्त्यावरही पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचले. चारचाकी व दुचाकी वाहन धारकांना येथे मार्गक्रमण करताना मोठा त्रास सहन करावा लागला. संपूर्ण तालुक्यात झालेल्या या जोरदार पावसामुळे शेतशिवारातही पाणी साचले असून पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकरीवर्ग चिंताग्रस्त झाला आहे.

## जावरा फत्तेपुर गावात

गोठ्यात गेले असता त्यांना ही बाब निदर्शनास आली. याबाबत त्यांनी वनविभागाला माहिती दिली असता त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. बिबट्याने केलेल्या शिकारीत वासराचा जीव गेला असून त्याची नुकसान भरपाई मिळावी तसेच गावकऱ्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने बिबट्याचा बंदोबस्त करावा,अशी दुहेरी मागणी पशुपालकांकडून होत आहे.

घटनेची माहिती मिळताच आम्ही घटनास्थळी भेट दिली.त्याठिकाणी बिबट्याचे ठसे आढळून आले.वासराची शिकार केलेली दिसून आली असून घटनेचा पंचनामा केला आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

**-एस डब्ल्यू घोरमाडे,** वनपाल,तिवसा वर्तुळ

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ रविवार, १४ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून गावात विकासपर्व

## स्पर्धेतुन मिळेल लोकचळवळीला गती: त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेला बळकटी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानातून गावागावांमध्ये विकासाची स्पर्धा वाढुन लोकचळळीला बळकटी मिळणार आहे. भारत कृषीप्रधान आहे. गाव त्याचे केंद्रबिंदुआहे.**




गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढयांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्वाचा आहे. त्यासाठी ग्रामविकास विभागाने या अभियानाच्या माध्यमातून राज्यात मोठी लोक चळवळ उभी करण्यासाठी प्रयत्न केला आहे. याबाबत वाशिम येथे जि प च्या पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंदरे यांच्या पुढाकाराने नुकतेच जिल्हा स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

गावात स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, रस्ते इत्यादी मुलभूत सुविधा उभारण्यासाठी आता गावांना कोट्यावधीचे बक्षिस मिळणार आहे. यासाठी राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येणार आहे. याची सुरुवात दि. १७ सप्टेंबर रोजी होणार आहे. लोकसहभाग व श्रमदानातून अभियान राबविण्यासाठी २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी २४५.२० कोटी पुरस्कांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी आहे. यशस्वी १९०२ स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. यामध्ये ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यां संस्थांचा समावेश आहे. गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल. या अभियानाचा कालावधी दि. १७ सप्टेंबर ते दि. ३१ डिसेंबर २०२५ असुन एकुण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. यामध्ये पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमिकरण, रोजगार, पर्यावरण, करवसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईत, प्रत्येक ग्रामपंचायतीला दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागणार आहे.

**पुरस्कारांची रचना (प्रत्येकी प्रथम तीन ग्रामपंचायती यानुसार)**

- राज्यस्तर- ५ कोटी, ३ कोटी, २ कोटी रुपये
- विभागस्तर- १ कोटी ८० लाख ६० लाख रुपये
- जिल्हास्तर-५० लाख, ३० लाख, २० लाख रुपये
- तालुकास्तर-१५ लाख, १२ लाख, ८ लाख रुपये
- विशेष पुरस्कार- प्रत्येक तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये

**पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेसाठी**

- राज्यस्तर-२ कोटी, १.५ कोटी, १.२५ कोटी रुपये
- विभागस्तर १ कोटी, ७५ लाख, ६० लाख रुपये
- अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यातील ३ जिल्हा परिषदांना ५ कोटी, ३ कोटी, २ कोटी रुपये

**अभियानाचे उद्दिष्ट :** गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारित आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी ग्रामविकास विभाग करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत परे, महिलांना बचत गटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुकुटपालन यांना चालना देऊन शेतक-यांचे उत्पत्र वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची प्रशिक्षणे घेऊन तसेच ग्रामसभेच्या माध्यमातुन तयारी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व गावांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत तालुकास्तरावर निर्देश देण्यात आले आहेत. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मोडिया, यशोगाथा, चित्रफित आणि इतर साधनांचा उपयोग होईल. जिल्ह्यात या अभियानातून लोकचळवळ उभी करून जास्तीत जास्त गावांना पुरस्कार मिळुन त्यामाध्यतुन गावाचा विकास व्हावा या बाबीवर भर देण्यात येईल.'

**- अर्पित चौहान,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

# करडा येथील तलाव धोकादायक स्थितीत, गावकऱ्यांची पुर्नवसनाची मागणी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, मुख्यमंत्र्यासहित मंत्री महोदयाची घेणार भेट

करडा येथील तलाव धोकादायक स्थितीत असून पाण्याचा प्रवाह हा शंभर टक्के गावाकडे असून मोठ्या प्रमाणात जीवित्वाची हानी होण्याची शक्यता असल्याने गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी करणार गावकरी मंडळींनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली.

करडा येथील तलावाची परिस्थिती अतिशय धोकादायक बनली असून तलावाची निर्मिती ही तीस वर्षांपूर्वी झालेली आहे भिंतीची उंची जीर्ण होत ही मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे. मागील तीस वर्षात भिंतीवरती मोठ्या प्रमाणात झाडे उगवली असून त्याचे रूपांतर आता मोठ्या वृक्षात झाले आहे त्याची खोडं आणि मूळ ही एवढी खोलवर रुजलेली आहेत की त्यामुळे संरक्षण भिंती ह्या खिळाखीळ झाल्या आहेत. सोबतच जमीन पोखरणारे सायाळ, खेकडे या मुळे मोठ्या प्रमाणात जवळपास वीस वीस फुटाचे नळे पडले असून त्याद्वारे पाण्याचा विसर्ग मागील पाच वर्षापासून सुरू आहे. यासंदर्भात वेळोवेळी वृत्तपत्रात बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या. काही वेळा थातूरमातूर वृक्ष छाटणी केले गेले परंतु खोलवर रुजलेली मूळ आणि खोडं यामुळे संरक्षण भिंत ही मोठ्या प्रमाणात पोखरल्या गेल्या असून त्यामधून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तसेच मागील तीस वर्षापासून दरवर्षी तलावातून माती आणि इतर उपसा झाल्याने पाण्याची क्षमता ही तीन पटीने अधिक वाढलेली असून तलावामध्ये मर्यादेपेक्षा अधिक पाण्याचा साठा वाढला आहे. ही परिस्थिती बघता आणि संरक्षण भिंतीपासून गाव हे अवघ्या २०० मीटरच्या आतच असून तलावाच्या संरक्षण भिंतीची वाढलेल्या पाणीसाठ्याची धोकादायक परिस्थिती बघता काही घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात संपूर्ण गावात जीवित हानी होऊ शकते. तलावाची परिस्थिती बघता संरक्षण भिंतही गावाच्या अवघ्या २०० मीटर वर तर आहेच परंतु तलावाची उंची बघता गाव तलावाच्या सपाटीपासून १२ फूट खाली आहे आणि पाण्याच्या मर्यादेपासून तब्बल अंदाजे ६५ फूट खाली आहे त्यामुळे हा धोका अधिकच असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे करडा गावकरी यांच्या वतीने पुनर्वसनाची मागणी होत आहे. तलावाची एकंदरीत परिस्थिती बघता पुनर्वसनाशिवाय कोणताही पर्याय सध्या तरी दिसत नाही आणि ते लवकरात लवकर होणे गरजेचे आहे अन्यथा दुर्दैवाने एखादी घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होऊ शकते. यासाठी करडा गावकऱ्यांनी अनंतरावजी देशमुख माजी मंत्री यांच्याकडे ही परिस्थिती मांडली त्यांच्या मार्गदर्शनात ज्येष्ठ युवक ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेतली आणि त्यांना पुनर्वसनासाठी निवेदन दिले सोबतच जिल्हा जलसंधारण अभियंता यांना सुद्धा निवेदन देण्यात आले या संदर्भात करडा गावच्या तलावाची धोकादायक परिस्थिती बघता माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे गावाच्या पुनर्वसनासाठी पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री अनंतराव देशमुख यांनी करडा गावकऱ्यांशी चर्चा दरम्यान केली. एकंदरीतच करडा गावचे पुनर्वसन हाच एकमेव पर्याय असून त्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू होणे गरजेचे आहे अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडवून जीवित हानी होऊ शकते अशी मागणी करडा गावकऱ्यांच्या वतीने होत आहे.

# गड-किल्ल्यांवर गेल्यावर आजही एक वेगळीच ऊर्जा मिळते - डॉ. गजानन घोंगटे



■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात इतिहास विभागाने १२ सप्टेंबर रोजी 'मराठ्यांचा इतिहास आणि आजचा युवक' आणि 'गड-किल्ल्यांचे संवर्धन' या महत्त्वपूर्ण विषयांवर एका चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राचा मुख्य उद्देश युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढवणे आणि त्यांना महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची व गड-किल्ल्यांच्या महत्त्वाकांक्षी भूमिकेची जाणीव करून देणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गजानन घोंगटे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. ममता पात्रीकर आणि प्रा. अन्वर गारवे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. रवी कुटे यांनी केली, ज्यांनी मराठ्यांच्या इतिहासातील स्वराज्य निर्मितीच्या प्रेरणादायी प्रवासावर प्रकाश टाकला. प्रा. गारवे यांनी गड-किल्ल्यांच्या संवर्धनाची आजच्या काळात असलेली गरज स्पष्ट केली, तर अध्यक्ष डॉ. घोंगटे यांनी गड किल्ले हे केवळ दगड नसून ते मराठ्यांचे शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक असल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'गड-किल्ल्यांवर गेल्यावर आजही एक वेगळीच ऊर्जा मिळते आणि ती ऊर्जा प्रत्येकाने अनुभवावी.' त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गड-किल्ल्यांना भेट देऊन इतिहासाची माहिती घेण्याचे आवाहन केले. या चर्चासत्रात विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

# ॲड. सुधीर घोडचर यांचा अधीक्षक अभियंत्याकडून सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा सचिव अँड. सुधीर घोडचर यांची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी वाशीम जिल्ह्याच्या ग्राहक तक्रार निवारण मंचचे स्वतंत्र सदस्य म्हणून विज नियामक आयोगाकडून निवड झाली आहे.



वाशीम जिल्ह्याच्या निर्मितीनंतर प्रथमच विद्युत वितरण कंपनीच्या वाशीम जिल्हा कार्यालयामध्ये ग्राहक तक्रार निवारण मंचचे स्वतंत्र सदस्य म्हणून ॲड. सुधीर घोडचर यांची नियुक्ती झाली आहे. मंगळवार ९ सप्टेंबर रोजी ॲड. सुधीर घोडचर यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. याप्रसंगी येथील विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता अजय शिंदे यांचेहस्ते ॲड. सुधीर घोडचर यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी अ. भा. ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, प्रांजल जैन, विधी सल्लागार ॲड. पवनकुमार भन्साळी, विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अभियंता उपस्थित होते.

# अंगणवाड्यांची पाहणी करून सुधारणा करा; ग्रामस्थांची मागणी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

कोयाळी (बु) येथील अंगणवाडी सेविकांच्या निष्काळजीपणाबाबत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत बाल प्रकल्प अधिकारी रिसोड यांच्याकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीत केवळ कोयाळी (बु) नव्हे तर तालुक्यातील सर्व अंगणवाड्यांची पाहणी करून सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे.


गावातील नागरिकांनी अलीकडेच अंगणवाडी क्रमांक १ मधील सेविका शोभा पुरी व अंगणवाडी क्रमांक २ मधील शोभा भिसडे यांना भेट दिली. या भेटीदरम्यान सेविकांचे अरेरावीपणाचे वर्तन, ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे न देणे, वेळेवर हजर न राहणे, पोषण आहार सूचना फलक न लावणे, विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आदी बाबी उघडकीस आल्या. ग्रामस्थांनी या त्रुटींबाबत विचारणा केली असता 'करा काय करायचे ते' अशी उडवाउडवीची भाषा सेविकांकडून वापरल्याचे नागरिकांनी सांगितले.



या संदर्भात ग्रामस्थ श्री. प्रशांत खरबळकर, संजय भिसडे व सामाजिक कार्यकर्ते गोपाल भिसडे पाटील यांनी एकात्मिक बाल प्रकल्प अधिकारी श्रीमती अनिता गीरे यांना तक्रारपत्र दिले. तक्रारीत अंगणवाड्यांमध्ये पोषण आहाराची दर्जेदार सुविधा, स्वच्छ पाणीपुरवठा, नियमित हजेरी व पारदर्शकता याची हमी मिळावी, तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून दोषींवर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे गावकऱ्यांत तीव्र संताप असून, 'अंगणवाडी ही लहान मुलांच्या पोषण व शिक्षणासाठी महत्त्वाची योजना आहे, मात्र सेविकांच्या निष्काळजीपणामुळे बालकांचे नुकसान होत आहे' अशी ग्रामस्थांची भावना व्यक्त झाली. आता बाल प्रकल्प अधिकारी यावर कोणती कार्यवाही करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मानोरा तालुक्यात मुसळधार पावसाची हजेरी



■ प्रतिनिधी | मानोरा ■

शनिवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजता चे दरम्यान मानोरा तालुक्यात अनेक ठिकाणी मेघगर्जनांसह मुसळधार पाऊस जोरदार बरसला. सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतातील उभ्या पिकांना सुद्धा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शनिवारी दुपारी १२ वाजता पासूनच अधून मधून सरीवर सरी बरसात होत्यात ,त्यातच अडीच वाजता चे दरम्यान काळाकुट्ट ढगांनी अच्छादलेले आभाळ दाटून आले व मुसळधार पावसाला सुरुवात झाली. जवळपास एक तासा पेक्षा अधिक वेळ पाऊस बरसल्याने गाव, शहरातील रस्त्यावर पाणीच पाणी वाहताना दिसुन आले .सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असुन याचा लघू व्यावसायिकांना चांगलाच फटका बसत आहे. सततच्या पावसामुळे शेतातील मुंग, उडीद, सोयाबीन, तूर, कपाशी आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तालुक्याच्या अनेक भागातील शेतात सततच्या पावसामुळे पाणी साचून राहत असल्याने या क्षेत्रातील पिके पिवळी पडली आहेत.यामूळे उत्पादन घटण्याची शक्यता अधिक असुन शेतकरी आर्थिक दृष्ट्या अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# विद्यार्थिनींकडून स्वयं शासनाचा अनोखा उपक्रम

**रिसोड :** रिसोड तालुक्यातील भा.मा. कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली.

या निमित्ताने विद्यालयात स्वयंशासन उपक्रम राबविण्यात आला. पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी शिक्षक, प्राचार्य, पर्यवेक्षक, सेवक अशा विविध भूमिका साकारून शाळा स्वतः चालवली. विषयवार अध्यापन विद्यार्थिनींनी उत्कृष्टपणे सादर केले.

## ॲड. किरणराव सरनाईक (शिक्षक आमदार, अमरावती विभाग) यांच्या जन्म दिनाचे (गौरवगीत)

शिक्षक हितासाठी (हक्कासाठी) लढणारा पाहीला - २
भाऊंच्या रुपाने- नेता खरा पाहिला - २
धन्य मातापीता कार्य त्यांचे थोर - २
खुले केले बहुजना - ज्ञानाचे मंदीर
परिवारासवे ध्यानी समाजाचे हित - २
साहीले उभयतांनी कष्ट दिनरात
संस्कार मायपित्याचे पाळणारा पाहिला - २ भाऊंच्या रूपाने...
कास्तकारी करताना मातीमध्ये झीजला - २
उन वाऱ्या पावसात रानीवनी भीजला
अर्धांगीणीची पदोपदी साथ- २
हाती घ्याल कार्य - त्यावर होई मात
बळीसाठी अश्रू ढाळणारा पाहीला - २.....२ भाऊंच्या रूपाने...
समाजकल्याण राजकारणाला - २
राजवैभवाचा तो वारसा घराला
नेकीनितीचे धनी नमन त्या घराला - २
पाठी खंबीर उभ्या-त्या परीवाराला
'स्नेहकिरणासवे' - चमकणारा पाहीला - २....३ भाऊंच्या रूपाने...
ज्ञानदात्यांचे बेहाल पाहून - २
सरसावले पुढे वाली होऊन
शिवरायासम संगे मावळे घेऊन - २
शिरी आमदारकीचा मुकूट लेऊन
इतिहास नवा घडवणारा पाहीला - २....४ भाऊंच्या रूपाने...
शिक्षणक्षेत्रातील -समस्यांची जाण - २
जुनी पेंशन असो - टप्पा अनुदान
शिक्षकरितांचे - कार्य तब महान - २
बुलंद आवाजाने आकर्षिता ध्यान
हक्कांसाठी सभागृह - भांडणारा पाहीला - २.... ५ भाऊंच्या रूपाने...

**दशरथ खडसे (स.शिक्षक)**
श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वाशिम

# मोबाईल नेटवर्क अभावी नागरिक त्रस्त



**मानोरा :** तालुक्यातील रुई, गोस्ता या दुर्गम भागातील नागरिक मोबाईल नेटवर्क अभावी त्रस्त झाले आहेत.

या भागात जिओ कंपनीचे टॉवर आहे मात्र नेटवर्क सेवा नियमीत मिळत नाही, तीन-तीन दिवस मोबाईल नेटवर्क सेवा खंडीत राहत असल्याने शेतकऱ्यांच्या ई-पिक पाहणी व बँकिंग सुविधेसह इतर ऑनलाइन कामे खोळंबत आहेत. नेटवर्क बाबत अनेकदा अडचनी येतात मात्र याकडे कंपनी कडून दुर्लक्ष केले जात आहे.

# जि.प.च्या प्राथमिक शाळा आवारात अवजड वस्तूंचा डेरा

## राडारोड्यात विषारी जीव लपल्यास त्याची जबाबदारी कुणाची?

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या आवारात मागील अनेक दिवसां पूर्वी स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने जवळच बांधलेल्या जलसंधारण विभागाच्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे पाणी अडविण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या फायबरच्या फळ्या आणून ठेवलेल्या असल्याने यापासून येथे ज्ञानार्जन करणाऱ्या मुलांना काही बरे वाईट झाल्यास त्याची जबाबदारी कुणाची असा सवाल उपस्थित होत आहे.

कारखेडा येथील मंदिराशेजारी अरुणावती नदी तीरावर मृदा व जलसंधारण विभागाकडून एका कंत्राटदाराच्या मार्फत कोट्यवधी रुपयाचा वादग्रस्त बंधारा बांधण्यात आलेला आहे.

मागील महिन्यात व या महिन्याच्या प्रारंभी सुद्धा झालेल्या मोठ्या पावसाने अरुणावती नदीने रौद्ररूप धारण केले होते ज्यामुळे या बंधाऱ्याचे पाणी आडविण्यासाठी जे फायबरचे अवजड फळ्या उपयोगात येतात त्यांना आणून जिल्हा परिषदेच्या शाळेच्या प्रांगणामध्ये ठेवल्या गेलेले आहे, ज्याला दोन आठवड्यापेक्षा अधिक कालावधी लोटलेली आहे.



स्थानिक प्राथमिक शाळेमध्ये वर्ग पहिली ते पाचवी पर्यंत कारखेडा ह्या गावातील मुले ज्ञानार्जनासाठी येतात याच ठिकाणी अंगणवाडीची चिमुकली मुले सुद्धा येत असल्यामुळे ह्या फळ्यांच्या खाली एखादी विषारी सरपटणारा प्राणी दबा धरून बसला व त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना काही धोका पोहोचल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार असा प्रश्न या अवजड फळ्यांमुळे निर्माण झालेला आहे.

कोल्हापुरी फळ्या जवळच मोठ्या प्रमाणात जुन्या फरश्या सुद्धा साठविलेल्या असून यामध्ये सुद्धा विषारी जीव आसरा घेऊ शकतात व यामुळे येथे येणाऱ्या प्राथमिक शाळेचे व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना धोका निर्माण होऊ शकत असल्याने हा राडारोडा व फळ्या तातडीने येथून हटवून शाळेचे परिसर स्वच्छ करण्याची मागणी दबक्या आवाजात स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# जनमाध्यम

E-paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, रविवार १४ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४ ■ वर्ष - १३ ■ अंक - २८७

### बाहेर राज्यातील आरोपींना

# अनधिकृत फवारणी औषध विक्री करताना दोघे जेरबंद

## १२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा जनमाध्यम**

तेलंगणा राज्यातील दोन व्यक्ती हिंगणघाट शहरात अनधिकृत फवारणी औषध विक्री करीत असल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा व कृषी विभागाच्या संयुक्त कारवाईत दोघांना अटक करण्यात आली.

या कारवाईत एकूण ११ लाख ९५ हजार ६०३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कार क्र. टीएस ०८ एचडी ४४९९ या वाहनामधून करीत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्यानंतर १२ सप्टेंबर रोजी माहिती मिळाली. त्यानुसार कृषी विभागाला सोबतीला घेत भरारी पथकाने सापळा रचून हिंगणघाट-सातेफळ रोडवर त्यांना थांबवले. चौकशीत आरोपींची नावे शंकर उशन्ना पालथ वय (५०) रा. गुडा, ता. जैनात, जि. अदिलाबाद, तेलंगणा व गिरीश लक्ष्मारेड्डी येल्टीवार वय (४६), रा. शांतीनगर, आदिलाबाद, तेलंगणा अशी स्पष्ट झाली. गाडीची तपासणी केल्यावर बायो जेनेटीक प्रा. लि. हैदराबाद कंपनीच्या ॲक्टो, जम्पर, थ्री-डी, जेनफ्लॉवर, ह्युमिक झेड, एन फ्लॉवर, प्लांटेक या नावाने सीलबंद बाटल्यांचे ९ खोके, कार, दोन मोबाईल फोन व व्यवहाराची नोंद असलेली डायरी असा एकूण ११ लाख ९५ हजार ६०३ रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३, रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात मनोज धात्रक, महादेव सानप, पवन पन्नासे, अनुप कावळे, विनोद कापसे तसेच कृषी विभागाचे अधिकारी शिवा जाधव, प्रमोद पेटकर, शुभ्र कांत भगत यांच्या पथकाने केली.

# कारंजा-तरोडा सिमेंट रोडचे काम ठप्प; नागरिक त्रस्त, आंदोलनाचा इशारा



शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**कारंजा (घाडगे) जनमाध्यम :** कारंजा–तरोडा दरम्यान सुरू असलेले सिमेंट रोडचे काम गेल्या तीन महिन्यांपासून ठप्प झाले आहे. अर्धवट सोडलेला रस्ता, पावसाळ्यात तयार झालेला चिखल आणि वारंवार होणारे अपघात यामुळे नागरिक, विद्यार्थी व वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

नागपूरच्या आयसीसी इन्फ्राटेककडून घेतलेले हे काम गुजरातच्या आशा कन्स्ट्रक्शनने अर्धवट सोडले असून, मजुरांना तीन महिन्यांपासून मजुरी मिळालेली नाही. मशनरीचे कोट्यवधींचे थकबाकी भाडे न दिल्याने यंत्रसामग्री रस्त्यावरच उभी राहिली आहे. मजुरांवर उपासमारीची वेळ ओढवली आहे.

या निष्क्रियतेविरोधात शिवसेनेच्या वतीने माजी तालुका प्रमुख संदीप भिसे व जिल्हा सह संपर्कप्रमुख निलेश देशमुख यांच्या नेतृत्वात तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. आठ दिवसांत काम सुरू झाले नाही, तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

तळेगाव–आर्वी सिमेंट रोडला पाच वर्षांचा कालावधी लागला तशीच परिस्थिती कारंजा–तरोडा मार्गावर होणार का, या प्रश्नाने स्थानिकांत चिंता वाढली असून, प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने कामाला गती द्यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

कारंजा ते भारशिंगी सिमेंट रोडचे काम गेल्या जुलै महिन्यापासून पूर्णपणे ठप्प झाले असून ठेकेदार अचानक बेपत्ता झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गुजरातमधील आशा कन्स्ट्रक्शन या कंपनीकडे हे काम होते. मात्र तीन महिन्यांपासून मजुरांना मजुरी न मिळाल्याने व मशनरीचे भाडे जवळपास २५ लाख रुपये बाकी राहिल्याने काम ठप्प झाले आहे.

# वैद्यकीय विद्यार्थ्यांनी मानवतेच्या भावनेतून रुग्ण सेवेचे कार्य करावे - पालकमंत्री डॉ. भोयर



एमजीआयएमएसचा स्थापन दिवस व दिक्षांत समारोह

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी वर्धा येथूनच देशाला स्वच्छता व आरोग्य सेवेचा मुलमंत्र दिला. त्यांच्या या मुलमंत्राचा स्विकार करत वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील नागरिकांना मानवतेच्या भावनेतून चांगल्या आरोग्य सेवा देण्याचे कार्य करावे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

सेवाग्राम येथे महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्सचा स्थापन दिवस व पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पालकमंत्री बोलत होते. कार्यक्रमाला एमजीआयएम एसचे अध्यक्ष परमानंद तापडिया, सचिव डॉ. बी.एस. गर्ग, अधिष्ठाता डॉ. ए.के. शुक्ला, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पुनम शिवकुमार, डॉ. सतीश कुमार यांची उपस्थिती होती.

तरुणांनो मोठे स्वप्न पहा, नम्रतेने सेवा करा आणि तुमचे ज्ञान लोकांच्या जीवनात प्रकाशासारखे चमकू द्या. गांधीजींनी आपल्याला खरी सेवा ही मानवतेची सेवा आहे, असे सांगितले. महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स ही संस्था सेवा आणि करुणेचा आदर्श पुढे नेणारी संस्था आहे. सेवाग्राम रुग्णालयाने केवळ वर्धाच नव्हे तर संपूर्ण प्रदेशासाठी एक सामाजिक महत्त्व स्थापित केले. वर्धा जिल्ह्यातील नागरिकांसाठी हे 'आमचे रुग्णालय' आहे. या रुग्णालयाने रुग्णांना सेवा देणे कधीही थांबवले नाही. या रुग्णालयाची वाटचाल अशीच यशस्वीपणे होत रहावी, असे डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.

आजचा दिवस विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची यशस्वी पूर्तताच नाही तर उपचार, सेवा आणि जबाबदारीच्या आयुष्यभराच्या ध्येयाची सुरुवात देखील आहे. वैद्यकीय विद्यार्थी करीत असलेली सुरुवात केवळ एक करिअर नाही तर ज्ञान मानवतेला भेटणारा एक उदात्त मार्ग आहे. एमजीआयएमएस सेवाग्रामचे आपल्या देशाच्या इतिहासात एक अद्वितीय स्थान आहे. ही संस्था औषध हे केवळ आजार बरे करण्याबद्दल नाही तर समुदायांना उन्नत करणे, दुर्बलांची सेवा करणे आणि आरोग्य आणि प्रतिष्ठेच्या प्रवासात कोणीही मागे राहू नये, याची आठवण करुन देते. पुढचा प्रवास सोपा नसेल. तुम्हाला दीर्घकाळ, कठीण निर्णय आणि तुमच्या ताकदीची परीक्षा घेणाऱ्या क्षणांना सामोरे जावे लागेल. पण लक्षात ठेवा तुमच्या डोळ्यात डोकावणारा प्रत्येक रुग्ण केवळ डॉक्टरच नाही तर आशेचा स्त्रोत पाहतो. एमजीआयएमएसने तुमच्यात विकसित केलेली प्रामाणिकपणा आणि सेवेची मूल्ये जपा, असेही पुढे बोलतांना डॉ. पंकज भोयर म्हणाले..महात्मा गांधींनी मानवसेवेच्या उद्देशाने १९४४ मध्ये आरोग्य संस्थेची स्थापन केली. पुढे या संस्थेच्यावतीने १९६९ मध्ये वैद्यकिय महाविद्यालय सुरु झाले. १ हजार बेड असलेले हे महाविद्यालय राज्यातच नव्हे तर देशात नावलौकिक असून ग्रामीण भागातील रुग्णांना सेवा देण्याचे काम करीत आहे. संस्थेच्यावतीने दरवर्षी एक गाव दत्तक घेऊन चार वर्ष गावातील नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. संस्थेच्यावतीने सामुदायिक स्वास्थ केंद्र, किरण क्लिनीक अनुसंधान संशोधन परियोजना, शासकीय योजनेचा लाभ, जनेरिक औषधी या सारख्या सुविधा रुग्णांसाठी उपलब्ध करुन देण्यात असल्याचे श्री.तापडिया म्हणाले. यावेळी डॉ. ए. के. शुक्ला, सतिश कुमार यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते एमबीबीएसच्या विविध अभ्यासक्रमाच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पदवी पदक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच रुग्णालयात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नर्स व कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला वैद्यकीय महाविद्यालयातील प्राद्यापक, डॉक्टर, प्रशिक्षणार्थी डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.

# देवळी-दिघी बोपापूर रस्त्याच्या दुरावस्थे विरोधात तडस यांची जोरदार भूमिका



**देवळी जनमाध्यम :** वर्धा-नांदेड रेल्वेमार्गावरील देवळी स्थानकावर दर महिन्याला तब्बल २५ हजार मेट्रिक टन कोळशाचे डम्पिंग सुरू असून, जड वाहनांच्या वर्दळीमुळे देवळी-दिघी बोपापूर रस्ता अक्षरशः उखडून खड्ड्यात बदलला आहे. या गंभीर समस्येवर नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार रामदास तडस यांनी शनिवारी देवळी रेल्वेस्थानक परिसरासह देवळी-दिघी बोपापूर रस्त्याची पाहणी केली.

नागरिकांच्या अडचणी जाणून घेत तडस यांनी रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. त्यांनी देवळीपासून रेल्वेस्थानकापर्यंत सिमेंट रस्ता बांधण्याचा प्रस्ताव मांडला असून, कोळशाच्या धुळीमुळे उभ्या पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी डम्पिंग परिसरात संरक्षण भिंत बांधण्याची मागणी केली.

दरम्यान, स्थानकावर प्रवासी फेऱ्या कमी असून महिन्याला अवघ्या दहा तिकिटांची विक्री होत असली तरी मालवाहतुकीचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. विशाखापट्टणम येथून महिन्याला पाच वेळा कोळसा भरलेल्या मालगाड्या देवळीत येत आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानकाचे विस्तारीकरण, मालगोदाम आणि अतिरिक्त रेल्वेलाइनसाठी प्रस्ताव रेल्वे विभागाकडे पाठविण्यात आल्याचे स्टेशन प्रबंधक पुरुषोत्तम भारद्वाज यांनी सांगितले.

# अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेद्वारे पालक शिक्षक संवाद मेळावा



लॅपटॉप देऊन केला गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**वर्धा जनमाध्यम -** सावंगी येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठ संचालित अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेद्वारे पालक शिक्षक संवाद मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला सुमारे २५० पालकांनी सहभागी होत आपल्या पाल्यांचा सर्वांगीण विकास तसेच शैक्षणिक गुणवत्तेबाबत सकारात्मक चर्चा केली.

या मेळाव्यात प्रारंभी संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागप्रमुख चेतन पुरी, संगणक विज्ञान व वैद्यकीय अभियांत्रिकी विभागप्रमुख पलाश गौरशेट्टीवार, जैववैद्यकीय अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. राजेंद्र रेवतकर यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम व शैक्षणिक कामगिरीबाबत माहिती दिली. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेद्वारे यूसी बर्कले व युनिव्हर्सिटी ऑफ सिडनी यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांसोबतचे सामंजस्य करार, १७ पेटंट, १९ कॉपीराइट्स, ४९०हून अधिक संशोधन लेख प्रसिद्धी, दोन कोटी रुपयांच्या संशोधन प्रकल्पांचे अनुदान, कोर्सेरा अभ्यासक्रमांची पूर्तता तसेच विविध सहशैक्षणिक व अतिरिक्त उपक्रमांबाबत माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमात अधिष्ठाता डॉ. केटीव्ही. रेड्डी यांच्या हस्ते आर्या गावते, दीक्षा निशाने, खुशिता शेंडे, पूजा कामडी, प्रतीक नगरे, निशांत अगडे, प्रज्वल बांद्रे, राहुल रोशन, अनन्या दुबे व मेहेर लंगावते या गुणवंत विद्यार्थ्यांना लॅपटॉप भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. बांधिलकी याबाबत पालकांनी भरभरून प्रशंसा केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. उत्कर्षा पाचरणे यांनी केले. तर आभार डॉ. पीकेपी गायत्री चोप्रा यांनी मानले.

# शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षेचे सूत्र - नियम आणि जबाबदारी !

## शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यशाळा




**वर्धा जनमाध्यम -** चरखा भवन, सेवाग्राम येथे आज 'द वर्ल्ड रेकॉर्ड इव्हेंट' अंतर्गत विज्ञान प्रदर्शनाबरोबर वाहतूक जनजागृतीची कार्यशाळा भरविण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या आदेशाखाली करण्यात आले. पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना वाहन चालवताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले.

कार्यशाळेत अल्पवयीनांना लायसेंसशिवाय वाहन चालवू न देण्याचे, सुरक्षित प्रवासासाठी नियमांवर काटेकोर लक्ष द्यावे याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नियमभंग केल्यास होणाऱ्या शिक्षांबाबतही विद्यार्थी व पालक जागरूक केले गेले. द वर्ल्ड रेकॉर्ड इव्हेंटचे डायटचे प्राचार्य डॉ. रमेश घोगरे, कॅप्टन मोहन गुजरकर, रुपेश बोदिले व पल्लवी बोदिले यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

अशा प्रकारच्या जनजागृती मोहिमेने अपघातांची संख्या कमी करणे आणि सुरक्षित वाहतूक संस्कृती रुजवणे हा उद्देश आहे, असे आयोजकांनी सांगितले.

# आज स्त्री अधिकारावर सेवाग्राम येथे मेळावा

**वर्धा जनमाध्यम –** महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद वर्धा जिल्हा तर्फे स्त्री प्रश्न व स्त्री अधिकार या विषयावर एक दिवसीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत सेवाग्राम चौक येथील सर्व सेवा संघ ऑफिस हॉलमध्ये होणार आहे.

या मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून नागपूरच्या यामिनी चौधरी, कुरखेडा (गडचिरोली) येथील शुभदा देशमुख आणि नागपूरच्या अरुणा सचाने सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत.

महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असल्याने संपूर्ण राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भातील सेफ्टी ऑडिट वर्धा जिल्ह्यासह राज्यभर करण्यात आले. वर्धा जिल्ह्यातील बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन तसेच ग्रामीण भागातील गावांमध्ये महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन महिलांच्या सुरक्षिततेची स्थिती तपासली.अजूनही महिलांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर महिलांचे प्रश्न, सुरक्षितता, स्त्री अधिकार आणि उपाययोजनांवर एकत्र बसून चर्चा करण्याचा उद्देश या मेळाव्यामागे आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला, युवती, शेतकरी, शेतमजूर, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका तसेच असंघटित क्षेत्रातील महिलांसोबत संवाद साधण्यात येणार आहे.

# समविचारी मिळाले तर सोबत, नाहीतर स्वबळावर लढाई - भोंडे यांचा इशारा



**वर्धा जनमाध्यम :** वंचित बहुजन आघाडीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकला चलोचा नारा देत स्वबळावर लढण्याचा निर्धार केला आहे. वर्ध्यात शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत पक्षाचे पूर्व विदर्भ अध्यक्ष भगवान भोंडे यांनी ही भूमिका जाहीर केली.

वर्धा जिल्हा कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाल्यानंतर स्थानिक मतदारसंघांचा दौरा करत वंचितने निवडणुकीची तयारी जोमात सुरू केली आहे. भोंडे म्हणाले, 'बहुजनांचा पक्ष म्हणून वंचित आघाडी कार्य करते. स्थानिक प्रश्नांनाच केंद्रस्थानी ठेवून लढणार आहोत. निष्ठावंत कार्यकर्त्यांना तिकीट, त्यांची कामगिरी लक्षात घेत उमेदवारी दिली जाईल.'

फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेचे समविचारी पक्ष सोबत आले तर युती, अन्यथा स्वबळावरच रिंगणात उतरण्याचा वंचितचा निश्चय आहे, असे भोंडे यांनी ठासून सांगितले.

**कार्यकर्त्यांचा विश्वासच भांडवल**

नवनियुक्त जिल्हाध्यक्ष किशोर खैरकार म्हणाले, 'राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी दुसऱ्यांदा जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवून सर्वांना सोबत घेऊनच पक्ष पुढे नेऊ. वंचितच्या कार्यकर्त्यांची ताकद हीच खरी निवडणूक लढवण्याची शक्ती आहे.'

वर्धेतून सुरू झालेल्या या संवाद दौऱ्यातून वंचित बहुजन आघाडीने स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी लढाईचा बिगुल वाजवला आहे.

पत्रकार परिषदेला उपस्थिती

बच्छराज धर्मशाळेत पार पडलेल्या या परिषदेत ॲड. सुजाता वालदेकर, विवेक हाडके, प्रफुल्ल मानके, मुरलीधर मेश्राम, प्रशांत नगरकर, ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक रामटेके, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मंगला कांबळे, प्रवक्ते धैर्यशील ताकसांडे यांची उपस्थिती होती.

# काँग्रेसचा मातृत्वाचा अपमान; वर्धेत भाजप महिला आघाडीचे आंदोलन




**वर्धा जनमाध्यम –** भारतीय संस्कृतीत आईचे स्थान सर्वोच्च मानले गेले आहे.

'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' असे सांगणाऱ्या या परंपरेत मातृत्वाचा अवमान करणाऱ्यांना क्षमा नाही. मात्र, काँग्रेस नेहमीच विष पेरणारी आणि नारीशक्तीचा अपमान करणारी राहिली आहे, असा घणाघाती आरोप भाजप महिला आघाडीकडून करण्यात आला.

काँग्रेसच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वर्गवासी आईविरुद्ध अपशब्द वापरून शिवीगाळ केली गेली. एवढेच नव्हे तर एआयच्या मदतीने बदनाम करणारे पोस्टर प्रसारित करीत मोदींवर हल्ला करण्याचा निंदनीय प्रयत्न काँग्रेसने केला. याचा निषेध करण्यासाठी १३ सप्टेंबर रोजी शिवाजी महाराज चौकात भाजप महिला आघाडीच्या वतीने जाहीर आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय गाते, आमदार राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस, महिला मोर्चा अध्यक्षा वैशाली येरावार, शिवाय जिल्ह्यातील मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या सहभागी झाल्या.

भाजप महिला आघाडीने स्पष्ट केले की, प्रधानमंत्री हे देशाचे असतात, त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक आयुष्य आणि विशेषतः मातृशक्तीवर घाणेरडी भाषा वापरणे हा फक्त मोदींचाच नव्हे तर संपूर्ण देशातील मातृत्वाचा अपमान आहे.

काँग्रेसने नित्यनेमाने केलेली ही गलिच्छ राजकारणाची पद्धत समाज मान्य करणार नाही.

सभेत महिलांनी तीव्र घोषणाबाजी करत काँग्रेसविरोधी घोषणांचा गडगडाट घडविला. 'आईचा अपमान सहन केला जाणार नाही' असा गर्जना आंदोलनात घुमला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# संक्षिप्त

## सीएसएमटी मेट्रो स्थानकात देशातील पहिले काचेचे मेट्रो प्रवेशद्वार

**मुंबई :** कुठल्याही कृत्रिम दिव्याचा वापर न करता मुक्त सूर्यप्रकाशाने उजळणारे अनोखे प्रवेशद्वार सीएसएमटी मेट्रो स्थानकात उभारण्यात आले आहे. काचेच्या आच्छादना खाली उभे असलेले हे देशातील पहिले मेट्रो प्रवेशद्वार असून भुयारी मेट्रो ३ मध्ये हे उभे झाले आहे.मेट्रो ३ ही देशातील सर्वाधिक लांबीची व राज्यातील १०० टक्के भूमिगत मार्गिका आहे. मार्गिकेचा तिसरा व अंतिम टप्पा लवकरच सुरू होण्याच्या बेतात आहे.नेहरू विज्ञान केंद्र ते कफ परेड असा हा ११ स्थानके व १० किमीचा टप्पा असेल. त्यामध्येच ही मेट्रो मार्गिका छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनसला (सीएसएमटी) जोडली जाणार आहे. त्यामुळेच ही जोडणी महत्त्वाची असेल. याच सीएसएमटी स्थानकाचे प्रवेशद्वार आगळ्या अशा काचेच्या आवरणाने तयार केले आहे.काचेच्या डिझाइनमधील आवरण हे या स्थानकाच्या प्रवेशद्वाराचे वैशिष्ट्य असेल. त्यामुळे स्थानकात प्रवेश करताना कुठल्याही विजेच्या दिव्यांची गरज नाही.



## दुर्मिळ न्यूरोलॉजिकल आजारावर परळमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया!

**मुंबई :** परळ येथील ग्लेनईगल्स हॉस्पिटलमध्ये ५६ वर्षीय रुग्णावर ट्रायजेमिनल न्यूरॅल्जियासारख्या दुर्मिळ न्यूरोलॉजिकल विकारावर यशस्वी उपचार करण्यात आले. दशकभर असह्य वेदना सहन करणाऱ्या रुग्णाला 'मायक्रो व्हॅस्क्युलर डिकॉम्प्रेशन' (एमव्हीडी) या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे आजाराच्या मुळावर उपाय मिळाला.चेहरा, कपाळ, हनुवटी, हिरड्या किंवा नाकपुडीवर तीव्र व असह्य वेदना निर्माण करणारा ट्रायजेमिनल न्यूरॅल्जिया हा विकार अनेकदा चुकीच्या निदानामुळे दुर्लक्षित होतो. रुग्ण सुशील वर्मा हे दहा वर्षांपासून वेदना सहन करत होते. सुरुवातीला चुकीचे निदान झाल्याने त्यांचे दातही काढण्यात आले, मात्र यातून काहीही आराम न मिळाल्याने उच्च डोसची औषधे वर्षानुवर्षे घ्यावी लागली. वेदनांमुळे खाणे, बोलणे,अगदी हसणे देखील अशक्य झाले होते. परिस्थिती इतकी बिघडली की नैराश्यामुळे आत्महत्येचे विचार येऊ लागले होते.ग्लेनईगल्स हॉस्पिटलचे संचालक (इंटरव्हेंशनल न्यूरोलॉजी व न्यूरोसर्जरी) आणि स्पाइन विभाग प्रमुख डॉ. नितीन डांगे, डॉ. कुशल भाटिया व डॉ. मयूर घरत यांच्या टीमने वर्मा यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. एमआरआय चाचणीत चेहऱ्याच्या संवेदनांना मेंदूपर्यंत पोहोचवणाऱ्या ट्रायजेमिनल नसेवर रक्तवाहिनीचा दाब असल्याचे स्पष्ट झाले. दुर्बिणीच्या साहाय्याने करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेत रक्तवाहिनीला नसेपासून अलग ठेवून त्यांच्या मध्ये 'टेफ्लॉन स्पंज' ठेवण्यात आला. तीन तास चाललेल्या या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या वेदना पूर्णपणे नाहीशा झाल्या.



## डोंबिवलीतील १४ वर्षाच्या बालकाने केली भागीरथी नदी १२ तासात पार

**डोंबिवली –** डोंबिवलीतील एका १४ वर्षाच्या बालकाने भागीरथी नदीतील ८१ किलोमीटरचे अंतर १२ तासात पार करण्याचा विक्रम केला आहे. एवढ्या अल्पवयात आव्हानात्मक परिस्थितीत भागीरथी नदी पार करण्याचे धाडस डोंबिवलीतील एका बालकाने केल्याने सर्वस्तरातून समाधान व्यक्त केले जात आहे.आर्यर्न खेडेकर असे या बालकाचे नाव आहे. तो डोंबिवली एमआयडीसीतील ओंकार इंटरनॅशनल शाळेत शिक्षण घेत आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे ७९ व्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. जगातील ही खुल्या गटातील जलतरण स्पर्धा होती. या स्पर्धेत सहभागी होण्याचा निश्चय आर्यनने केला होता.



## महालक्ष्मी, जोतिबा मंदिराचा मूळ ढाचा जपावा – माधुरी मिसाळ

**कोल्हापूर :** महालक्ष्मी, जोतिबा मंदिर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणचे आधुनिकीकरण करत असताना देवस्थानच्या मूळ ढाच्याला धक्का लागणार नाही, याची संबंधित यंत्रणेने दक्षता घ्यावी, असे निर्देश नगरविकास राज्यमंत्री तथा सह पालकमंत्री माधुरी मिसाळ यांनी येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात देवस्थान (तीर्थक्षेत्र) विकास आराखड्याच्या अनुषंगाने विविध विकासविषयक कामांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.या वेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, मनपा आयुक्त के. मंजुलक्ष्मी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकीयेन एस, अपर पोलीस अधीक्षक डॉ. धीरजकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, मनपा अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, जिल्हा नियोजन अधिकारी अमित सुतार आदी उपस्थित होते.मिसाळ पुढे म्हणाल्या, की देवस्थानचे सुशोभीकरण होत असताना परंपरागत व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांचाही या आराखड्यात विचार करण्यात यावा. कोणावरही अन्याय होऊ नये. जोतिबा मंदिर ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या कुंडातील पाण्याचे शुद्धीकरण होईल याची दक्षता संबंधित कंत्राटदारांनी घ्यावी. महालक्ष्मी मंदिरात भाविकांच्या दर्शन रांगेचा आराखडा यामध्ये समाविष्ट करण्यात यावा, अशी सूचना त्यांनी केली.

## २० वर्षीय प्रियंकाचा हार्ट अटॅकने मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** आई बाहेर गेली असल्याने वडिलांना चहा करून दिल्यानंतर भाऊ, मैत्रिणीसह जिमला गेलेल्या २० वर्षीय तरुणी जिममध्ये अचानक चक्कर येऊन पडली. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना हृदयविकाराचा झटका येऊन तिचा मृत्यू झाला. ही घटना बीड बायपास परिसरात गुरुवारी सायंकाळी घडली. एकुलती एक मुलगी गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.प्रियंका अनिल खरात वय २० वर्ष, रा. बीड बायपास, असं मयत झालेल्या मुलीचे नाव आहे. प्रियंकाने बीफार्मसीचे पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. बीड बायपास परिसरातील मस्के पेट्रोल पंप शहरजवळ एका अपार्टमेंटमध्ये खरात कुटुंबीय राहते. अनिल खरात हे देवगाव रंगारी येथे पोलीस हवालदार म्हणून नोकरी करतात.

# ५०-५० अन् ६०-४०

# विशेष प्रस्तावासह मनसे आग्रही





### उद्धवसेनेला धास्ती

### युतीची चर्चा कुठपर्यंत पोहोचली?

**मुंबई:** गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे बंधूंच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. मागील २ महिन्यांपासून दोघांच्या ४ भेटी झाल्या आहेत. त्यामुळे शिवसेना उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात युती होण्याची शक्यता वाढलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आधी ठाकरेंची युती होऊ शकते. सध्या त्या दृष्टीनं पावलं टाकली जात आहेत. कौटुंबिक पातळीवर दोन्ही नेते एकत्र आले आहेत. राजकीय पातळीवर युतीची प्रक्रियादेखील सुरु आहे.

मराठी भाषेच्या मुद्द्यावरुन ठाकरे बंधू एका व्यासपीठावर आले. त्यानंतर दोन्ही ठाकरेंमध्ये कटुता कमी कमी होत गेली. शिवसेना उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे च्या वाढदिवसाला राज ठाकरे मातोश्रीवर गेले. त्यानंतर उद्धव ठाकरे दोनदा राज यांचं निवासस्थान असलेल्या शिवतीर्थावर गेले आहेत. राज आणि उद्धव यांच्यात दोनच दिवसांपूर्वी शिवतीर्थवर अडीच तास तास चर्चा झाली. यावेळी राज आणि उद्धव यांच्या कुटुंबियांमध्येही प्रदीर्घ गप्पा झाल्या. युतीच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु असताना ठाकरे बंधूंनी सावध पवित्रा घेतला आहे.

जागा वाटपाचा फॉर्म्युला, कोणत्या जागा कोणाला याबद्दलचे निर्णय होण्यास बराच वेळ लागतो. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा इतक्यात होणार नाही. २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज ठाकरेंच्या पक्षाचे मुंबईत ६ जण निवडून आले होते. त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये मनसेची ताकद कमी होत गेली.

२००९ मध्ये मनसेनं जिंकलेल्या विधानसभा मतदारसंघांत ५०-५० टक्के जागा सुटाव्यात यासाठी राज यांचा पक्ष आग्रही आहे. तर बाकीच्या विधानसभा मतदारसंघांमध्ये ४०-६० टक्के वाटप व्हावं, अशी मनसेची इच्छा आहे. याचा अर्थ ६ मतदारसंघात वगळता अन्य ३० मतदारसंघांमध्ये शिवसेना उबाठा मोठा भाऊ असेल. विधानसभेच्या एका मतदारसंघात महापालिकेचे ६ प्रभाग असतात.

२००९ मध्ये मुंबईत मनसेचे ६ जण निवडून आले. पण २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मुंबईत मनसेचा एकही शिलेदार विजयी झाला. त्यामुळे मनसेची ताकद कमी झालेली आहे. त्यामुळे जागावाटप करताना २००९ चा आधार धरायचा का, असा प्रश्न ठाकरेसेनेच्या गटातून उपस्थित केला जात आहे.

२०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेनं ८४ जागा जिंकल्या. त्यावेळी शिवसेना क्रमांक एकचा पक्ष ठरला. तर मनसेला केवळ ७ जागा मिळाल्या. पण गेल्या ८ वर्षांमध्ये पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं आहे. ठाकरेंचा पक्ष फुटला आहे. त्यांचे निम्म्याहून अधिक माजी नगरसेवक शिंदेंकडे गेले आहेत. त्यामुळे पक्षाची ताकद घटली आहे. तर विरोधात असलेल्या भाजपची ताकद कायम आहे. त्यांच्या जोडीला शिंदेसेना आहे. सत्तेची साथ त्यांच्याकडे आहे. त्यामुळे उद्धव यांच्यासमोर प्रचंड मोठं आव्हान आहे.

शिवसेना उबाठा आणि मनसे यांची ताकद असलेले भाग सारखेच आहेत. २००९ मध्ये मनसेचे उमेदवार शिवसेनेच्याच उमेदवारांचाच पराभव करुन विजयी झाले. सेनेचे बालेकिल्ले मनसेनं तेव्हा मनसेनं सर केले होते. पण यातील जवळपास सगळेच बालेकिल्ले सेनेने २०१४ मध्ये पुन्हा मिळवले आणि राज यांचा पक्ष मुंबईत शून्यावर आला. त्यामुळे २००९ च्या आधारावर जागावाटप होऊ नये असा मतप्रवाह ठाकरेंच्या पक्षात आहे.

## शिरसाट यांचे खाते वादात

## ऊसतोड कामगारांच्या झालेल्या सर्वेक्षणासाठी पुन्हा काढले कंत्राट

**मुंबई :** गेल्या काही दिवसां पासून सातत्याने वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या संजय शिरसाट यांचे सामाजिक न्याय खाते पुन्हा एकदा अडचणीत येण्याची शक्यता आहे. राज्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षणाविषयी प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

महायुती सरकारने जून २०२५ मध्ये कामगारांचे सर्वेक्षण करण्यासाठी तब्बल २२ कोटी रुपयांचे कंत्राट जारी केले होते. मात्र, वर्ष २०२१ मध्येही अशाच प्रकारे सर्वेक्षण करण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे तक्रार केली आहे. त्या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने सामाजिक न्याय विभागाकडून उत्तर मागितले आहे.



वर्ष २०१९ मध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर सातत्याने ऊसतोड कामगारांची राज्यातील संख्या जाणून घेऊन त्यांना लाभ देण्यासाठी सर्वेक्षणाची मागणी जोर धरु लागली होती. त्याअनुषंगाने अखेर २१ सप्टेंबर २०२१ रोजी ग्रामसेवकाने नोंदणी करण्याचे निर्देश सामाजिक न्याय विभागाने दिले होते.

याविषयी सामाजिक न्याय विभागातील अधिकाऱ्यांना विचारले असता, चार वर्षांपूर्वी ग्रामसेवकांकडून करण्यात आलेले ओळखपत्रांचे काम हे तोकडे होते. केवळ अडीच लाखांच्या आसपास कामगारांचे ओळखपत्र त्यातून तयार झाले. आता मात्र देण्यात आलेले कंत्राट हे कामगारांची विस्तृत माहिती जमा करण्याबरोबरच त्यांचे बँक खाते आणि इतर माहिती गोळा करण्यात येणार आहे.

चार वर्षांपूर्वी ग्रामसेवकांकडून करण्यात आलेले ओळखपत्रांचे काम हे तोकडे होते. केवळ अडीच लाखांच्या आसपास कामगारांचे ओळखपत्र त्यातून तयार झाले. आता मात्र देण्यात आलेले कंत्राट हे कामगारांची विस्तृत माहिती जमा करण्याबरोबरच त्यांचे बँक खाते आणि इतर माहिती गोळा करण्यात येणार आहे. त्यामुळे दोन्ही कामे वेगळी असून त्यात पुनरूक्ती नाही.

## अजित पवारांचा आता राज्यात 'जनसंवाद'

**पुणे :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे रणांगणात उतरले असून, पुण्यात 'जनसंवाद'च्या माध्यमातून त्यांनी मतदारांशी संवाद साधण्यास सुरुवात केली. 'नागरिकांचे प्रश्न सुटावेत, यासाठी राज्यभर विविध मतदार संघांमध्ये 'जनसंवाद' कार्यक्रम घेतले जाणार आहेत,' अशी घोषणाही पवार यांनी केली.



लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने मतदारांशी संवाद साधणार आहेत. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून 'जनसंवाद' हा उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यातून नागरिकांच्या तक्रारींचे जागेवर निवारण करण्यात येणार आहे. या 'जनसंवादा'ला हडपसर विधानसभा मतदारसंघापासून आरंभ करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त पोलीस आयुक्त शर्मा यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'नागरिकांचे प्रश्न, अडचणी सुटल्या पाहिजे, यासाठी जास्तीत जास्त मतदार संघात हे कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

हडपसर येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात नागरिकांनी पाणी, कचरा, रस्त्यांची दुरावस्था यासह रखडलेली मोजणी, अतिक्रमण आदी विषयांवर तक्रारी मांडल्या. प्रत्येक मतदारसंघांमध्ये असे कार्यक्रम घेऊन नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे'.

'आयुष कोमकर हत्या प्रकरणी आंदेकर टोळीविरूद्ध 'मकोका' लावण्यात आला आहे. पोलिसांनी कोणताही राजकीय दबावाला बळी न पडता त्यांचे काम करावे, असे सूचना पोलीस खात्याला दिल्या आहेत. अल्पवयीन मुले चुकीच्या मार्गाने जात असल्याने अल्पवयीन मुलांचे वय कमी करण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे.

## भाजप 'ऑपरेशन सिंदूर'चा राजकीय वापर करणार- आदित्य ठाकरे

**मुंबई :** पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या लोकांबद्दल बीसीसीआयला काही भावना आहेत की नाही असा सवाल शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी विचारला. तसेच भाजप 'ऑपरेशन सिंदूर'चा राजकीय वापर करणार, पण हिंदुस्थान-पाकिस्तान सामना मात्र रद्द करणार नाही अशी टीकाही आदित्य ठाकरे यांनी केली.



सोशल मिडियावर पोस्ट टाकून आदित्य ठाकरे म्हणाले की, पहलगाम हल्ल्याला अजून सहा महिनेही झालेले नाहीत. दहशतवादी आत कसे आले, हे आजतागायत कुणालाच माहीत नाही. त्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' झाले. तेव्हा पंतप्रधान मोदी म्हणाले की रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. संरक्षणमंत्र्यांनी अचानक झालेल्या युद्धविरामानंतर सांगितले की 'ऑपरेशन सिंदूर' थांबवले आहे. संपवलेले नाही. भारतामध्ये झालेल्या आशिया कप हॉकी स्पर्धेला पाकिस्तानने बहिष्कार घातला. पण बीसीसीआय मात्र पाकिस्तानविरुद्ध खेळण्यासाठी उतावीळ आहे. बीसीसीआय एवढी वरचढ आहे का की ते पंतप्रधान आणि संरक्षणमंत्र्यांच्या भूमिकेलाही धाब्यावर बसवू शकते?

## स्मार्ट मीटर तक्रारींचा ढीग महावितरणच्या तोंडावर मारणार, शिवसेनेची मोहीम सुरू

**मुंबई :** महावितरणच्या स्मार्ट मीटरला ग्राहकांचा विरोध असतानाही ते मीटर टिओडी या गोंडस नावाने वीज ग्राहकांच्या माथी मारले जात आहेत. या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. स्मार्ट मीटरच्या विरोधात असलेल्या तक्रारींचा ढीग महावितरणच्या तोंडावर मारून स्मार्ट मीटरला विरोध नाही म्हणणाऱ्या महावितरणची झोप शिवसैनिक उडवणार आहेत. आजपासून स्मार्ट मीटरच्या तक्रारी गोळा करण्याची मोहीम शिवसेनेने सुरू केली आहे.

महावितरणच्या स्मार्ट मीटर संदर्भात आज शिवसेना नेते माजी खासदार विनायक राऊत यांच्या संपर्क कार्यालयात बैठक झाली.



या बैठकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते माजी आमदार बाळ माने यांनी मार्गदर्शन केले.माजी आमदार बाळ माने यांनी सांगितले की, स्मार्ट मीटर बाबत आपण एक अर्ज तयार केला आहे.तो अर्ज तक्रारदार वीज ग्राहकांकडून भरून घ्यायचा आहे. कोणत्याही परिस्थितीत हे अदानीचे स्मार्ट मीटर आपल्याला बंद करायचे आहेत. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख शेखर घोसाळे, शहरप्रमुख प्रशांत सांळुखे, शहरसंघटक प्रसाद सावंत व इतर पदाधिकारी उपस्थित होते.स्मार्ट मीटर बाबत पहिल्या टप्प्यात पाच हजार तक्रार अर्ज भरून घ्यायचे आहेत. स्मार्ट मीटरमुळे प्रचंड वीज बील आल्याने ग्राहक संतापले आहेत.आपण त्यांच्या तक्रारी नोंदवून घेऊ. दुसऱ्या टप्प्यात पाच हजार अर्ज भरून या सर्व तक्रारी महावितरणच्या कार्यालयात सादर करू असे माजी आ बाळ माने यांनी सांगितले.

## गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्र मिळणार

**चंद्रपूर:** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर चंद्रपूर येथे गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी तब्बल ४१४.७४ कोटींचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मान्यता देत पुढील कार्यवाहीसाठी सकारात्मक आश्वासन दिले. हा प्रस्ताव लवकरच मंत्रीमंडळासमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार असून, या निर्णयामुळे चंद्रपूरसह विदर्भातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची नवी दारे खुली होणार आहेत.मुनगंटीवार यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे आभार मानले आहेत.

## मुंबई महापालिकेच्या विकासकामासाठी आधी कंत्राटदार ठरतो, मग निविदा काढण्यात येतात-खा. वर्षा गायकवाड यांचा आरोप

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका भ्रष्टाचाराचे कुरण बनली असून मुंबईकरांचा पैसा लुटला जात आहे. मुंबई महापालिकेशी संबंधित कोणत्याही कामाची निविदा नगरविकास विभागातून निघते. काम कोणाला द्यायचे ते आधीच ठरलेले असते, नंतर निविदा काढण्यात येतात, असा आरोप खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे. मर्जीतील कंत्राटदारांनाच काम मिळावे यादृष्टीनेच अटी घातल्या जातात, असाही आरोप त्यांनी केला.

मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या तोंडावर मुंबई काँग्रेसने मुंबई महापालिकेतील विविध कामांतील भ्रष्टाचार उघड करण्याची मोहीम सुरू केली आहे. 'महायुती सरकार मस्त, मुंबईकर मात्र त्रस्त' या अभियानाअंतर्गत दर आठवड्याला एका प्रकरणातील भ्रष्टाचार उघड केला जात आहे. या अंतर्गत शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत वर्षा गायकवाड यांनी हे आरोप केले. या पत्रकार परिषदेला वर्षा गायकवाड यांच्यासह वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत, मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, शकील चौधरी, निजामुद्दीन



राईन, अजंता यादव आदी उपस्थित होते.

वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराची प्रकरणे आम्ही दोन महिन्यांपासून उघड करीत आहेत. भाजपा युती सरकारच्या काळात मुंबई महापालिकेतील तिजोरीतील पैशांवर दरोडा टाकला जात आहे. कोणतीही विकासाची कामे 'लाडक्या' कंत्राटदारांनाच मिळावे यासाठी नियम व अटी तयार करण्यात येतात, असाही आरोप गायकवाड यांनी केला. सत्ताधारी पक्षातील नेते, महापालिका अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने मुंबईकरांच्या पैशांवर दरोडा टाकला जात आहे.

**गुंदवली येथील जलबोगद्याच्या कामात भ्रष्टाचार**

गुंदवली येथे जलबोगद्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सचिन सावंत यांनी यावेळी केला. ते म्हणाले की, गुंदवली येथून ३००० मिमी व्यासाच्या जलबोगद्याचे काम मर्जीतील दोन कंत्राटदार कंपन्यांनाच मिळावे अशी व्यवस्था करण्यात आली. आधी ४२ किमी लांबीची वाहिनी बदलण्यासाठी सुमारे २,००० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता, परंतु वर्षभरातच हे काम ५० किमीचे करून अंदाजीत खर्च तब्बल ३,५०० कोटींवर पोहोचला, असा आरोप सावंत यांनी केला.केवळ दोनच पाइप उत्पादक कंपन्या पात्र ठरतील अशी अट या निविदेत समाविष्ट करण्यात आली होती. या कंपन्यांनी ज्या कंत्राटदाराबरोबर सामंजस्य करार केला त्यालाच हे काम देण्यात येणार असल्याचा आरोप सावंत यांनी केला. अशा पद्धतीने अट का घालण्यात आली याचे स्पष्टीकरण महानगर ालिकेने दिले पाहिजे, अशीही मागणी सावंत यांनी केली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पंजाबमधील पूरस्थिती

अनपेक्षितपणे सध्या पंजाबमधील पुराची चर्चा देशभर ऐकायला मिळत आहे. सहसा या राज्यामध्ये प्रचंड पूर आल्याच्या बातम्या येत नसतात. यंदा मात्र येथे महापुराने जणू थैमान घातले. पंजाबमध्ये पुरामुळे आतापर्यंत ४३ जणांचा मृत्यू झाला आहे. २३ जिल्ह्यांमधील १९०२ हून अधिक गावे पाण्याच्या विळख्यात आहेत. तीन लाख ८४ हजारांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. हिमाचलच्या वरच्या भागात मुसळधार पाऊस आणि ढगफुटीमुळे भाक्रा धरणाच्या पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ झाल्यामुळे व्यवस्थापनाने चारही पूर दरवाजे ९-९ फुटांनी उघडले. पंजाबमधील रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले. गेल्या तीन दशकांमध्ये असा पाऊस आणि पूर कुणी पाहिला नव्हता. गेल्या आठवड्यापासून संपूर्ण पंजाब पुरात पोहत असल्यासारखे चित्र आहे. अलीकडच्या काळात भाक्रा धरणात एक लाख क्युसेसहून अधिक पाण्याची आवक होत आहे. धरणाची पाण्याची पातळी १,६७९ फुटांवर पोहोचली आहे. या काळात टर्बाइन आणि दरवाज्यांमधून ८५ हजार क्युसेस पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे सतलज नदीच्या काठावरील खालच्या ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे अशा अनेक भागांमध्ये धोका वाढला. परिणामी, ही देशभरातील मोठीच घडामोड बनली. केंद्रीय मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी पंजाबच्या दोन हजार कोटींच्या मदत पॅकेजबाबतच्या पत्राला सकारात्मक प्रतिसाद दिला. चक्की खडमध्ये धूप झाल्यामुळे पर्वत कोसळू लागले आहेत. पंजाबला आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहे. जवळपास दीड हजार गावे पाण्याखाली गेली आहेत. लाखो लोकांना स्थलांतर करावे लागले आहे, पंजाबपासून पाकिस्तानपर्यंत सतलज, चिनाब आणि रावी नद्यांनी कहर केला आहे. यामुळे या भागात इतका पाऊस का पडत आहे, असा प्रश्न उपस्थित झाला. हवामानशास्त्रज्ञांनी याचे सविस्तर उत्तर दिले आहे. हवामान विभागाचे म्हणणे आहे, की बंगालच्या उपसागरावर तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आणि चक्रीवादळ हवेत आणि आर्द्रतेत वाढ करतात, त्यामुळे मुसळधार पाऊस पडतो. ऑगस्टच्या उत्तरार्धात अशा चार प्रणाली सक्रिय होत्या. त्याचा परिणाम अजूनही सुरू आहे. पावसाळ्यात बऱ्याचदा लांब अंतरासाठी कमी दाबाचे क्षेत्र तयार होते. हवामानशाखाच्या भाषेत त्याला मॉन्सून ट्रफ म्हणतात. पश्चिमी विक्षोभामुळे ऑगस्टमध्ये पंजाबमध्ये पाच वेळा मुसळधार पाऊस पडला. यामध्ये बंगालच्या उपसागरापासून वायव्य राज्यांमध्ये घड्याळाच्या उलट दिशेने वाऱ्याची हालचाल दिसून आली. जुलै-ऑगस्टसारख्या मॉन्सून महिन्यांमध्ये सहसा पश्चिमी विक्षोभ सक्रिय नसतात; परंतु या वेळी हा अपवाद ठरला. इराणभोवती स्थिर वारे वाहत असल्याने हा विक्षोभ दक्षिणेकडे म्हणजेच भारताकडे ढकलला गेला. त्यामुळे जम्मू-काश्मीरसह आसपासच्या भागात मुसळधार पाऊस पडला. हवामान विभागाच्या माहितीनुसार सप्टेंबर महिन्यातही सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल. भूस्खलन आणि पूर यासारख्या घटनांचा धोका कायम राहील. आतापर्यंत संपूर्ण देशात मॉन्सून हंगामात सुमारे सहा टक्के जास्त पाऊस पडला आहे, तर पूर्वेकडील भाग कोरडे राहिले आहेत. सहसा पूर्व भारतात चांगला पाऊस पडतो; परंतु या वेळी उलट घडले. वायव्य भाग सर्वाधिक प्रभावित झाला. तिथे आतापर्यंत २७ टक्के अतिरिक्त पाऊस नोंदवला गेला आहे. यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. पंजाब सरकारने संपूर्ण राज्य आपत्तीग्रस्त म्हणून घोषित केले आहे. बाधित सेवा पूर्ववत करण्यासाठी सर्व विभागांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, सर्व विभागांमधील कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. पंजाबमध्ये १९८८ नंतर प्रथमच अशी परिस्थिती निर्माण झाली. भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार १९८८ मध्ये पंजाब, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश, आसाम, अरुणाचल प्रदेश आणि बिहारमध्ये आलेला पूर हा त्या वर्षीच्या चार सर्वात विनाशकारी हंगामी घटनांपैकी एक होता. याशिवाय, पश्चिम बंगालमध्ये चक्रीवादळ आले, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये तीव्र उष्णता अनुभवायला मिळाली आणि दुरुस्तीच्या कामासाठी कमी वेळ उपलब्ध झाला. जम्मू आणि काश्मीरमध्येही जोरदार हिमवृष्टी झाली. पंजाबसह वायव्य भारतात ऑगस्टमध्ये २६५ मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला. तो २००१ नंतरचा सर्वाधिक आणि १९०१ नंतरचा तेरावा सर्वाधिक पाऊस आहे. १ जून ते ३० ऑगस्टदरम्यान पंजाबमध्ये ४४३ मिलीमीटर पाऊस पडला. तो संपूर्ण मॉन्सून हंगामातील सरासरी पावसापेक्षा आधीच जास्त आहे. भाक्रा धरणाची पाण्याची पातळी आणखी वाढली तर दरवाजे उघडावे लागतील अशी भीती आहे. भाक्रा धरणाची पाण्याची पातळी १६७८.९७ फुटांवर पोहोचली आहे. ती १,६८० फूट या धोक्याच्या चिन्हापेक्षा फक्त एक फूट कमी आहे. त्यामुळे संपूर्ण पंजाबमध्ये धोक्याची घंटा वाजू लागली आहे. पोंग धरणदेखील १,३९० फूट धोक्याच्या चिन्हापेक्षा १,३९४.५१ फूट वर असल्यामुळे खालच्या भागात आणखी पूर येण्याची शक्यता वाढली. मॉन्सून हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जो धान्याचे साठे भरतो आणि लाखो शेतकऱ्यांच्या घरात आशा निर्माण करतो पण आशेषा हा हंगाम कधी कधी विनाशाचे कारण बनतो. या वर्षीचा मॉन्सून तसाच ठरला. या वेळी मॉन्सूनचे आगमन लवकर झाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले; परंतु अतिवृष्टीमुळे हे वर्ष त्यांच्या आशा धुळीस मिळवणारे ठरेल, असे चित्र दिसू लागले. भारतातील कृषिक्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार आणि हरियाणा या प्रमुख कृषी राज्यांना या पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. खरीप हंगामातील पिकांना, विशेषतः भात आणि कापूस यांना मोठा फटका बसला आहे. पावसामुळे पंजाब, बिहार, उत्तर प्रदेशसारख्या प्रमुख भात उत्पादक राज्यांमध्ये भात पीक नष्ट झाले आहे. पंजाबमधील बहुतेक जिल्हे धान्याचे कोठार आहे. ते पुरामुळे प्रभावित झाले आहेत. भात पिके ५ ते १० सेंटीमीटर पाण्याच्या खोलीत चांगली वाढतात. पाणी १५ सेंटीमीटरपेक्षा जास्त काळ खोलीवर राहिल्यास उत्पादन कमी होऊ लागते. पुरामुळे पाणी साचल्यास खरीप हंगामातील पिके अनेक रोगांना बळी पडतात. पिकांची मुळे कुजू लागतात. झाडांमध्ये बुरशी वाढू लागते. पंजाबच्या २३ पैकी १२ जिल्ह्यांना पुराचा फटका बसला आहे. लाखो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे भात, कापूस आणि मक्याचे पीक पूर्णपणे उध्वस्त झाले. राज्यातील बहुतेक भागात अतिवृष्टीमुळे पिकांचे ७५ ते ९० टक्के नुकसान झाले आहे.

# जीडीपीवाढीसाठी कृषी क्षेत्राचा बूस्टर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या अर्थव्यवस्थेला मृत असल्याचे सांगूनही चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताचा जीडीपीवाढीचा वेग हा चीनपेक्षा अधिक राहिला आहे. राष्ट्रीय सांख्यिकी संघटना 'एनएसओ'ने जारी केलेल्या अहवालानुसार, जीडीपी ७.८ टक्के राहिला असून तो मागील वर्षाच्या म्हणजे एप्रिल ते जून २०२४ तसेच जुलै ते सप्टेंबर २०२४, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ आणि जानेवारी ते मार्च २०२५ च्या तुलनेनेही अधिक राहिला आहे. विशेष म्हणजे, जीडीपीतील वाढीचे श्रेय कृषी आणि सेवा क्षेत्राला दिले पाहिजे. कृषी सेक्टरने पुन्हा एकदा भारत हा कृषीप्रधान देश असल्याचे सिद्ध केले आहे. वेगाने विकसित होणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र मोलाची भूमिका बजावत आहे. अर्थात, त्याचे श्रेय बळीराजालाच जाते आणि त्याचवेळी सरकारचे कृषीभिमुख धोरणही उपयुक्त ठरत आहे.

कृषी आणि संलग्न क्षेत्र पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, डेअरी आदींनाही प्रोत्साहन मिळत आहे. एका ढोबळ अंदाजानुसार, भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे १४ टक्के योगदान आहे आणि प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपाने ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकांचे आयुष्य शेतीवर अवलंबून आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यात कृषी क्षेत्रदेखील मागे राहणार नाही, असे चित्र आहे. देशात सुमारे ५१ टक्के म्हणजे १५९ दशलक्ष हेक्टर कृषी भूमी आहे. यापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक भूमी सिंचनाखाली असून त्याचवेळी मोठे क्षेत्र अजूनही पावसावर अवलंबून आहे. यावर्षीची चांगली गोष्ट म्हणजे, पावसाने सरासरी ओलांडली असून सर्वदूर नोंद झाली आहे. मागच्या वर्षीदेखील पाऊस चांगला राहिल्याने कृषी क्षेत्रात वाढ झाली आहे.

कृषी आणि शेतकऱ्याचे महत्त्व कोरोना काळाने अधोरेखित केले होते. कोरोना काळात कृषी क्षेत्राने दोन प्रकारच्या भूमिका बजावल्या. एकीकडे सर्वकाही बंद असताना आणि सर्व वर्क फ्रॉम होम करत असताना कृषी क्षेत्राने जबाबदारी चोखपणे पार पाडली आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीने देशातील गोदामात अन्नधान्याचा साठा कायम राहिला. आजही ८० कोटी जनतेला पंतप्रधान



**भारतीय अर्थव्यवस्थेला मृत अर्थव्यवस्था असा उल्लेख करत डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीयांविषयी वाटणारा आकस जगजाहीर केला. अर्थात, भारत आता पहिल्या पाच अर्थव्यवस्थांत असताना ती मृत कशी राहू शकते, हा खरा प्रश्न आहे आणि ही बाब ट्रम्प यांना समजत नाही, असे म्हणण्याचा वेडेपणा करता येणार नाही; पण भारतीयांच्या उद्योगांवर शुल्कवाढीचा फास आवळला जात असताना कृषी क्षेत्राने मात्र भरघोस योगदान देत अर्थव्यवस्थेची घोडदौड कायम ठेवली आहे. जीडीपीवाढीसाठी कृषी क्षेत्राने बूस्टर दिला असून तो पुढील काळातही राहील, अशी अपेक्षा आहे.**

गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून मोफत धान्य दिले जात आहे. ही एकप्रकारे मोठी बाब म्हणावी लागेल. नियोजनबद्ध रितीने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. प्रामुख्याने डाळी, तेलबियांतदेखील देशाला आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न केले जात आहेत. शेतकरी सन्मान निधीने शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. व्याजमुक्त कृषी कर्ज, केसीसीची वाढती व्याप्ती आणि ई नावाची मंडई, डेअरीसारख्या प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन, साठवणूक वाढविण्याबरोबरच खत आणि बियाणांची वेळेवर होणारी उपलब्धता याचे सकारात्मक परिणाम हाती पडले.

'एनएसओ'च्या अहवालानुसार कृषी क्षेत्राचा जीडीपीतील वाटा ३.७ टक्के राहिला असून वर्षभरापूर्वी तो दीड टक्के होता. अशावेळी कृषी क्षेत्राची व्याप्ती आणखी वाढेल, अशी आशा आहे. शिवाय निर्यातीतही कृषी सेक्टर महत्त्वाची भूमिका बजावत आहे. प्रत्यक्षात अमेरिका अणि ट्रम्प यांचे लक्ष्य भारतीय कृषी क्षेत्र आणि दुग्धोत्पादन क्षेत्र आहे. त्यामुळे शुल्क आकारणीचा बडगा उगारला जात आहे. शुल्कवाढीचे रूप पाहता अमेरिकेसमोर मवाळ भूमिका घेण्याऐवजी भारत सरकारने पर्यायी मार्ग शोधण्यास सुरुवात केली. कदाचित आगामी तिमाहीत ट्रम्प शुल्काचा परिणाम दिसू लागला, तरी भारत सरकारने सुरू केलेले पर्यायी प्रयत्न पाहता त्याचा फार प्रभाव जाणवणार नाही, असे दिसते.

भारताने शुल्कवाढीचा मुकाबला करण्यासाठी कंबर कसली आहे. अर्थात, ट्रम्प यांना भारत सरकार सहजपणे शरण येईल, असा कयास बांधला. भारताची घाबरगुंडी उडेल, असे त्यांना वाटले होते; परंतु भारताने ट्रम्प यांच्या पोकळ धमक्यांना न भिता वाटचाल सुरू ठेवली आहे. अर्थात, ट्रम्प यांच्या आत्मघातकी धोरणांचा फटका अमेरिकेला कधी ना कधी बसेलच, हे विसरू नये. ट्रम्प यांचे धोरण पाहता अमेरिकी न्यायालयाने ट्रम्प यांच्या शुल्काच्या निर्णयाला बेकायदा ठरविले. आगामी काळात अमेरिकेत त्याचे परिणाम अधिक दिसतील. कारण, भारतीय आणि सरकारने ट्रम्प यांच्या धोरणाला नामोहरण करण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयारी केली आहे.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे, आगामी वर्षातदेखील शेती आणि शेतकऱ्यांसाठी सकारात्मक वातावरण राहील. रब्बीचे चांगले निकाल हाती आले आहेत. खरीप हंगामदेखील चांगल्या पावसाने बहरणार आहे. चांगली लागवड झाली आहे. पेरणीचे क्षेत्र वाढले आहे. सरकार देखील उत्पन्नाच्या ध्येयात वाढ करत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांची उपजीविका शेतीवर असल्याने साहजिकच खाद्यसुरक्षेची जबाबदारीदेखील याच क्षेत्राकडे येते. अमेरिकेच्या धोरणामुळे निर्यातीवर पडणारा प्रतिकूल परिणाम पाहता अन्य देशांना निर्यात वाढवत तुटीतील समतोल साधणे सरकारला कठीण जाणार आहे. त्याचवेळी शेतकऱ्यांच्या समस्या अजूनही कायम आहेत. आजही एकूण कृषी उत्पादनापैकी दहा ते पंधरा टक्के उत्पादन सुविधांच्या अभावामुळे वाया जात असल्याचे चित्र आहे. कृषी क्षेत्र संकुचित होत आहे.

वाढत्या शहरीकरणाचा परिणाम होत आहे. कृषी क्षेत्रात कोल्ड स्टोरेज, वाहतुकीची साखळी, गोदाम व्यवस्था या आघाडीवर अजूनही अपुरी सुविधा आहे. कृषी प्रक्रिया क्षेत्र आणि फूड पार्कसारख्या गोष्टी तातडीने कार्यान्वित होणे अपेक्षित असताना ते अजूनही प्रतीक्षेत आहे. पीक विमा क्षेत्रातही सुधारणा करणे गरजेचे आहे. शेतमालाची खरेदी आणि एमएसएमी खरेदी यासारख्या मुद्द्यावर वेगाने काम करायला हवे. कृषी क्षेत्रातील अंशदानाच्या थकबाकीला उत्पादनाशी जोडायला हवे, तसेच कृषी इनपुट म्हणजेच खते, बियाणे, कीटकनाशक आदींना किट रूपातून शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे आणि त्याचा लाभ अनुदानित रकमेऐवजी इनपुटच्या रूपाने दिल्यास उत्पादन आणि उत्पादकता वाढण्यास हातभार लागेल. याप्रमाणे खरेदी व्यवस्थेत अजूनही सुधारणा करण्याची गरज असून दलालांनादेखील बाजूला करण्याचे काम करायला हवे.

**नवनाथ वारे**

## 'सुकून' वसाहत : हिंदूंसाठी धोक्याची घंटा

नुकताच प्रसारमाध्यमांवर प्रसारित झालेला एक व्हिडिओ बघण्यात आला. त्यात रायगडमधील कर्जत येथे 'सुकून' नावाची मुसलमानांसाठीची एक वसाहत निर्माण होत असल्याचे दिसते. या वसाहतीसंदर्भात बुरखाधारी मुसलमान महिलेने हा व्हिडिओ प्रसारित केला आहे. त्यात तिने 'सुकून एम्पायर' या आस्थापनाचे विज्ञापन केले असून, कर्जत येथे केवळ मुसलमानांसाठी असलेली हलाल जीवनशैलीवर आधारित वसाहत उभी राहत असल्याचे सांगितले आहे.त्या महिलेने आपल्या व्हिडिओत म्हटले आहे की, 'समाजात आपल्याला तत्त्वांशी तडजोड करावी लागते; त्यापेक्षा इथे सुरक्षित जीवन जगता येईल.'धर्मनिरपेक्ष राष्ट्रात अशा वसाहतींना परवानगी कशी मिळू शकते? अशा वसाहतींना परवानगी देणे म्हणजे समाज ऐक्याला तडा देण्यासारखे आहे. अशा प्रकारची स्वतंत्र वसाहत जर विशिष्ट पंथासाठी निर्माण होत असेल, तर हा नक्कीच हिंदूंसाठी धोक्याचा इशारा नाही का?

आधीच हिंदूंना लँड जिहाद, हलाल जिहाद, लव्ह जिहाद, शिक्षण क्षेत्रातील जिहाद यांचा सामना करावा लागत आहे. त्यात अजून अशा प्रकारची वसाहत निर्माण होणे, ज्याची संपूर्ण जीवनशैली हलालवर आधारित असेल, त्यातून हलाल जिहादची पाळेमुळे निश्चितच खोलवर रुजली जातील. अशा वसाहतींच्या माध्यमातून घुसखोरांचे संघटन होण्यासाठी वेळ लागणार नाही. तसे झाले तर आज ज्या ठिकाणी हिंदू ८० टक्के आणि मुसलमान २० टक्के आहेत, तेथे हे प्रमाण उलटे होणारच.आज अनेक ठिकाणी मशिदी आणि मदरसे हे आतंकवाद्यांच्या निर्मितीची केंद्रे होत आहेत. 'सुकून' वसाहतीतही भविष्यात असे केंद्र निर्माण झाले तर छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांशी लढून हिंदवी स्वराज्य स्थापन केले आणि रायगडाला राजधानी बनवले. त्या राजधानीत 'सुकून एम्पायर' उभे राहणे हे निश्चितच धोकादायक आणि लाजिरवाणे आहे.हिंदू ऐक्याशिवाय आपले अस्तित्व सुरक्षित राहू शकत नाही. म्हणूनच आज हिंदूंनी जागृत होऊन कृतिशील राहणे ही काळाची गरज आहे.

**डॉ.स्वाती देशमुख,** नागपूर

## 'विनाशकाले विपरीत बुद्धी'

राजकारणात प्रोटोकॉल म्हणजेच शिष्टाचार किंवा करार, अत्यंत महत्त्वाचा असतो. यात पंतप्रधान, मंत्री, विरोधी पक्ष नेते आणि उच्च पदस्थ व्यक्तींनी कसे वागावे याचे काही नियम असतात. उदाहरणार्थ, देशाचा झेंडा फडकवताना किंवा लष्करी समारंभांमध्ये विशिष्ट शिष्टाचार पाळले जातात. अशाप्रसंगी उपस्थित राहणे हे केवळ राजकीय कर्तव्य नसून, राष्ट्रीय सन्मानाचा भाग असतो.काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी वारंवार लोकशाही मूल्यांचे हनन करत असल्याचा आरोप त्यांच्या कृतीतून दिसून येतो. पंतप्रधान मोदींना लक्ष्य करत असताना, त्यांनी त्यांच्या आईचाही राजकीय वादामध्ये समावेश केला. ज्या व्यक्ती आता या जगात नाहीत, त्यांना अशा प्रकारे राजकारणात ओढणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचे आहे. जर काँग्रेस आणि राहुल गांधींना असे वाटत असेल की या गोष्टींमुळे त्यांना राजकीय फायदा मिळेल, तर ती त्यांची सर्वात मोठी चूक ठरेल. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे,'विनाशकाले विपरीत बुद्धी' (विनाश जवळ आल्यावर बुद्धी विपरीत दिशेने काम करते). सध्या काँग्रेस आणि राहुल गांधींचे राजकारण याच दिशेने जात असल्याचे दिसते.

**अविनाश देशपांडे**

राष्ट्रीय पालक विश्रांती दिन

# पालकांच्या त्यागाला विश्रांतीचा सन्मान

मानवजातीच्या उत्क्रांतीत कुटुंबसंस्था ही सर्वात प्राचीन, शाश्वत आणि मूलभूत संस्था मानली जाते.समाजाचे शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत अस्तित्व टिकवून ठेवण्यामागे कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून या कुटुंबसंस्थेचे प्रमुख स्तंभ म्हणजे पालक आहेत. आई-वडील हे केवळ मुलांना जन्म देणारे नसतात, तर ते त्यांच्या आयुष्याचे पहिले शिल्पकार असतात.त्यांचा त्याग,कष्ट आणि समर्पण अमूल्य असते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे मुलांमध्ये चारित्र्य, जबाबदारीची जाणीव, संस्कृतीची परंपरा आणि समाजाशी जोडलेले मूल्य विकसित होतात. मात्र, या अखंड प्रयत्नांच्या प्रवास प्रक्रियेत पालक अनेकदा स्वतःचा त्याग करतात, आपली स्वप्ने बाजूला ठेवतात, स्वतःच्या आयुष्याकडे, आरोग्याकडे, विश्रांतीकडे दुर्लक्ष करतात आणि आयुष्याचा मोठा भाग कुटुंबासाठी समर्पित करतात. म्हणूनच पालकांच्या या त्यागाची जाणीव करून देत त्यांच्या आरोग्याला, मानसिक समाधानाला आणि सामाजिक योगदानाला सन्मान देण्यासाठी 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' ही संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाची ठरते.

समाजशास्त्रीय दृष्टीने विश्रांतीचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. विश्रांती म्हणजे फक्त शारीरिक आराम नव्हे, तर मानसिक शांतता, आत्मपरीक्षणाची संधी, निसर्गाशी संवाद, छंद जोपासणे आणि भावनिक ऊर्जेचा पुनर्भरण हा त्याचा व्यापक अर्थ आहे. पालकांच्या आयुष्यातील दैनंदिन जबाबदाऱ्या इतक्या प्रखर असतात की, त्यांना हे अनुभवायला वेळ मिळत नाही. परिणामी अनेकदा त्यांचे आरोग्य बिघडते, मानसिक तणाव वाढतो, कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो. अशा वेळी जर समाजाने पालकांना विश्रांतीचा दिवस दिला, तर तो त्यांच्यासाठी नव्या ऊर्जेचा श्वास ठरेल. समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती काही सामाजिक भूमिका पार पाडत असतो. पालकत्व ही अशी भूमिका आहे जी इतर सर्व भूमिकांपेक्षा अधिक व्यापक,गुंतागुंतीची आणि आजीवन असते. जन्मापासून ते प्रौढत्वापर्यंत मुलांच्या प्रत्येक टप्प्यावर पालकांची नवी जबाबदारी निर्माण होत राहते.मुलांचे शिक्षण, संस्कार, सुरक्षितता, रोजगारासाठीचे मार्गदर्शन, विवाह, सामाजिक प्रतिष्ठा या सर्व टप्प्यांवर पालकांचे श्रम सतत गुंतलेले असतात. या श्रमांमध्ये विश्रांतीसाठी जागा अनेकदा राहत नाही.

आधुनिक जगात पालकांवर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. शहरी जीवनशैलीत सकाळपासून रात्रीपर्यंतच्या धकाधकीत नोकरी, वाहतूक कोंडी, घरगुती कामे, मुलांच्या अभ्यासाची काळजी, आर्थिक नियोजन आणि सामाजिक जबाबदाऱ्या यामुळे पालकांच्या अंगावर दुप्पट ताण येतो. ग्रामीण भागात शेतीतील अनिश्चितता, हवामान बदल, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी आणि पारंपरिक सामाजिक अपेक्षा या कारणांनी पालकांची झुंज अखंड सुरू असते. अशा परिस्थितीत पालकांना एक दिवस जाणीवपूर्वक विश्रांती देणे म्हणजे त्यांच्या आरोग्याला आणि मानसिक शांतीला नवा श्वास देणे होय.मुलांनी एका दिवसासाठी पालकांची कामे आपल्या अंगावर घेतली, तर त्यांना पालकांच्या कष्टांची खरी जाणीव होईल.



हे केवळ घरापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजातील एकात्मतेलाही बळकटी देते. यामुळे पालकांबद्दल आदर, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना मुलांच्या मनात अधिक दृढ होते.

आरोग्याच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत उपयुक्त आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, ताण, चिंता, नैराश्य, हृदयरोग यांसारख्या समस्या पालकांमध्ये वाढत आहेत. यामागे सततची जबाबदारी, आर्थिक ओझे आणि विश्रांतीचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. पालकांचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम थेट मुलांच्या विकासावर व कुटुंबाच्या स्थैर्यावर होतो. त्यामुळे पालकांना विश्रांती देणे म्हणजे कुटुंबाच्या आरोग्याचे व समाजाच्या भविष्यातील सुरक्षिततेचे रक्षण करणे आहे.लिंगभावसमतेच्या दृष्टिकोनातूनही या दिवसाचे महत्त्व मोठे आहे.

तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात मुलांची जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यांत गुंतलेल्या मुलांना पालकांच्या त्यागाची खरी जाणीव होत नाही. या पार्श्वभूमीवर अशा दिवसांचे महत्त्व अधिक वाढते. मुलांनी पालकांसाठी स्वयंपाक करणे, घराची साफसफाई करणे, त्यांच्या छंदांमध्ये वेळ घालवणे किंवा फक्त त्यांच्यासोबत संवाद साधणे यामुळे पालकांना मानसिक समाधान मिळते आणि मुलांमध्ये जबाबदारीची जाणीवही दृढ होते. या दिवसाचे औपचारिकतेत रूपांतर न होता तो खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ होण्यासाठी शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि माध्यमे यांनी पुढाकार घ्यायला हवा. शाळांमध्ये पालकांविषयी कृतज्ञतेची निबंध स्पर्धा, वादविवाद, नाटिका यांचे आयोजन करता येईल. स्वयंसेवी संस्थांनी पालकांचा सन्मान करणारे कार्यक्रम घ्यावेत. माध्यमांनी पालकांच्या संघर्षांच्या प्रेरणादायी कथा समाजापर्यंत पोहोचवाव्यात. यामुळे समाजात पालकांविषयी आदराची जाणीव वाढेल आणि 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' एक व्यापक चळवळ बनेल.(लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्त्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)

**डॉ. राजेंद्र बगाटे**

मो. क्र. ९९६०१०३५८२

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# २०२६ पर्यंत जिल्ह्यातील १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मोफत मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अवादा'च्या ११सौर प्रकल्पांचे उद्घाटन




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत (एमएसकेव्हीवाय) २०२६ पर्यंत यवतमाळ जिल्ह्यातील १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मोफत मिळणार असल्याची घोषणा आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यवतमाळ येथे केली. यवतमाळ जिल्ह्यातील २८९ कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पाचे उद्घाटन आज देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान अवादा ग्रुप या वैविध्यपूर्ण ऊर्जा समुहाच्या वतीने जिल्ह्यात ११ सौर ऊर्जा प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आपला महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज मिळावी, यासाठी महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली, यात यवतमाळ जिल्ह्याने ३५ मेगावॅटचे प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील १४ हजार शेतकऱ्यांना दिवसा मिळणार आहे. पण २०२६ पर्यंत जिल्ह्यातील १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मोफत देण्याचा निर्णय सरकारने घेतला" असल्याचेही यावेळी त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अवादा ग्रुपचे अध्यक्ष विनीत मित्तल म्हणाले की, "या परिवर्तनात्मक प्रवासात महाराष्ट्र सरकारसोबत भागीदारी करणे हा आमचा सन्मान आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हे स्वच्छ ऊर्जा थेट ग्रामीण समुदायांचे उत्थान कशाप्रकारे करू शकते याचे एक मॉडेल म्हणावे लागेल. हा प्रकल्प माननीय मुख्यमंत्र्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची साक्ष आहे. जे शेतकऱ्यांसाठी विश्वासार्ह सौर ऊर्जा घेऊन आले आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण विकास आणि भारताच्या हरित ऊर्जा अभियानात योगदान देत आहेत." १६७ गावांमधील १४,८९३ शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत (एमएसकेव्हीवाय) विन्ही गावात ४ मेगावॅट, बाळदीमध्ये ३ मेगावॅट, डोंगरखर्डा येथे ३ मेगावॅट, बंसीत २ मेगावॅट, पाटण येथे २ मेगावॅट, म्हसोळाला ५ मेगावॅट, गाळ्यामध्ये २ मेगावॅट, पाथ्रडला २ मेगावॅट, परजाना येथे २ मेगावॅट, सावरगावमध्ये २ मेगावॅट आणि सारफळी येथे ३ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले.

सुमारे १६७ गावांमधील जवळपास १४,८९३ शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी उपक्रमांसाठी या सौर प्रकल्पांचा फायदा होईल.

# पुसद येथील चारचाकी वाहन बोलेरो चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - १९ ऑगस्ट रोजी फिर्यादी नामे दयानंद शिवाजी जाधव, रा. रामनगर पुसद यांचे मालकीचे बोलेरो चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.२६ व्ही.४५०७ पंध्रा-या रोजी चोरीला गेली त्याबाबत त्यांनी पोलीस स्टेशन-पुसद शहर येथे तक्रार दिली होती. त्यांचे तक्रारीवरून अप. क्रं. ४८५/२०२५ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपींचा व चोरी गेलेल्या बोलेरो चारचाकी वाहनाचा आमचे अधिनस्त पथकाकडुन शोध घेण्यात आला असता, गुन्ह्यामध्ये आरोपी क्रं. (१) संजय बाबुलाल बिनकर, वय ३९ वर्षे, रा. गिट्टी खदान, सुरेंद्रगड, नागपूर, क्रं. (२) मोहम्मद सज्जाद शेख मोहम्मद अलीम, वय ३० वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, नागपूर, यांनी सदर बोलेरो वाहन पुसद येथुन चोरी करून नागपूर येथे घेऊन जाऊन सदर वाहनाचे स्पेअर पार्ट वेगवेगळे /सुटे भाग केले. नमुद दोन्ही आरोपितांना विश्वासात घेऊन सदर गुन्ह्याचे संबंधाने विचारपूस केली असता, दोन्ही आरोपितांनी सदर वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबूली दिली त्यामुळे त्यांना नमुद गुन्ह्यात अटकेची कार्यवाही करण्यात आलेली आहे. बोलेरो वाहन चोरीच्या गुन्ह्यातील अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन आरोपी निष्पन्न करून त्यांची अटक कार्यवाही कुमार चिंता, जिल्हापोलीस अधीक्षक, यवतमाळ, अशोक थोरात,अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पुसद येथील अधिनस्त पथकातील पोउपनि/दिपक ढाईके, पोउपनि/ काळे, पोहवा/पंकज पातुरकर, पोलीस अंमलदार सचिन राऊत, सौरभ लोखंडे, नरेश नरवाडे, पराग गिरनाळे, कल्पना रबडे यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री व नेत्याच्या दौऱ्यावेळी कार्यकर्त्यांना स्थानबद्धता – लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ?



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राज्यात विविध भागांत नागरिकांचे प्रश्न, शेतीचे प्रश्न, रोजगार, पायाभूत सुविधा आणि शिक्षणाच्या समस्या यांसारख्या मुद्द्यांवर आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना स्थानिक प्रशासनाकडून अनेक वेळा 'स्थानबद्ध' करून ठेवले जात आहे. मुख्यमंत्र्यांच्या किंवा अन्य मान्यवर नेत्यांच्या दौऱ्यावेळी आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. लोकशाहीमध्ये मत मांडण्याचा आणि शासनाकडे न्याय मागण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला असताना अशा स्वरूपाची स्थानबद्धता चिंताजनक आहे. हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.यवतमाळ जिल्ह्यात मुख्यमंत्री साहेबांच्या भेटीच्या निमित्ताने अनेक शेतकरी नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांना पोलिसांनी स्थानबद्ध केल्याची उदाहरणे पुढे आली आहेत. विशेष म्हणजे या व्यक्तींवर कोणताही गंभीर गुन्हा नसताना केवळ प्रश्न विचारण्याच्या किंवा निवेदन सादर करण्याच्या हेतूने त्यांना पोलिस ठाण्यात ठेवण्यात येते. लोकशाहीच्या मूलभूत हक्कांना बाधा पोहोचवणारा हा प्रकार असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शासनाकडे आपल्या समस्या मांडण्याचा अधिकार दिला आहे. शासनाकडे निवेदन सादर करणे, आंदोलन करणे किंवा विरोध व्यक्त करणे ही लोकशाहीत स्वाभाविक प्रक्रिया आहे. तरीही स्थानबद्धतेच्या नावाखाली आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर बंधने घालणे म्हणजे त्यांच्या आवाजाला दडपण्याचा प्रयत्न मानला जातो. "प्रश्न विचारणे हा जर गुन्हा असेल, तर त्या गुन्ह्याचे स्वरूप काय?" असा सवाल सामाजिक कार्यकर्त्यांकडून विचारला जात आहे.

### इंग्रजकालीन परंपरा कायम ? – सुरज खोब्रागडे, संभाजी ब्रिगेड

स्वातंत्र्यानंतर अनेक कायद्यांमध्ये बदल होऊनही स्थानबद्धतेच्या नावाखाली नागरिकांचे आवाज दाबण्याची पद्धत आजही सुरू असल्याची टीका होत आहे. इंग्रजांच्या काळातील दडपशाही प्रशासनाची परंपरा आजही कायम असल्याचा आरोप विरोधकांसह सामान्य नागरिक करत आहेत. लोकशाहीसाठी धोकादायक अशी ही मानसिकता दूर करून लोकप्रतिनिधींना नागरिकांचे प्रश्न ऐकण्याची आणि समजून घेण्याची तयारी ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा – मनीष जाधव, शेतकरी नेते

मुख्यमंत्री स्वतः अनेक सामाजिक आंदोलनांमध्ये सक्रिय राहिले असून सामान्य नागरिकांच्या न्यायासाठी त्यांनी लढा दिला आहे. त्यामुळे त्यांच्या दौऱ्यावेळी स्थानबद्धता करण्याऐवजी संवाद आणि समन्वयाची यंत्रणा उभारणे हीच खरी लोकहिताची दिशा ठरेल. प्रत्येक नागरिकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली तर प्रशासन व जनता यांच्यात विश्वास आणि सहकार्याची नवी पायाभरणी होऊ शकेल.

# स्वागत बॅनर वरून पालकमंत्री, राज्यमंत्र्यांना डावलल्याचा आरोप

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्यक्रमात नागरिकांची गैरसोय




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यवतमाळ दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात लावण्यात आलेल्या स्वागत बॅनरमुळे राजकीय वादाला तोंड फुटले आहे. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या पुढाकाराने संपूर्ण शहरात बॅनर व झेंडे लावण्यात आले असले तरी त्यामधून जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड आणि आदिवासी राज्य मंत्री इंद्रनील नाईक यांचा उल्लेख किंवा फोटो वगळण्यात आला आहे. कार्यक्रम हा शासकीय असूनही पक्षाच्या चिन्हांसह बॅनर लावून शासनाच्या निधीवर पक्षाचा प्रचार केल्याचा आरोप स्थानिक पातळीवर जोर धरू लागला आहे.

आदिवासी मंत्री उईके यांचे नियोजन संशयाच्या भोवऱ्यात आले असून आदिवासी विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमासाठी सर्व घटकांना सहभागी करून घेण्याऐवजी काही निवडक नेतृत्वावर भर दिला गेल्याचा सूर आहे. यवतमाळ जिल्ह्यात विविध विकासकामांचे लोकार्पण व योजनांचे लाभ वितरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार असताना आदिवासी राज्य मंत्री इंद्रनील नाईक यांनी या कार्यक्रमाला पाठ फिरविली. "विसाळ नियोजनामुळे आणि स्थानिक नेतृत्वाला योग्य स्थान न दिल्याने" त्यांनी अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यांच्या अनुपस्थितीने कार्यक्रमाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून महायुती सरकारमध्ये अंतर्गत मतभेद असल्याची चर्चा रंगली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट आणि स्थानिक कार्यकर्त्यांची उपस्थिती नगण्य असल्याने कार्यक्रम एकतर्फी व पक्षाचा झाल्याचा आरोप होत आहे. विरोधकांसह काही स्थानिक नागरिकांनीही यावर टीका केली आहे की, "शासकीय कार्यक्रमाचा उपयोग पक्षीय प्रचारासाठी होणे अयोग्य आहे. प्रशासनाने सर्व घटकांचा समावेश करायला हवा होता." शहरभर लावलेल्या बॅनर आणि झेंड्यावर पक्षाचे चिन्ह स्पष्टपणे दिसत असल्याने शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याचा मुद्दा पुढे आला आहे. कार्यक्रमाची तयारी मोठ्या प्रमाणावर करण्यात आली असली तरी त्यात समाविष्ट असलेल्या घटकांविषयी पारदर्शकता नसल्याचा आरोप नागरिक व काही राजकीय विश्लेषक करत आहेत.

### प्रशासनाकडून कोणते स्पष्टीकरण मिळते?

जिल्हा प्रशासनाने अद्याप अधिकृत स्पष्टीकरण दिले नसले तरी सूत्रांनी सांगितले की, "कार्यक्रम शासकीय असला तरी स्थानिक पातळीवर काही विभागीय नेतृत्वाने पुढाकार घेऊन बॅनर तयार केले. सर्व समावेशकता राखण्याचा प्रयत्न झाला असला तरी काही समन्वयातील त्रुटी झाल्या असल्याची शक्यता आहे."

# मोटरसायकल व बकरी चोरी प्रकरणात आरोपीसह चार बालक जेरबंद



जनमाध्यम प्रतिनिधी

बाभुळगाव - पोलीसांनी अलिकडे घडलेल्या मोटरसायकल आणि बकरी चोरीच्या घटनांचा पर्दाफाश करत एका आरोपीसह चार विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यात यश आले असून परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १६ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२५ दरम्यान घारफळ, सावरखेडी, सरूळ आणि परसोडी परिसरातून चार मोटरसायकली व एक बकरी चोरीस गेली होती. यासंदर्भात बाभुळगाव पोलीस ठाण्यात एकूण पाच गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती.

घटनास्थळी मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलीसांनी आरोपींचा माग काढला. या तपासात पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धायेथील धनराज घटपकार (वय २१) आणि चार अल्पवयीन बालकांना ताब्यात घेण्यात आले. या आरोपींकडून एकूण १,५१,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यात चार मोटरसायकली आणि एक बकरीचा समावेश आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल.डी. तावरे आणि त्यांच्या पथकाने केली. पोलीसांच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे बाभुळगाव परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून पुढेही अशा घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस सतर्क राहणार असल्याचे सांगण्यात आले.

## वेचक

### पांढरकवड्यात ओल्या दुष्काळासाठी संमणक जनता पक्षाचे तहसीलदारांना निवेदन



पांढरकवडा: १२ सप्टेंबर २०२५ रोजी संमणक जनता पार्टी तालुका पांढरकवडा मा. विजय भाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वात माननीय तहसीलदार साहेब निवेदन देण्यात आले ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट पन्नास हजार रुपये हेक्टरी अनुदान द्या याकरिता निवेदन देण्यात आले त्याप्रसंगी विकास भाऊ चव्हाण गोरसेना तालुका अध्यक्ष डॉक्टर जितेंद्र चव्हाण संघटक कृष्णा भाऊ चव्हाण तालुका उपाध्यक्ष महेश भाऊ राठोड प्रभारी सर्कल अध्यक्ष रामराव भाऊ राठोड तालुका उपाध्यक्ष निखिल भाऊ राठोड बंजारा संघटक रमेश मुंडे व शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या एक पांढरकवडा तालुका ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा दोन पीक कर्ज माफ करण्यात यावा तीन सरसकट हेक्टरी ५०,००० रुपये मदत देण्यात यावी ४ पिक विमा तातडीने मंजूर करण्यात यावा ५ शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची शाळेची फि महाविद्यालयीन फी माफ करण्यात यावी.

### यवतमाळ पोलिस अधीक्षकांना मानव अधिकार आयोगाचे समन्स

यवतमाळ : महाराष्ट्र राज्य मानव अधिकार आयोग, मुंबई यांनी यवतमाळ जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांना तातडीने समन्स बजावले आहे. केस क्र. 1620/13/32/2025 अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून सुनावणी ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार पोलिस अधीक्षकांनी प्रत्यक्ष, VC किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहून आपले लिखित उत्तर आणि आवश्यक कागदपत्रे दाखल करणे बंधनकारक आहे. तक्रारीतील मुद्द्यांवर बचावासाठी आवश्यक पुरावे जोडून बाजू सादर करावी, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. आयोगाने इशारा दिला आहे की, अनुपस्थितीच्या परिस्थितीत कायद्यानुसार एकतर्फी निर्णय दिला जाईल. या प्रकरणाची तक्रार धीरज राजू गेडाम (रा. आर्णी, जि. यवतमाळ) यांनी दाखल केली आहे. विशेषम्हणजे, हे प्रकरण महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना जिल्हा अध्यक्ष अभिजीत नानवटकर यांनी प्रथमच उघडकीस आणले होते. त्यानंतर मनसेच्या माध्यमातून या अन्यायाविरुद्ध विविध तक्रारी नोंदविण्यात आल्या होत्या. मनसे विद्यार्थी सेनेने सुरुवातीपासूनच या लढ्यात गोरगरिब, श्रमिक आणि पीडित घटकांच्या पाठीशी उभे राहत न्यायासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

### विज्ञान नाट्य स्पर्धेत अभ्यंकर कन्या शाळेचे सुयश



यवतमाळ - येथील जायंट इंग्लिश मिडीयम स्कूल, आर्णी रोड, यवतमाळ येथे आयोजित तालुका स्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत अभ्यंकर कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला. 'सर्वांसाठी स्वच्छता' या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित नाट्य सादरीकरणातून विद्यार्थिनींनी स्वच्छतेचे जनजागृतीपर संदेश प्रभावीपणे मांडले. त्यांच्या अभिनय, सादरीकरण आणि विषयाच्या सखोल अभ्यासामुळे त्यांना परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. या यशासाठी शाळेच्या विद्यार्थिनींना निखिल थारकर सर, ढवाले सर आणि घुगे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षणासोबत सामाजिक जागरूकतेचे महत्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींनी विज्ञान आणि समाज यांचा मेळ कसा साधता येतो याचे उत्तम उदाहरण घालून दिले. शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले असून अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले.

### यवतमाळ जिल्ह्यात गणित संबोध परीक्षा 18500 विद्यार्थी सहभागी होणार

यवतमाळ : शिक्षण विभाग जिल्हा परिषद यवतमाळ व जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची गणितातील अभिरुची वाढावी, गणित विषयातील संकल्पना स्पष्ट व्हाव्यात तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी व्हावी या उद्देशाने गणित संबोध परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. रवींद्र काटोलकर शिक्षणाधिकारी माध्यमिक व प्रकाश मिश्रा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा जिल्ह्यातील सर्व 16 तालुक्यांमध्ये दिनांक 13 सप्टेंबर 2025 रोजी पार पडणार आहे. ही परीक्षा सर्व माध्यमांच्या पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी असून यासाठी जिल्ह्यातून तब्बल 18,500 विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. जिल्हाभरात सुमारे 200 परीक्षा केंद्रांची निश्चिती करण्यात आली असून परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभाग तसेच गणित अध्यापक मंडळाचे आजी-माजी पदाधिकारी व नियुक्त शिक्षकांचे भरारी पथक कार्यरत राहणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाची तात्काळ दुरुस्ती करा ; अन्यथा भिकमांगो आंदोलन

## भिम आर्मीचा निवेदनाद्वारे इशारा

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय दुरुस्तीचे काम दीर्घकाळापासून रखडले असून हे काम तात्काळ पूर्ण व्हावे, अन्यथा जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा भीम आर्मीच्या वतीने दिलेल्या निवेदनातून नगर परिषदेला दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वाचनालय हे समाजजागृती आणि विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे केंद्र आहे.मात्र वाचनालय बंद असल्याने वाचनालयाच्या दुरुस्ती व पुर्नउभारणीसाठी भीमआर्मीने अनेक वेळा निवेदन देऊन पाठपुरावा केला होता.यानंतरही आजपर्यंत वाचनालयाचे काम पूर्ण झालेले नाही. 17 जुलै 2025 रोजी भीमआर्मीच्या वतीने मुख्याधिकारी सचिन गाडे यांची भेट घेऊन याबाबत विचारणा केली तेव्हा निधीअभावी काम थांबले असल्याचे कारण त्यांनी सांगितले असे निवेदकांचे म्हणणे आहे. दि. 9 सप्टेंबर 2025 रोजी नगरपरिषदेला भीमआर्मीच्या कार्यकर्त्यांनी पुन्हा निवेदन दिले. या निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला की,येत्या आठ दिवसांच्या आत म्हणजेच दि.16 सप्टेंबर 2025 पर्यंत वाचनालयाच्या कामाला सुरुवात झाली नाही, तर भीमआर्मी तर्फे नगरपरिषदेसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या परिसरात भिकमांगो आंदोलन उभारले जाईल. या आंदोलनासाठी भीमआर्मीने सर्व समाज बांधव आणि कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. "आंबेडकर वाचनालय हे फक्त एक इमारत नसून आमच्या विचारांचा, आमच्या लढ्याचा आणि शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्याचे काम थांबवणे आम्हाला मान्य नाही.कामाला त्वरित सुरुवात झाली नाही तर तीव्र आंदोलन करून प्रशासनाला जाग आणू," असे भीमआर्मी वणी विधानसभा अध्यक्ष रविंद्र उर्फ बबलू मेश्राम यांनी सांगितले.



# जय सेवालालच्या जयघोषाने दुमदुमली उमरखेड नगरी !

## हजारोंच्या संख्येत बंजारा बांधव एसटी आरक्षणासाठी उपविभागीय कार्यालयावर धडकले !



जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड : बंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेटमध्येअसलेल्या अनुसुचीत जमाती नोंदी नुसार एसटी प्रवर्गात आरक्षण देण्यात यावे या एकमेव मागणीसाठी आज उमरखेड सकल बंजारा समाजाच्या वतीने हजारो समाज बांधवांचा मोर्चा काढून उपविभागीय कार्यालयावर नेण्यात आला . यावेळी पोहरादेवीचे महंत जितेंद्र महाराज यांनी भारत सरकारने बंजारा समाजाला प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या सवलती देऊन धोका केला असल्याचे प्रतिपादन केले.

सकल बंजारा समाजाच्या वतीने स्थानीक कृषी उत्पन्न बाजार समिती शेड मध्ये प्रथमतः पोहरादेवी येथील महंत जितेंद्र महाराज,गोरसेनेचे संस्थापक अध्यक्ष संदेश चव्हाण, सत्यपाल महाराजांचे शिष्य पंकज महाराज ,प्रा. कैलास राठोड (नांदेड ) यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा घेण्यात आली. या सभेत बोलतांना जितेंद्र महाराज म्हणाले की, १९५० मध्ये पहिल्या पंतप्रधान व राष्ट्रपतीकडून बंजारा समाजावर अन्याय झाला आहे . बंजारा समाज हा वेशभुषेने, खानपानाने, राहणीमानाने हा देशातला पहिला आदिवासी आहे.. आदिवासी समाजाला सांगणे आहे की, आम्हाला आमच्या हक्काचे आरक्षण पाहिजे , आदिवासी समाज बांधवांचे आरक्षण नको आहे . आम्ही वेगळी वर्गवारी करून आम्हाला आदिवासी जमातीचे आरक्षण हवं कारण बंजारा समाज ही जात नसून जमात आहे असे सांगून जितेन्द्र महाराज यांनी कर्नाटक, आंध्रप्रदेश व आताच्या तेलंगणा राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात आरक्षण घेतल्याशिवाय राहणार नसल्याचे सांगितले. यावेळी गोरसेनेचे संस्थापक अध्यक्ष संदेश चव्हाण म्हणाले की, आम्हाला आदिवासी समाज बांधवांच्या ताटातल आरक्षण नाही पाहिजे तर आमची वेगळी आदिवासी जमात म्हणून वर्गवारी करून आम्हाला आदिवासी म्हणून आमची मागणी राहणार असल्याचे सांगितले. यावेळी उमरखेड सकल बंजारा समाजाचे उत्तम राठोड , मोहन नाईक , रमेश चव्हाण, रवि रुडे, श्रीपाल आडे, अनिल राठोड ,कान्हा जाधव, बबलू जाधव, संतोष जाधव, विक्रम राठोड, संतोष मुडे, शैलेश ताजवे, तुळशीराम राठोड, अर्जुन जाधव, गोपाल राठोड , उत्तम जाधव, युवराज पवार, डॉ राम नाईक, रमेश आडे , डॉ . प्रतिक रुडे, शंकर जाधव , नंदु जाधव यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक - संचलन प्रा. कैलास राठोड यांनी केले तर आभार अनिल राठोड यांनी मानले.

### बंजारा समाजासोबत भारत सरकारने धोका केला - पोहरादेवी महंत - जितेंद्र महाराज

# 29 वी जयंत नागरी सहकारी पतसंस्था वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - १३/०९/२०२५ रोजी अध्यक्ष अरुण भिसे यांच्या अध्यक्षतेखाली उत्सव मंगल कार्यालय, अवधूतवाडी, यवतमाळ येथे संपन्न झाली. अध्यक्ष पर भाषणात मा. अध्यक्षांनी संस्थेचा २०२४-२५ या वर्षाचा वार्षिक प्रगती अहवाल सादर केला. सभासदांनी सर्वानुमते या अहवालास मान्यता दिली.

संस्थेच्या वाढत्या प्रगतीबद्दल मदन फळेगावकर, वैद्य साहेब, खडसे साहेब यांनी मनोगत व्यक्त केले. या सभेमध्ये उत्कृष्ट ठेवीदार व कर्जदार यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेने उत्कृष्ट शाखा व्यवस्थापक म्हणून बाजोरिया नगर शाखेचे शाखा व्यवस्थापक पंकज उदार यांचा आणि चारही शाखांतील उत्कृष्ट कर्मचारी व दैनिक आवर्तन प्रतिनिधी यांचा संचालक मंडळाच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता संस्थेचे मा. उपाध्यक्ष प्रदीपभाई बनगिनवार यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग तसेच दैनिक आवर्तनचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामुळे संपूर्ण सभा आनंदमय वातावरणात पार पडली.

# पुसद परिसरात सततच्या पावसाने शेती पिकांचे प्रचंड नुकसान; तर जनजिवन विस्कळीत !




जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - मागील दोन दिवसां पासून पुसद व परिसरात पडत असलेल्या सततच्या पावसाने शेती पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून जनजीवन सुद्धा विस्कळीत झाले आहे. गेल्या वर्षी पोळ्यानंतरच पावसाने पूर्णपणे उघडीप दिली होती परंतु यावर्षी सतत पडत असलेल्या पावसामुळे खरीप पिके पिवळी पडली असून सोयाबीन तूर कापूस या पिकांना मर रोगाने ग्रासले आहे. त्यामुळे पुसद परिसर व पुसद तालुक्यात ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

यंदा जुनच जुलै महिन्यात सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला होता. असे असतांना पीक परिस्थिती चांगली होती. मात्र ८ऑगस्ट नंतर पावसाचे जोरदार पुनरागमन होऊन ऑगस्ट महिन्यात सरासरी पेक्षा पावसाची जास्त नोंद झाली. सप्टेंबर महिन्यात तर अवघ्या आठ दिवसात पूर्ण सप्टेंबर महिन्याच्या सरासरीची बरोबरी करणारा पाऊस झाला आहे. मागील दोन दिवसापासून पुन्हा मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे नदी नाल्यांना पूर आले आहेत. पूस धरण १०० टक्के भरून ओव्हर फ्लो झाले आहे. सतत च्या पावसाने शेतातकामे करणे अवघड झाले असून ओल्या दुष्काळाचे सावट पसरले आहे. तर दुसरीकडे शहरातील अनेक नाल्या व नाले ओव्हर फ्लो होऊन रस्त्यावर पाणी जमत आहे. सतत त्या पावसामुळे नागरिक घराबाहेर पडत नसल्याने सर्वच छोट्या मोठ्या धंद्यांवर परिणाम झाला असून पुसद शहरासह ग्रामीण भागातही शुकशुकाट दिसत आहे. अजून पर्याचा पाऊस बाकी असल्याने हाताल तोंडाशी येणारे पिके हातातून जाणार की काय याबाबत शेतकरी काळजीत पडले आहेत. पुढील परिस्थिती ही फार बिकट असल्याची असे दिसून येत आहे.

# महागाव ते करंजखेड रस्त्याचे काम त्वरीत करा - संदीप ठाकरे



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव : महागाव ते करंजखेड रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. जागो - जागी रस्त्यांवर खड्ड्याचे साम्राज्य झाले असून रस्त्यावरील पुलांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. या रस्त्याच्या कामाची सुरुवात तात्काळ करा अशी मागणी संदीप ठाकरे यांनी केली आहे.

मागील पंधरा वर्षांपूर्वी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या रस्त्याचे काम करण्यात आले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर देखभाल सुद्धा करण्यात आली नसून त्या रस्त्याची अवस्था अत्यंत गंभीर झालेली आहे. पंधरा वर्षांचा काळ ओलांडला असून अजूनही त्या रस्त्यावर साधी डागडुगी सुद्धा करण्यात आली नाही. नागपूर ते तुळजापूर या नॅशनल हायवेचे काम सुरू असताना त्या संबंधित कंपनीची सर्व वाहतूक याच रस्त्यावरून जात होती. त्या जड वाहतुकीमुळे या रस्त्याची अशी गंभीर अवस्था झाली आहे. या रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी दररोज येणे जाणे करत असतात. त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यामुळे अनेकांची कामे प्रलंबित पडली असून नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मागील आठवड्यापूर्वी झालेल्या पावसामुळे या रस्त्यावरील पुलांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. त्यामुळे वाहनधारक करंजखेड येथे जाण्यास नकार देत आहेत. या रस्त्याचे काम त्वरित करा अशी मागणी संदीप पाटील ठाकरे यांनी केली आहे.

**या रस्त्याची अवस्था अत्यंत गंभीर झाली असून वारंवार मागणी करून सुद्धा रस्त्याचे काम करण्यात येत नाही लवकरात लवकर रस्त्याचे काम न केल्यास जनहितासाठी आंदोलन उभारू.**

**अविनाश भांगे (ग्रामस्थ करंजखेड)**

# अंजनगाव बारी परिसरातील सोयाबीन पीक पाण्याखाली

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

सध्यस्थितीत परिसरातील १२ गावांतील अडीच हजार हेक्टर सोयाबीन पिक पाण्याखाली असुन, ८५ टक्के सोयाबीन पिकांवर आधीच मोझेंक रोगाचा प्रादुर्भाव होता. यासाठी विवीध औषधांच्या फवारण्या करून सोयाबीन पिकाला वाचविण्याचे प्रयत्न शेतकरी करित होता मात्र अतिवृष्टीमुळे सर्वप्रकारच्या निष्फळ ठरल्या. तर २० टक्के सोयाबीन पिक रोगा अभावीच



उभे आहे, ज्याला शेतकरी नरगा सोयाबीन संबोधतात. अशाप्रकारे

## ८५ टक्के सोयाबीन पिकावर यलो मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव

परिसरातील जवळपास ९० टक्के सोयाबीन पूर्णपणे बुडाले आहे.

पेरणी झाल्यानंतर वरुण राजाने वेळोवळी अगदी आवश्यक त्यावेळी हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला होता. प्रफुल्लीत दिसत असलेले फुलांवर आलेले सोयाबीन पीक यलो मोझेक सारख्या रोगामुळे कमकुवत होत चालले असता, या पिकांवर फवारणीचा बळीमार सुरु झाला. ज्यावेळी पिकाला उन्हाची आवश्यता होती. पावसाने सुरुवात करून फवारणीला अपयशी केले. ज्यामुळे शेंगा भरल्या नाही. सोयाबीन पिक पाण्याखाली आले. फक्त बोटावर मोजाव्या इतकेच शेतकरी सोयबीन पिकाची सोंगणी करणार असे शेतकऱ्यांमध्ये बोलल्या जात आहे.

परिसरातील अंजनगाव बारी, पार्डी, वडगाव जिरे, उदखेड, अऱ्हाड कुऱ्हाड, भानखेड बु., भानखेडा खुर्द, मोगरा, हातला, कस्तुरा, अमरापुर, गोविंदपूर, वडद, इंदला, बैलपूर, खिरसाना, निरसाना, सावनेर, टिमटाला, निभोंर इ. गावातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून यांची ही दसरा-दिवाळी अंधारात जाणार यात शंका नाही.

# मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या

### वाहतूकीस अडथळा



**कुऱ्हा/वार्ताहर**

गेल्या कित्येक दिवस पासून मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट आहे की,ऐन रस्त्याच्या मधोमध जनावरे आपले ठिय्या आंदोलन करीत आहे.त्यामुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत आहे.

यामध्ये कुऱ्हा बस स्थानक चौकात तसेच अमरावतीकडे व तिवस्याकडे जाणाऱ्या जुना बस स्टॉप वर रस्त्याच्या मधेच मोकाट जनावरे बसतात.त्यामुळे वाहनधारकांना आपले वाहन कोणत्या मार्गाने काढावे हे मात्र कळत नसून यामध्ये अपघात झाला तर त्याला कोण दोषी राहील असाही गंभीर प्रश्न वाहनधारकांसमोर येत आहे.वरील तिनही ठिकाणी बसणाऱ्या मोकाट जनावरांचे ठिय्या आंदोलन कोण व केव्हा हटविणार याकडे मुख्य रस्त्यांवरील चालविणाऱ्या छोट्या मोठ्या वाहनधारकांची मागणी असून या कडे संबंधितांनी लक्ष वेधावे.

# बसस्थानक परिसरात चिखलाचे साम्राज्य

**कुऱ्हा/वार्ताहर**

चांदुर रेल्वे आगारा अंतर्गत कुऱ्हा येथील पाच ठिकाणी एसटी जा-ये करतात अशा बस स्टॉप वर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते.त्या खड्ड्यांमध्ये लाल मुरुम टाकून बुजविण्यात आले परंतु पावसाच्या पाण्यामुळे संपूर्ण बस स्थानक परिसरात चिखल सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यामुळे प्रवाशांना व विद्यार्थ्यांना पायदळ चालणे कठीण झाले आहे.

सध्या स्थिती पावसाचे दिवस सुरू असल्याने आदीच बस स्थानक परिसरात मोठे खड्डे पडले होते. सदरची समस्या गेल्या तीन वर्षापासूनची असून निव्वळ तात्पुरती मलमपट्टी करण्यात येत आहे मात्र खड्डे पडणे सुरूच आहे.त्यामुळे असा



प्रश्न उपस्थित होतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कुऱ्हा बस स्थानकावर लक्ष आहे की नाही असाही प्रश्न उपस्थित होतो.तरी सदर समस्येवर तातडीने लक्ष देऊन सदरचा प्रश्न मार्गी लावून ग्रामस्थ प्रवासी व विद्यार्थ्यांची सोय करण्यात यावी.येथील बस स्थानका मधील चिखल साफ करण्यासाठी ठोस उपाययोजना करून प्रवाशांना दिलासा

> बसस्थानक परिसरात दरवर्षी पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरते परंतु एकदा कायमस्वरुपी या परिसरातील खड्ड्यांचे काम करण्यात यावे.
>
> **नितीन वरठी**
> माजी उपसरपंच
> ग्रा.प.कुऱ्हा

द्यावा.कुऱ्हा बस स्थानका वरून चांदुर रेल्वे, तिवसा, धामणगाव रेल्वे, आर्वी, अमरावती अशा मार्गाने दररोज एसटी बसेस सुरू आहेत.तेव्हा कुऱ्हा बस स्टॉप आतील चिखल तसेच स्वच्छता गृहामधील घाण पाणी व साफसफाई त्वरित करावी.या आधी सुध्दा बरेच वेळा विविध वृत्तपत्रांतून मागणी केली असता अद्यापही स्वच्छता गृहामधील घाण व स्वच्छता आणि याठिकाणी पाण्याची व्यवस्था झाली नाही.

> बसस्थानक परिसरात खड्डे पडल्यामुळे त्यात साचलेल्या पाण्यामुळे झालेल्या चिखलाबाबत वरिष्ठांना वारंवार सुचना देऊन पत्रव्यवहार सुध्दा आलेला आहे.
>
> **जयसेन इंगळे**
> वाहतूक नियंत्रक

# सर्वपित्री अमावस्येला असलेली नवभारत साक्षरता चाचणी पुढे ढकला

### प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालकांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत रविवार २१ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यात असाक्षरांची चाचणी आयोजित केली आहे.ही चाचणी पुढे घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्य शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंग,शिक्षण संचालक योजना कृष्णकुमार पाटिल व राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक आणि सर्व शिक्षणाधिकारी योजना यांना निवेदन सादर केले आहे.अशी माहीती प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

राज्यातील ग्रामीण सर्वदूर भागात सर्व पित्री (पितृ मोक्ष) अमावस्येच्या दिवशी प्रचलित रूढी परंपरेनुसार श्राद्धाचे



कार्यक्रम आयोजित केले जातात. नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत होऊ घातलेली चाचणी पितृ मोक्ष अमावस्येच्या दिवशीच येत आहे. पितु मोक्ष मोक्ष अमावस्येमुळे परीक्षार्थी असाक्षर चाचणीच्या दिवशी उपस्थित राहणारच नाही. त्यामुळे रविवार २१ सप्टेंबर ची चाचणी संस्थगीत करून पुढे घेण्यात यावी अशी विनंती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे,राज्य सल्लागा विजयकुमार पंडित,महादेव पाटील माळवदकर,राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, आनंदा कांदळकर,विलास कंटेकुरे,राज्य कार्याध्यक्ष सयाजी पाटील,राज्य कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर,राज्य संघटक राजेंद्र खेडकर,सुरेश पाटील,राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील,सतिश सांगळे,राज्य संपर्क प्रमुख किशन बिरादार,राज्य प्रवक्ता नितीन नवले,राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर,राज्य ऑडिटर पंडित नागरगोजे,महिला आघाडी प्रमुख वर्षा केनवडे,नपा-मनपा आघाडी प्रमुख सुधाकर सावंत,जुनी पेन्शन आघाडी प्रमुख प्रफुल्ल पुंडकर,ऊर्दू आघाडी प्रमुख सैय्यद शफीक अली यांनी अमरावती येथिल सहाय्यक शिक्षण उपसंचालक बुध्दभूषण सोनोने यांना केली आहे.

# सतीधाम मार्केटची गॅलरी कोसळली, जीवितहानी नाही

### अग्निशमन दल व पोलिस घटनास्थळी

**अमरावती/का.प्र.**

शहरातील सरोज चौक परिसरात शुक्रवारी रात्री घडलेल्या एका धक्कादायक घटनेत सतीधाम मार्केटच्या दर्शनी भागातील गॅलरीचा मोठा भाग अचानक कोसळला. रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सरोज चौकातील सतीधाम मार्केट ही सुमारे ४० ते ४५ वर्षे जुनी इमारत असून, तिच्या दर्शनी गॅलरीचा एक भाग अचानक कोसळून रस्त्यावर पडला. सरोज चौकातून कॉटन मार्केटकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या या अरुंद मार्गाला संगित गल्ली म्हणून ओळखले जाते. सतीधाम मार्केट आणि आजूबाजूला दुकाने व व्यापारीपेठ असल्याने या मार्गावर नेहमी दिवसभर मोठी वर्दळ असते. पण रात्री दुकाने बंद झाल्याने आणि रस्ता सुनसान असल्याने कोणताही नागरिक ढिगाऱ्याखाली अडकला नाही. परिणामी मोठा अनर्थ टळला. घटनेच्या वेळी जवळच महाकाली नवरात्रोत्सव मंडळाचे काही युवक कार्यकर्ते चर्चा करत उभे होते. अचानक झालेल्या मोठ्या आवाजाने त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सुदैवाने कोणीही जखमी झाले नसल्याचे लक्षात आल्याने सर्वांना दिलासा मिळाला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि शहर कोतवाली पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी इमारतीची पाहणी केली. प्राथमिक अंदाजानुसार सतत पडणाऱ्या पावसामुळे इमारत जर्जर झाली असून त्यामुळे गॅलरीचा भाग कोसळल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जुन्या इमारतींची तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक पातळीवर जोर धरत आहे.

# १६ रेशन दुकानदारांचे परवाने रद्द

### २० लाखांहून अधिक दंड वसूल

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील शासकीय उचित मूल्य दुकाने म्हणजेच कंट्रोल दुकाने लाभार्थ्यांना धान्य व आवश्यक वस्तू पुरविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, अनेक ठिकाणी होत असलेल्या गडबडीनंतर जिल्हा पुरवठा विभागाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एक दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला असून तब्बल १६ दुकानदारांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. तर ५२ दुकानदारांकडून २० लाख १४ करण्यात आला आहे. जिल्ह्यात कारवाई मानली जात आहे.

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत जिल्ह्यात १९१६ कंट्रोल दुकाने कार्यरत आहेत. या माध्यमातून अंत्योदय गटातील सुमारे १.२८ लाख व प्राधान्य गटातील ३.७४ लाख कार्डधारकांना दरमहा हजार १६५ रुपयांचा दंड वसूल गहू, तांदूळ तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वितरण केले आतापर्यंतची ही सर्वात मोठी जाते. या प्रचंड पान २ वर इतर प्रमाणावरील व्यवस्थेमुळे काटेकोर नियंत्रण व नियमित तपासणी आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे. एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत पुरवठा विभागाने १५६१ दुकानांची तपासणी केली. यामध्ये ३५ दुकानदारांकडून किरकोळ दोष आढळले, एका दुकानात मध्यम गडबडी नोंदली गेली, तर १६ दुकानांत गंभीर गडबडी उघडकीस आल्या. त्यामुळे या १६ दुकानदारांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. एका दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. गडबडी आढळलेल्या दुकानदारांकडून दंडात्मक कारवाई म्हणून एकूण २० लाख १४ हजार १६५ रुपयांची वसुली करण्यात आली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी सांगितले की, कंट्रोल दुकाने ही थेट विभागाच्या नियंत्रणाखाली आहेत. लाभार्थ्यांकडून येणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कारवाई केली जाते व नियमभंग करणाऱ्यांना कुठल्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. जिल्हा प्रशासनाने केलेल्या या धडक कारवाईमुळे कंट्रोल दुकानदारांमध्ये एक प्रकारची धाक निर्माण झाला - असून, लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य व इतर वस्तू मिळाव्यात यासाठी ही मोहीम सातत्याने सुरू राहणार असल्याचे संकेत दिले जात आहेत.


# असंख्य गणेशभक्तांचा राजेवीर संभाजी मंडळाच्या विसर्जन सोहळ्यात सहभाग

### महाकाली नृत्य,पारंपारीक लेझीम सादर

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

शहरातील इंदिरा नगरातील राजे वीर संभाजी गणेशोत्सव मंडळाची विसर्जन मिरवणूक दुर्ग येथील आनंद धुमाल,चंडमुंड संहार महाकाली नृत्य व पारंपारिक वेशभूषेत लेझीम च्या गजरात शहरातून निघालेली ही विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी वरूणराजाचे आगमन झाले.असंख्य गणेशभक्तांनी विसर्जन सोहळ्यात सहभाग घेत आंनद उत्साहात बाप्पाला निरोप दिला.

शहरातील राजे वीर संभाजी गणेशोत्सव मंडळ मागील २५ वर्षापासून लालबागच्या राज्याची प्रतीकृती स्थापन करीत असून गणेशोत्सवाच्या दरम्यान विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. ज्या मध्ये स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,लहान मोठ्या करीता विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधन, किर्तन, व्याख्यान,रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, हृदयरोग तपासणी, महिलांची कॅन्सर तपासणी, दंत शिबीर ,वृक्षारोपण व ग्राम स्वच्छता अभियान,शासन निर्देशित कार्यक्रम ज्या मध्ये आधार कार्ड नोंदणी,फार्मर आयडी जन जागृती अभियान राबविले.परंपरेनुसार स्वं.बाळासाहेब ठाकरे चौकात पोलिस विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. ही गणरायाची विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली. यामध्ये चंडमूड संहार महाकाली नृत्य व पारंपारिक वेशभूषेत गणरायाच्या भजनावर लहान मुलींची लेझीम व धुमाल पथक पाहण्यासाठी शहरात चौकाचौकांत हजारो भाविक गर्दी करीत होते.विसर्जन मिरवणूक इंदिरा,राधा,मंगलमूर्ती,राम नगर मधून स्वं बाळासाहेब ठाकरे मुख्य चौक वरून सरस्वती धरणावर विधिवत विसर्जन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त केला होता.विसर्जन मिरवणूकीत मंडळाचे सर्वच सदस्य व महिला,युवती,लहान मुले व वरीष्ठ नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त

### दिपक भोरे यांची नियुक्ती



**अचलपूर-** प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने नुकताच पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रहार पक्षाचे निष्ठावान पदाधिकारी व नेहमी जनसामान्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सक्रिय असलेले दिपक भोरे यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या अचलपूर तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडु,कार्याध्यक्ष बल्लू जवंजाळ, संजय देशमुख ,मंगेश देशमुख, विलास बोंडे, अमोल ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.

### गजानन काकडे यांचा सन्मान



**अमरावती-** नुकताच जिल्हा परिषद अमरावती जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सुप्रसिद्ध कवी, भजन मंडळाचे हार्मोनियम वादक , गायक गजानन काकडे मुख्याध्यापक जि.प.शाळा सालोरा पं.स.तिवसा यांना त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यासाठी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे मा.श्वेता सिंघल विभागिय आयुक्त अमरावती विभाग, मा.संजिता महापात्र, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.विनायकराव धुळे अध्यक्ष गुरुकृपा भजन मंडळ रहाटगाव यांचे अध्यक्षतेखाली व गंगाधरराव ठाकरे ,दिवाकरराव वाघ यांचे प्रमुख उपस्थितीत गुरुकृपा भजन मंडळाचे पदाधिकारी तथा सदस्य गण यांनी गजानन काकडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले आणि यथोचित सत्कार केला.यावेळी गुरुकृपा भजन मंडळाचे पदाधिकारी व सदस्य गजानन नेहारे, प्रकाश कांडलकर , मुनेश्वर उमप, नरेंद्र गुल्हाणे, नरेश राऊत, नंदकिशोर पाचघरे, प्रदिप मांडवकर, राजेंद्र कुटे, संजय बेले, सुनिल अडिकणे,संजय उमप, नरेंद्र टाले, विजय गावंडे, अशोक पकडे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातर्गत कार्यशाळा

**अंजनगाव बारी-**



तिवसा विधानसभा मतदार संघ अमरावती व भातकुली पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळेचे आयोजन सिकची रिसोर्ट येथे करण्यात आले होते. यावेळी आ. राजेश वानखडे, सुदर्शन तुपे, अंकिता लाड, सुनील राणा, अजय घुले, तुषार दाडंगे, प्रवीण वानखडे, प्रदीप गौरखेडे, अमरदीप तेलखडे, श्याम गवळी, सोपान गुडधे, सचिन मालकर, मामा साहेब निर्मल, वीरेंद्र लंगडे, मनोज खवल, विजय भुयार, सुधीर उगले, विनोद गुहे, वलगाव ग्रा. प. सरपंच उगले, सचिन माळकर, प्रदीप गोरखेडे, सोपान गुढदे, विरेंद्र लंगड़े , मिलिंद ठुनुकुले, हनुमानजी सिडाम, भोजराज पवार ‘, कमलाकर वनवे, आशीष भागवत, काळपांडे, तसेच कार्यक्रमाला प्रमुख म्हणून लाभलेले अमरावती तालुक्यातील सर्व युवा स्वाभिमान पार्टी कार्यकर्ते, शोभा खडसे, सुधाकर काळे, सुभाष खंडार, सुधीर उगले, अक्षय मेश्राम,अंसार पठान, आडे, जोशीर्ला राऊत, मार्ला माहोरे, माधुरी मेश्राम, इंर्दु जवंजाळ, संजय नितनवरे, दिनेश खडसे, राजेंद्र खंडारे, द्यानदीप मुन्द्रे, उमा मुंदावने तसेच धर्मपाल डोंगरे, अरविंद निंबर्ते, अरुण मडके, संतोष यमगवळी, प्रतिभा बनसोड, हारून शाह, नारायण महिंगे, विनोद बांडाबुचे इत्यादि मान्यवर उपस्थित होते.

# पांदणरस्ते मोहीम,सर्वांसाठी घरे,गाव तिथे स्मशानभूमी

### नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन




**अचलपूर-** राज्य शासनाने महसूल व वनविभागाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोंबर या दरम्यान सेवा पंधरवाडा उपक्रमा अंतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध उपक्रम राबविला जाणार असल्याची माहिती अचलपूर उपविभागीय राजस्व अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार डॉ. संजय गरकल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येत्या १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान पांदण रस्ते मोहीमे अंतर्गत शेतकऱ्याच्या शेताला पांदण रस्ता तयार करणे, वहिवाटीच्या रस्त्यांची महसूली नोंद घेत नकाशात समाविष्ट करणे, रस्त्याची ओळख निर्माण करणे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या शेती रस्त्या संदर्भातील समस्या निकाली निघतील. तर २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान सर्वांसाठी घरे या उपक्रमा अंतर्गत अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील घरे बांधण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करुन सरकारी जमिनीवरील व गावठाणावरील अतिक्रमण नियमाकुल करून मोहीमेअंतर्गत नोंदी घेत घरकुल बांधण्यासाठी लाभार्थ्यांना योजना सोयीस्कर केल्या जाईल. नगर पालिका क्षेत्रातील ही मोहीम राबविल्या जाईल. तर २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर दरम्यान तालुक्यातील महसूली गावात महाराजस्व अभियान राबवुन नागरिकांच्या समस्या निकाली काढल्या जाईल.त्याचप्रमाणे मयत खातेदारांच्या वारसाच्या नोंदी घेऊन ७/१२ जीवंत केल्या जाईल. ज्या गावांमध्ये स्मशानभूमी अस्तीत्वात नाही अशा गावात स्मशानभूमी उभारण्याला गती देण्यात येईल. तरी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आली.

# दिवाळखोर महाराष्ट्र नको सक्षम स्वतंत्र विदर्भ हवा !




महाराष्ट्र हे समृद्ध इतिहास, सांस्कृतिक वैभव आणि प्रचंड संसाधनांनी नटलेले राज्य मानले जाते. परंतु या राज्याच्या विकासकथेत विदर्भ हा प्रदेश कायम उपेक्षितच राहिला आहे. राज्य स्थापनेला ६४ हून अधिक वर्षे उलटली, तरीही विदर्भातील शेतकरी दुष्काळाच्या विळख्यात, तरुणाई बेरोजगारीच्या अंधारात आणि उद्योगधंदे अपुऱ्या गुंतवणुकीच्या छायेत अडकलेले दिसतात. नैसर्गिक संसाधनांचा प्रचंड खजिनाआहे. त्यात कोळसा, वीज, पाणी, जंगलसंपदा असूनही या संपत्तीचा लाभ स्थानिकांना न होता इतर भागांना मिळतो.

विदर्भातील सिंचन, उद्योग, रोजगार आणि वीजवाटपातील तफावत पाहता विदर्भाच्या पिढीजात अनुशेषाचे चित्र उघड होते. केंद्र व राज्य सरकारां कडून वेळोवेळी समित्या, रार, आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात या प्रदेशाच्या विकासाची गाडी पुढे सरकली नाही. महाराष्ट्र आज दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा असताना सर्वाधिक बोजा विदर्भालाच उचलावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्याचा २०२५-२६ च्या अंदाजपत्रकाने राज्याच्या आर्थिक दिवाळखोरीचे स्पष्ट चित्र उघड केले आहे. आजच्या घडीला महाराष्ट्रात ९५,७३२ कोटी रुपयांचे कंत्राटदारांचे देयक थकीत आहे, ७,८२,००० कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर, आणि दरवर्षी ५६,७२७ कोटी रुपयांचे व्याज हे आकडे पाहिल्यावर हे राज्य 'आर्थिक श्वसनयंत्रावर' चालले आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. महसूल उत्पन्न ५,६०,९६३ कोटी, पण खर्च ६,०६,८५५ कोटी – म्हणजेच सरळसरळ ४५,८९२ कोटी रुपयांचा तुटीचा अंदाजपत्रक राज्य करकरणे सदर केला आहे. जुलै २०२५ मध्ये राज्य सरकारने १३,००० कोटी रुपये कर्ज घेतले,याच महिन्यात म्हणजे सप्टेंबर २०२५मध्ये राज्य सरकारने केंद्र सरकार कडे १,३२,००० कोटीची कर्ज घेण्यासाठी मंजुरात मांगितली आहे ,त्यामुळे राज्य सरकारवर कर्जाचे डोंगर ९,८३,७२७ रुपयाचा या वर्षाखेर राहील अशी शक्यता आहे..

अर्थशास्त्राच्या नियमानुसार देशाच्या आर्थिक स्थितीचा अंदाज घेण्यासाठी कर्ज व एकूण उत्पादन जी.डी.पी. (GDP) यांचे प्रमाण महत्त्वाचे मानले जाते. युरोपियन युनियनने १९९२ मध्ये ठरवलेल्या मास्ट्रिक्ट निकषांनुसार एखाद्या देशाचे सरकारी कर्ज जी.डी.पी. (GDP) च्या ६० टक्के पेक्षा कमी आणि वार्षिक तूट ३टक्के पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. हा नियम आदर्श मानक मानला जातो. रेनहार्ट आणि रोगॉफ या अमेरिकन अर्थतज्ज्ञांनी २०१० मध्ये केलेल्या अभ्यासात दिसून आले की, जर एखाद्या देशाचे कर्ज ९० टक्के जी.डी.पी. (GDP) पेक्षा जास्त झाले तर त्याच्या आर्थिक वाढीचा वेग मोठ्या प्रमाणावर घटतो. या निष्कर्षावर नंतर काही टीका झाली असली तरीही ९०टक्के ही पातळी धोक्याची मानली जाते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँक यांच्या मते विकसित देशांची अर्थव्यवस्था मजबूत असल्याने ते जी.डी.पी. (GDP) च्या जवळपास १०० ट इतके कर्ज सांभाळू शकतात. परंतु भारतासारख्या विकसनशील देशांसाठी ६० –७० ट जी.डी.पी. (GDP) पेक्षा जास्त कर्ज हे गंभीर आर्थिक संकटाचे संकेत मानले जातात. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सरकारवर कर्जाचे डोंगर ९,८३,७२७ म्हणजे ६०–७० टक्के जी.डी.पी. (GDP) पेक्षा जास्त कर्ज झाले आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीत आले आहे.त्याचा परिणाम म्हणजे ठेकेदारांचे बील प्रलंबित आहे.

**कत्राटदारांचे प्रलंबित बील**

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे ४०,००० कोटी, जलसंधारणाचे १३,००० कोटी, जल जीवन मिशनचे १२,००० कोटी, ग्रामीण सुधारणा विभागाचे १८,००० कोटी, नगरविकासाचे ४,२१७ कोटी, ग्रामविकासाचे ६,००० कोटी आणि डीपीसी निधीचे २,५१५ कोटी अशी ९५,७३२ कोटी रुपयांचे कंत्राटदारांचे देयक थकीत आहे त्याचा परिणाम दोन ठेकेदाराने आत्महत्या केल्या आहे. शासनाकडे विकासकामे सुरु ठेवण्याची आर्थिक क्षमता संपलेली आहे. ठेकेदार रडताहेत आणि गावे-शहरे अर्धवट कामांच्या कचाट्यात अडकली आहेत.

**विदर्भाचा अनुशेष शतकभरही भरून न येणारा**

महाराष्ट्राच्या आर्थिक दिवाळखोरीचा सर्वाधिक बोजा विदर्भ या प्रदेशाने उचलला आहे. विकासकामांच्या वाटपात सातत्याने झालेल्या अन्यायामुळे विदर्भ हा मागासलेपणाचे ओझे वाहणारा प्रदेश ठरला आहे. सिंचन, उद्योग, रोजगार आणि वीज वापर यासारख्या क्षेत्रांतील आकडेवारी या पिढीजात उपेक्षेचे स्पष्ट पुरावे देतात.सिंचनाच्या बाबतीत पाहिले तर महाराष्ट्रात एकूण ४०५ मोठे-मध्यम प्रकल्प आहेत; पण त्यापैकी केवळ १०१ प्रकल्प विदर्भात आहेत. यातीलही अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांना फक्त ४० प्रकल्प मिळाले आहेत. १३ १ प्रकल्प विदर्भात प्रलंबितआहे. परिणामी दरडोई पाणी उपलब्धतेत विदर्भ नेहमीच तळाशी राहिला आहे.त्याचा अनुशेष ५१ टक्के वाढला आहे. शेतकरी दुष्काळ आणि पावसावरच अवलंबून राहतो, तर पाण्याविना पडसाळी शेती आजही धोक्यात आहे.

उद्योगांच्या क्षेत्रातही हीच दरी दिसते. राज्यात एकूण ३६,४८५ कारखाने कार्यरत असताना विदर्भात केवळ २,६१८ कारखाने आहेत. म्हणजेच कोळसा, वीज, खनिजे, जमीन, कामगार अशा सर्व साधनसंपत्ती असूनही उद्योगधंदे येथे रुजलेच नाहीत. जे उद्योग आहेत त्यातून प्रदूषण विदर्भाच्या वाट्याला आले, पण रोजगार मात्र मुंबई-पुण्याकडे गेला. त्यामुळे स्थानिक तरुणाईला नोकरीसाठी स्थलांतराशिवाय पर्याय उरलेला नाही.परिणामतः विदर्भातील ४ विधानसभा आणि एक लोकसभा मतदार संघ कमी झाला आहे.

राज्यातील २९ लाख कामगारांपैकी फक्त २.५ लाख विदर्भात आहेत, उर्वरित रोजगारासाठी स्थलांतरित झाले आहेत. कोळसा आणि वीज उत्पादन प्रामुख्याने विदर्भात असूनही औद्योगिक वापर केवळ ११ टक्के आहे, तर पुणे-नाशिकमध्ये २७टक्के आहे. म्हणजे उत्पादन विदर्भाच्या जमिनीवर, पण फायदा पश्चिम महाराष्ट्राला. ही आकडेवारी विदर्भाच्या पिढीजात उपेक्षेचे प्रतीक आहे. संसाधनसंपन्न असूनही दशकानुदशके विकासापासून वंचित राहिलेला विदर्भ अन्यायाच्या जोखडाखाली आजही दडपला आहे.

आजच्या तरुणांनी हा प्रश्न गांभीर्याने घेतला नाही तर त्यांचे भविष्य अंधारमय ठरेल.

**'ना दान चाहिए, ना अनुदान चाहिए, हमें तो सिर्फ विदर्भ राज्य चाहिए.'**

**स्वतंत्र विदर्भाची आवश्यकता**

विदर्भ हा नैसर्गिक संपत्तीने समृद्ध प्रदेश आहे. येथे कोळसा, वीज, सुपीक जमीन, पाणी, खनिजे व जंगलसंपदा विपुल असूनही त्याचा लाभ मुंबई-पुण्यासारख्या भागांना जास्त मिळतो. कोळसा व वीज उत्पादन विदर्भात होत असतानाही औद्योगिक वापर पश्चिम महाराष्ट्रात अधिक आहे, परिणामी स्थानिक शेतकरी, कामगार व उद्योगपतींना अपेक्षित संधी मिळत नाहीत. स्वतंत्र विदर्भ राज्य अस्तित्वात आले, तर संसाधनांवर स्थानिक नियंत्रण राहून पाणी, जंगल व जमीन यांचा योग्य वापर करून शेतकऱ्यांचे सिंचन व उद्योगधंदे सुधारता येतील.

सध्या मिळणारा निधी पश्चिम महाराष्ट्र केंद्रित योजनांत खर्च होतो. स्वतंत्र अर्थसंकल्प असल्यास सिंचन, आरोग्य, शिक्षण, रस्ते व रोजगार यांसाठी निधी वापरून विदर्भ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनेल. उद्योग, शिक्षण व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करून नागपूर, अमरावती,चंद्रपूर, यवतमाळ यांसारखी शहरे औद्योगिक व शैक्षणिक केंद्रे बनतील.कृषी-आधारित प्रक्रिया उद्योग, औषधनिर्मिती, आयटी पार्क, वनउद्योग व पर्यटन यामुळे हजारो रोजगार उपलब्ध होतील. विदर्भातील नैसर्गिक संपत्तीचा संतुलित विकास केल्यास काही येत्या ५ वर्षांत विदर्भ प्रदेश सक्षम व स्वावलंबी अर्थव्यवस्था उभी करू शकेल. त्यामुळे तरुणाईचे स्थलांतर थांबेल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि स्थानिकांना स्थैर्य मिळून देशाच्या प्रगतीत विदर्भाचा थेट वाटा उभा राहील.

उपरोक्त अध्यानावरून महाराष्ट्राची अर्थव्यवस्था दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे आणि विदर्भाचा अनुशेष शतकभरही भरून निघणार नाही.त्यामुळे स्वतंत्र विदर्भ हा काळाची अपरिहार्य गरज आहे. आज विदर्भातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी, स्त्रिया आणि विशेषतः तरुणांनी एकजुटीने ठरवले पाहिजे,'दिवाळखोर महाराष्ट्र नको,सक्षम स्वतंत्र विदर्भ हवा' एवढे मात्र निश्चित!

**डॉ.प्रशांत विघे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,भारतीय महाविद्यालय,अमरावती
मो.९३२६८७७७४९

# 'जेन झी' नवा ज्वालामुखी

नेपाळ या छोट्याशा राष्ट्रात सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार, गैरव्यवहार, लाचखोरी, राजकारणातली घराणेशाही, राजकारण्यांच्या दिवट्या मुलांचे आयुष्य आरामीचे राहणे आणि पैशाची प्रचंड उधळपट्टी अशा जनतेला लुटणाऱ्या राजकारण्यांच्या विरोधात सर्वसामान्य जनतेत खदखदत असलेल्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा स्फोट अखेर चार दिवसांपूर्वीच झाला आणि असंतोषाच्या ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या अग्नितांडवात सरकारसह सर्वच राजकीय पक्षांची वाट लागली. नेपाळमधली राजेशाही संपल्यावर तेथे लोकशाही राज्य प्रस्थापित झाले. पण गेल्या १४ वर्षात १३ सरकारे सत्तेवर आली आणि पडली. एकाही राजकीय पक्षाला देशात राजकीय स्थिरता देता आली नाही. नेपाळमधला कम्युनिस्ट पक्ष तर पूर्णपणे चीनधार्जिणाच असल्याने या पक्षाच्या सरकारांनी भारताविरुध्द शत्रुत्व केले.

गेल्या अनेक शतकाचे धार्मिक आणि पारंपरिक संबंध असलेल्या भारताशी माओवाद्यांनी केलेले हे शत्रुत्व लोकांना आवडले नाही. सरकारे सत्तेवर येत होती आणि जात होती. दरम्यानच्या काळात सत्ताधाऱ्यांनी मात्र सरकारी तिजोरीची मनमानी लूट केली. त्यांच्या मुलाबाळांनीही आपल्या बापाच्या जहागिऱ्या पुढे चालवल्या. गरीब आणि श्रीमंतातली दरी वाढत गेली. व्हॉटस ॲप, यू ट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम अशा सामाजिक माध्यमाद्वारे श्रीमंतांची मुले आपल्या छंदांचे आणि उधळपट्टीच्या उद्योगाचे प्रदर्शन मस्तवालपणे करीत राहिले, तर देशातल्या युवा पिढीने नेमक्या या विषमतेविरुध्दच आवाज उठवत जनजागृती घडवली. नेपाळ सरकारने २७ सामाजिक माध्यमांवर घातलेल्या बंदीचे निमित्त झाले आणि या असंतोषाच्या ज्वालामुखीचा अचानक स्फोटही झाला. लाखो युवकांनी राजधानी काठमांडूच्या रस्त्यावर उतरत, पोलिसांना न घाबरता संसद, सर्वोच्च न्यायालय आणि सरकारी कार्यालयासह शेकडो इमारतींना आगी लावल्या. या अग्नितांडवात के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा तर द्यावाच लागला आणि पळही काढावा लागला.

युवकांच्या रौद्र वणव्यात अनेक मंत्र्यांना बेदम मार खावा लागला. देशात सरकारच अस्तित्वात राहिले नाही. सारे काही युवकांच्या असंतोषाच्या भडक्यात जळून गेले. श्रीलंका, बांगला देश यानंतर जनक्रांती झालेले नेपाळ हे भारताचे तिसरे शेजारी राष्ट्र. नेपाळमधल्या या लोकक्रांतीनंतर जेन झी आणि नेपो बेबी या अलीकडेच जगभरात प्रचलित झालेल्या नव्या शब्दप्रयोगावर व्यापक चर्चा सुरू झाली. १९९७ ते २०१२ या इंटरनेट आणि दूरसंचार क्षेत्रातल्या क्रांतिकाळात जन्म झालेल्या किशोरवयीन मुलांचीही असंघटित पण सामूहिक परिणाम घडवणारी सामाजिक माध्यमावरची एकजूट म्हणजेच जेन झी! ही युवापिढी सामाजिक माध्यमाद्वारे राजकारण, शिक्षण, समाज, कला यासह विविध क्षेत्रातल्या विषयांवर मुक्तपणे आपले विचार व्यक्त करते. या पिढीला कोणाचेही वर्चस्व नको आहे.आपल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्याविरुध्द ही युवा पिढी एकजूट करत तुटून पडते आणि नेपो निगम हा नवा शब्द म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या मुलामुलींनी श्रीमंतीचे सुरू केलेले ओंगळ प्रदर्शन. जेन झी क्रांती घडवायसाठी या युवा पिढीने निर्माण केलेले असंतोष हेच नेपाळमधल्या असंतोषाच्या स्फोटामागचे मुख्य कारण आहे.

**विजय जोशी**

## दिवाळी विशेषांक-२०२५

**दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम'दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फ विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सॲप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टो.२०२५ पर्यत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.**

# सातारा गॅझेट, हैदराबाद गॅझेट व विश्वकर्मा योजना

## कलार-कलाल समाज पारंपरिक व्यवसायाठी नियमानुसार अनुकूल

मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट व सातारा गॅझेट नुसार आरक्षण देण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे आणि त्या पध्दतीने कार्य सुरू आहे.याच आधारावर बंजारा समाजाने सुध्दा आरक्षणामध्ये उडी घेतली असून बंजारा समाजाला एस टी संवर्गात आरक्षण द्यावे यासाठी कंबर कसली आहे. कारण आज वाढता शिक्षणाचा खर्च,वाढती महागाई व बेरोजगारी यामुळे सर्वच समाजाच्या गरीब व मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडले असून हताश झाले आहेत.त्यामुळे आज बंजारा समाजासह अनेक समाज हैदराबाद गॅझेट व सातारा गॅझेटच्या माध्यमातून आरक्षण किंवा आपला पारंपरिक व्यवसाय मिळण्याच्या दृष्टीने धडपड सुरू आहे.महत्वाचे म्हणजे सातारा गॅझेट ब्रिटिश काळातील (१८२०-१८३०) सातारा प्रांतातील जमीन,शेती, व्यवसाय,जाती आणि महसूल यांच्या नोंदीचा ऐतिहासिक पुरावा कलार-कलाल समाजासाठी महत्वाचा ठरेल.त्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट म्हणजे ब्रिटीश काळातील एक सरकारी राजपत्र आहे.या गॅझेटमध्ये मराठा समाजाची 'कुणबी मराठा'अशी नोंद आहे.त्याचप्रमाणे कलार-कलाल समाज संपूर्ण भारतात ताडीच्या (दारूच्या) व्यवसायासाठी सर्वत्र प्रचलित आहे.

सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेटमध्ये हैदराबाद संस्थानातील १८८२ च्या जनगणनेत कुणबी मराठा नोंद आहे म्हणजेच कलार -कलाल समाजाची पारंपरिक व्यवसायाची नोंद नक्कीच असायला हवी.शेती करणारे म्हणजे कुणबी मराठा,असा गॅझेटमध्ये उल्लेख आहे.म्हणजेच( दारूचा)ताडीचा व्यवसाय करणारे कलार-कलाल असा उल्लेख असायलाच पाहिजे.सरकार जर १८८२ म्हणजे निजामकालीन दस्तऐवज म्हणजे सातारा गॅझेट किंवा हैदराबाद संस्थानाच्या काळातील सरकारी राजपत्र गृहीत धरून आरक्षण देत असेल तर, सरकारने कलार-कलाल समाजाचा पारंपरिक (मद्य) व्यवसाय समाजाला द्यायलाच पाहिजे.यात यत्किंचितही पुराव्यांची गरज नाही.कारण मराठा समाजाला आरक्षण देवतांना स्वतंत्रपुर्व काळापासूनचा विचार केला आहे.त्याच आधारे कलार-कलार समाज सरकारला मागणी करते की, कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय स्वतंत्रपुर्व काळापासूनचा आहे आणि १९४६ पर्यंत संपूर्ण भारतात मद्य व्यवसाय हा कलार-कलाल समाजाचा पारंपरिक व्यवसाय होता.परंतु १९४७ नंतर मद्य व्यवसायावर राजकीय पुढाऱ्यांनी आपली पकड मजबूत केली व १९४७ पासून तर आतापर्यंतच्या देशातील संपूर्ण सरकारांनी व राजकीय पुढाऱ्यांनी कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय हिसकावला.त्यामुळे कलार-कलाल समाजामध्ये बेरोजगारीचे व गरीबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले.करीता राज्यातील संपूर्ण समाज महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या माध्यमातून सरकार सावधान करते की मराठ्यांच्या आरक्षणासाठी ज्याप्रमाणे निजामकालीन गॅझेटचा विचार केला त्यांच्या आधारे सरकारने संपूर्ण कलार-कलाल समाजाला मद्य व्यवसायाचे परवाणे ताबडतोब देण्याचा विचार करावा अन्यथा आम्हालाही रस्त्यावर उतरावे लागेल.

निजामकालीन व इतर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मराठा -कुणबी, कुणबी -मराठा जात प्रमाणपत्रांसंदर्भात कार्यपद्धती निश्चित करणाऱ्या निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा पहिला अहवाल ३१ ऑक्टोबर २०२३ ला राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला.या अहवालानुसार मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील सुमारे पावणेदोन कोटी नोंदी तपासण्यात आल्या असून १३ हजार ४९८ जुन्या कुणबी नोंद आढळल्या आहेत.म्हणजेच सरकारने निजामकालीन पुराव्यांच्या आधारावर जात प्रमाणपत्र देऊन आरक्षण देत आहे.याचे महाराष्ट्र कलाल- कलार समाज संघटना स्वागत करते.याच अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने कलाल-कलार समाजाच्या पारंपरिक मद्य व्यवसायाचा गांभिर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे.अन्यथा कलार-कलाल समाज आक्रमक पवित्रा घेईल.निजाम महाराष्ट्रात १७२४ पर्यंत होते म्हणजे आज त्या गोष्टीला जवळपास ३०१ वर्षे पुर्ण झालीत.परंतु कलार-कलाल समाजाचा पारंपरिक व्यवसाय हा पीढोनपिढ्या म्हणजे राजे-महाराज्यांपासून सुरू होता.परंतु स्वतंत्र मिळाल्यानंतर गेल्या ७८ वर्षात या व्यवसायाचे संपूर्ण भारतात राजकारण झाले.

कलाल -कलार समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आणि गरीब आहे.त्यामुळे समाजबांधवांना अनेक कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत असल्यामुळे समाजाच्या उत्थानासाठी पारंपरिक (मद्य) हक्काचा व्यवसाय मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

राज्यात दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याचा सरकारचा विचार आहे.परंतु यात पहिला अधिकार कलाल-कलार समाजाला द्यायला हवा.राज्यात दारू विक्रीच्या दुकानांचे नवीन परवाने देणे १९७३ पासून बंद असतांना आता दारू उत्पादक कंपन्यांना नवीन विक्री परवाने देण्याचे उत्पादन शुल्क विभागाने प्रस्तावित केले आहे.उत्पादन शुल्क वाढीसाठी हा प्रस्ताव उपमुख्यमंत्री व वित्तीय मंत्री अजित पवार यांच्याकडे दिला आहे.ही बातमी २५ सप्टेंबर २०२३ रोज सोमवारला अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली होती.याचे कलार समाजाने स्वागतच केले.आता दारू उत्पादक कंपन्यांना प्रत्येक जिल्ह्यात किरकोळ दारू विक्रीचे एक दुकान उघडण्यास मुभा देण्याचे प्रस्तावित आहे.दारूच्या दुकानांचे परवाने वाढविताना व वाटप करतांना सरकारने विश्वकर्मा योजनेअंतर्गत व पारंपरिक व्यवसाया अंतर्गत फक्त कलाल-कलार समाजाचा विचार करावा.कारण दारूच्या दुकानांचा पहिला अधिकार कलाल-कलार समाजाचा आहे आणि त्यात पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी पारंपारिक व्यवसायाचा दुजोरा देवून विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपरिक व्यवसायवर प्रधानमंत्र्यांनी भर दिला आहे. त्याचअनुषंगाने सरकारने नवीन परवाने देताना फक्त कलाल-कलार समाजाच्या पारंपारिक(मद्य) व्यवसायाचा गांभीर्याने विचार करावा. प्रधानमंत्री यांनी अमलात आणलेल्या विश्वकर्मा योजनेअंतर्गत व मराठा समाजाला देण्यात येणारे सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेट नुसार आरक्षण या संपूर्ण गोष्टींचा विचार करून पारंपारिक व्यवसायाचा विचार केला तर महाराष्ट्र सरकारला पारंपारिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातून कलाल-कलार समाजाला बाजूला सारता येणार नाही ही बाब राज्य सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.आता सरकारने सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेट म्हणजे हैदराबाद संस्थानाच्या काळातील एक सरकारी राजपत्राचा आधार घेऊन सरकारने कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसायाचे परवाणे ताबडतोब द्यावेत अन्यथा महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना रस्त्यावर उतरल्या शिवाय रहाणार नाही.

**रमेश लांजेवार,**
नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९

## ओढा

**कन्हेरी, कावळी,**
**तरवडीच्या फुलांनी**
**सजलेले असायचे दोन्ही**
**काठ**
**त्यातून खळखळ व्हायचा**
**ओढा**
**गर्द हिरव्या झाडी झुडपांत**
**पक्षांची घरटी असायची**
**दाट**
**उन्हाळ्यातही आटला नाही**
**ओढा**
**शेळ्या, मेंढया, गाई, गुरे**
**सारे**
**पाणी पिऊन होत होती**
**तृप्त**
**गोड नितळ पाण्याचा होता**
**ओढा**
**सांजवेळी पक्षांचा**
**असायची शाळा**
**अल्ल्याड पल्याड जायला**
**निमुळती वाट**
**मुलांसंग वाळूत खेळ**
**खेळायचा ओढा**
**गावला निसर्गाच देणं**
**लाभलेला**
**गंगामाईला जावून**
**मिळालेला**
**डोंगर दरीतून वाहत यायचा**
**शुभ्र ओढा**
**स्वार्थासाठी झाडे, झुडपे**
**तोडली**
**प्रवाह बुजून त्याचा झाला**
**नाला**
**असा निसर्गरक्षी होता**
**गावचा ओढा**

**विठ्ठल वळसे पाटील**
निरगुडसर - पुणे
मो.८४८४०६६०४२

## बाळापुरात काँग्रेसची आढावा बैठक

# लोकशाही व जनकल्याणासाठी आगामी निवडणूक जिंकणे आवश्यक

## विधानसभा निरीक्षक अनंत वानखडे यांचे प्रतिपादन



■ प्रतिनिधी | बाळापूर ■

देशातील लोकशाहीचे रक्षण व विकासाच्या माध्यमातून जनकल्याण साधण्यासाठी निवडणुका जिंकणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन बाळापूर विधानसभा प्रभारी अनंत वानखडे यांनी केले. ते येथील काँग्रेसच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका लक्षात घेऊन आयोजित आढावा बैठकीत बोलत होते.

या बैठकीच्या प्रारंभी स्वागत समारंभ पार पडला. त्यानंतर विविध काँग्रेस नेते व पदाधिकाऱ्यांनी आपल्या भागातील पक्षाच्या कामगिरीचा आढावा मांडला. तसेच पक्ष अधिक बळकट करण्यासाठी व निवडणुका जिंकण्यासाठी काय उपाययोजना आवश्यक आहेत, यावरही चर्चा करण्यात आली.

काँग्रेस पक्ष बाळापूर विधानसभा क्षेत्रात मजबूत असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तीनपट यश मिळणार असल्याचा विश्वास काँग्रेस नेते प्रकाश तायडे यांनी व्यक्त केला. 'बाळापूर आणि पातुर नगरपालिका पुन्हा काँग्रेसच्याच होणार,' असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी दिला.

बैठकीत कार्यकर्त्यांना नवी जबाबदारी सोपविण्यात आली. त्यामध्ये वाडेगाव शहराध्यक्षपदी सचिन धनोकार यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.या आढावा बैठकीला जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रकाश तायडे, डॉ. फैयाज अन्सारी (अल्पसंख्यांक सेल जिल्हाध्यक्ष), बाळापूर शहराध्यक्ष जम्मू सेठ, माजी जि.प. सदस्य पंढरीचे हाडोळे, प्रमोद डोंगरे (अनुसूचित जाती विभाग जिल्हाध्यक्ष), नगरसेवक अक्रम शेख, पातुर शहराध्यक्ष मुक्तार सर, बाळापुर तालुका अध्यक्ष सत्यनारायण घाटोळ, माजी तालुकाध्यक्ष दीपक पोहरे, नगरसेवक रईस कुरेशी, मजहर भाई, सुश्रुत मुस्कुटे, अनिरुद्ध घाटोळ, भूषण राहणे, इंद्रजीत देशमुख, वसीम भाई, गजानन आलाठ, ज्ञानेभाऊ वाट, चंद्रकांत बारतसे, सुनील माडोकार, विलास हरमकार, सौ. रजनी पुंडे, साजिद इकबाल, दिलीप पाटील, रामरावजी खोपडे, रमेश भगत, अॅड. दीपक काळपांडे, प्रवीण खेडकर, मोहसीन देशमुख, गोपाल भोंडे, मजहर मौलाना, रईस अहमद, मुशीर अलहक, अविनाश कळस्कर, नासिर हुसेन, अब्दुल वाहब आदींसह शेकडो काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना सत्यनारायण घाटोळ यांनी केली. सूत्रसंचालन सचिन धनोकार यांनी केले तर आभार चंद्रकांत बारतासे यांनी मानले.

# अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनमधील गणेश विसर्जन शांततेत


■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली होती. दि. १० सप्टेंबर रोजी पारंपरिक पद्धतीने आणि उत्साह-उत्सवाच्या वातावरणात या गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

शहर व तालुक्यातील सर्व गणेशमूर्तींचे विसर्जन झाल्यानंतर शेवटी पोलीस स्टेशनमधील गणपतीचे विसर्जन करण्याची परंपरा यावर्षीही कायम ठेवण्यात आली. या सोहळ्याला अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस कर्मचारी, तसेच शहर व ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विसर्जन सोहळ्यापूर्वी गणरायाची आरती करण्यात आली. पारंपरिक बँडपथकाच्या साथीने विसर्जन मिरवणूक स्टेशनच्या आवारातच काढण्यात आली. विशेष म्हणजे या मिरवणुकीत डीजे वा इतर वाद्यांचा वापर न करता पारंपरिक पद्धतीला प्राधान्य देण्यात आले. भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शेकडो नागरिकांनी या प्रसंगी महाप्रसादाचा आनंद घेतला. मिरवणुकीत भाविक भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला होता. पोलीस प्रशासनाच्या जय्यत तयारीमुळे संपूर्ण कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. श्रद्धा आणि सेवाभाव या दोन्हींचे उत्तम मिश्रण घडवून आणत पोलिसांनी एकतेचा संदेश दिला.

या कार्यक्रमाला शहर व तालुक्यातील पोलीस पाटील, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिकांसह पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, हवालदार व कॉन्स्टेबल मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलिसांच्या या उत्सवमय सहभागामुळे अकोट शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## भाविक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा आनंद



## विद्यापीठाच्या शेतात अजगराची एन्ट्री!

### सर्पमित्र वाकोडे यांचे कौशल्य पाहून नागरिक थक्क



■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील भाजीपाला संशोधन विभागाच्या शेतात शनिवारी १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास तब्बल १० फुटांचा अजगर साप आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. शेतात काम करत असताना कृषी सहाय्यक कु. मनिषा चव्हाण यांच्या नजरेस हा अजगर पडताच त्यांनी तातडीने सर्पमित्र संतोष वाकोडे यांना माहिती दिली.

माहिती मिळताच संतोष वाकोडे यांनी कुठलाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने अजगराला सुरक्षितरीत्या पकडले. त्यांच्या या धाडसी कार्याचे शेतकरी, अधिकारी व उपस्थित नागरिकांनी जोरदार कौतुक केले. गेल्या २५ वर्षांपासून संतोष वाकोडे सर्पमित्र म्हणून कार्यरत असून शेकडो सापांना त्यांनी जीवदान दिले आहे.

# मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मोफत नेणाऱ्या चालकाचा सत्कार

## सावरगावचे गजानन पायघन यांना जिल्हा पोलीस अधीक्षकांचा गौरव

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव येथील वाहनचालक व मालक गजानन पायघन हे गेल्या १५ ते २० वर्षांपासून अपघात, हत्या व इतर दुर्दैवी घटनांमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मोफत नेण्याची सेवा बजावत आहेत. या सामाजिक कार्याची दखल घेत अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांनी अलीकडील भेटीदरम्यान गजानन पायघन यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



गजानन पायघन यांनी पोलीस प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत परिसरातील शेकडो मृतदेह अकोला येथे उत्तरीय तपासणीसाठी नेले आहेत. अनेकदा कुजलेल्या व दुर्गंधीयुक्त अवस्थेत असलेल्या मृतदेहांना स्वतःच्या हाताने उचलून गाडीत ठेवण्याचे धाडस त्यांनी दाखवले आहे. त्यांच्या या कार्यामुळे परिसरात त्यांना एक सामाजिक सेवक म्हणून विशेष मान मिळाला असून, जिल्ह्यातील अनेक मंडळींकडून त्यांचा सत्कारही करण्यात आला आहे.

गजानन पायघन यांचे हे निःस्वार्थी व मानवतेसाठी केलेले योगदान समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## शिवनीत निघाली ईद मिलादुन्नबीची मिरवणूक

**अकोला :** स्थानीय शिवनी येथे हजरत मोहम्मद पैगंबर साहब यांच्या जयंतीच्या रुपात साजरी होणारी पवित्र ईद मिलादुन्नबीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शिवनी परिसरातील शेकडो मुस्लिम बांधव सहभागी होऊन त्यांनी हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला.या मिरवणुकीत सरकार की आमद मरहबा च्या घोषणा देत एकमेकांना आलिंगन देत ईद मिलादुन्नबीच्या शुभेच्छा देण्यात आल्यात. मिरवणूक प्रारंभी शिवनी येथील मौलाना यांनी दुवा म्हणून मिरवणुकीला बिदाई दिली. ट्रक, वाहनांच्या समवेत ही भव्य मिरवणूक शिवनी मार्गाने स्थानीय ताजनापेठ परिसरात येऊन येथुन जुने शहर ईदगाह कडे जाणाऱ्या सार्वजनिक ईद जलसा कमिटीच्या ईद मिलादुन्नबी मिरवणुकीत सहभागी झाली.

## खरपकार गुरुजीचा अमृत महोत्सवी सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ,विश्व जागृती मिशनचे पदाधिकारी मनोहर खरपकार गुरुजी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त देशमुख समाज मंडळ सभागृहात आयोजित अमृत महोत्सव कार्यक्रमात विश्व जागृती मिशन अकोला चे आचार्य शिवदत्त महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रशांत,प्रवीण व मंगेश खरपकार या सुपुत्रानी आयोजिलेल्या या कार्यक्रमात गुरुजीच्या ७५ वर्षातील जीवनाचा गौरव करण्यात आला, सौ आशाताई खरपकार, महादेवरावं ढवळे, विश्व जागृती मिशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम वानखडे, विश्वजित सिसोदिया, रामलाल अग्रवाल,प्रभाकर पाटील म्हैसने, हरिभाऊ लावडे,ज्येष्ठ पत्रकार मिरसाहेब, डॉ प्रमोद श्रावगी,विनायक चोपडे,नितीन गणात्रा,राहुल भगत, निलेश भुईभार, संदीप पवार,बाबुराव चौधरी, दिगंबर संपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## चौकशीची जाहिर नोटीस

अर्ज क्रमांक : - १०१/२०२- ५ कलम- १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव :** जय मल्हार चॅरीटेबल ट्रस्ट, पैलपाडा, ता. जि. अकोला
**अर्जदार -** श्री किसन प्रतापराव नागे, रा. पैलपाडा, अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चेकलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- १००१/- रुपये आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काहीनाही .

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियतन आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १४/०८/ २०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १५९८/२०२५ प्रोसेस नं.१४१८१/२०२५
चौ.ता. २४/०९/२०२५ दिनांक : २१/०८/२०२५

**अर्जदार :** १. विनोद ओंकार निखाडे रा. गजानन महाराज मंदिराजवळ, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला २. राजेश ओंकार निखाडे रा. कौलखेड चौक, कौलखेडग गावठाण, अकोला, ता. जि. अकोला, ३. सौ. संगिता दिपक खंडारे रा. मालाताई किराणा दुकान जवळ, विसावा पोस्ट कॉलनी, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. ओंकार सुपाजी निखाडे २. लक्ष्मीबाई ओंकार निखाडे
**पत्ता :-** रा. दोघेही रा. गजानन महाराज मंदिराजवळ, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत ओंकार सुपाजी निखाडे यांचे दि. १६/०४/२०१२ रोजी राहत्या घरी कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत लक्ष्मीबाई ओंकार निखाडे यांचे दि. २२/०१/२०१७ रोजी राहत्या घरी कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २४/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## तीन जोडप्यांच्या हस्ते पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा



■ प्रतिनिधी | अकोला ■

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात १३ सप्टेंबर २०२५ पहाटे ४ ते सकाळी ६ या वेळेत शिवर गावच्या तीन जोडप्यांच्या हस्ते महापुजा संपन्न झाली. या भाग्यात सहभागी होण्याचा मान श्री शिव चॅरिटेबल ट्रस्ट शिवरचे सचिव नारायण भिमराव चौधरी, सौ. रेखाताई नारायण चौधरी, आदित्य नारायण चौधरी, हर्षल कराळे, सौ. राधिका हर्षल कराळे, तसेच महेश वैराळे व सौ. विजया महेश वैराळे या भक्तपर जोडप्यांना मिळाला. या सोहळ्यात श्री विठ्ठल-रुक्मिणी मुर्तीचा अभिषेक, विधीवत पूजन आणि मंगल आरती भाविकांच्या डोळ्यांसमोर पार पडली.

या पवित्र क्षणी भाविकांना अध्यात्मिक उन्नतीचा अनुभव आला. महापूजा आटोपल्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, पंढरपूर यांच्या वतीने या सर्वांचे सत्कार करण्यात आले. या वेळी बोलताना महापूजा करणाऱ्या जोडप्यांनी आपल्या जीवनाला खरं समाधान लाभल्याची भावना व्यक्त केली. शिवर परिसरातील यंदाचे हे एकमेव महापूजा करणारे जोडपे ठरल्यामुळे गावात व परिसरात आनंदाचे वातावरण आहे. 'आमच्या हाती विठ्ठल-रुक्मिणी महापूजा पार पाडण्याची सुवर्णसंधी मिळाली; हे आमच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहेत', असे भक्तपर जोडप्यांनी समाधान व्यक्त केले. भक्तिरसात न्हाऊन निघालेला हा सोहळा शिवर गावाच्या वैभवात भर घालणारा ठरला आहे.

## मुंडगाव - वणी वारूळा रस्त्यावरील बंगाली बाभळीच्या काट्यांची सफाई सुरू

■ प्रतिनिधी | अकोट ■

मुंडगाव – वणी – वारूळा रस्त्यावरील बंगाली बाभळीच्या काट्यांचा विळखा नागरिकांच्या जीवितास धोका ठरत होता. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशन तर्फे ९ सप्टेंबर रोजी कार्यकारी अभियंता, जागतिक प्रकल्प बँक विभाग अकोट यांच्याकडे निवेदन देण्यात आले होते. संबंधित विभागाने तक्रारीची दखल घेत १२ सप्टेंबर रोजी जेसीबीद्वारे काटेरी झुडपांची सफाई सुरू केली आहे.

या रस्त्यावर दररोज शेकडो प्रवासी, शालेय विद्यार्थी, शेतकरी व वाहनचालकांची ये-जा असते.



मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वळणांवर पसरलेल्या बंगाली बाभळीमुळे समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने अपघातांची शक्यता वाढली होती. विशेषतः रात्रीच्या वेळी काट्यांमुळे वाहनांचे टायर फुटणे, संतुलन बिघडणे, अगदी वाहन रस्त्याबाहेर जाऊन अपघात होणे यांसारख्या घटना घडत होत्या. नागरिकांच्या वाहनांचे नुकसान होऊन प्रवाशांना दुखापती सुद्धा झाल्याचे सांगण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग तेल्हारा व अकोट विभागाने या समस्येकडे दुर्लक्ष केल्याने नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशनने निवेदनासह इशारा दिला होता की, समस्या सोडवली नाही तर ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल. त्यानंतर अखेर प्रशासन हलले व काटेरी झुडपे हटविण्याचे काम सुरू झाले.

ही तक्रार संस्थापक राजकुमार वानखडे, अध्यक्ष संगीता प्रभे, उपाध्यक्ष हमिदा बि. शेख अख्तर, सचिव डॉ. चंदा प्रभे, सहसचिव विद्याताई गावंडे, कोषाध्यक्ष कविता वानखडे, सह-कोषाध्यक्ष उज्वला डोबाळे तसेच सदस्य शुभांगी मोहीते, प्रणाली बिजेकर, सविता भागवतकर, छाया धोंडेकर, अंतकला जुमळे, अजय प्रभे, गजानन वारकरी, वर्षा फुसे यांच्या सह्या निशी सादर करण्यात आली होती.

## मेजर पंकज उजवणे राष्ट्रपती द्वारे सन्मानित

**अकोला :** स्थानीय दाबकी रोड परिसरातील रहिवाशी व लष्करात मेजर पदावर सेवारत असणारे मेजर पंकज अनिलराव उजवणे यांना राष्ट्रपती द्वारे सन्मानित करण्यात आले.माजी सैनिक अनिलराव ना. उजवणे यांचे पुत्र असणारे

मेजर पंकज उजवणे यांनी आपल्या विभागातील जवानांना उत्कृष्ट मार्गदर्शन करून सदैव प्रेरित केले तसेच स्थानिक जनतेशी स्नेहपूर्ण संवाद साधत समाजाशी घट्ट नाते जोडले.कर्तव्यनिष्ठा,प्रामाणिकपणा आणि जनसंपर्क यातून त्यांनी आपले पद सन्मानाने



निभावले आणि देशासाठी प्रशंसनीय कार्य केले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा संपूर्ण टीमसह व पत्नी सौ. कृतिका यांच्या समवेत राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी त्यांना राष्ट्रपतींसोबत स्नेह भोजनाचा मान मिळाला. मेजर पंकज यांचा स्थानीय अमर जवान माजी सैनिक संघटनेचे माजी सैनिक सुभाषराव म्हैसने यांनी सुद्धा सत्कार सुद्धा केला असून त्यांचे वडील माजी सैनिक अनिलराव उजवणे हे अमर जवान माजी सैनिक संघटनेचे सक्रिय सभासद आहेत.राष्ट्रपती द्वारे सन्मानित मेजर उजवणे यांच्या या उपलब्धीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २८८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com


# जिबली अॅप नंतर ऐआय अॅपने घातली भुरळ !

## सावधगिरी बाळगण्याची गरज : ठाणेदार लांडे

■ नासीर शेख ■

खेट्री : ग्रामीण भागातही जिबली अॅप नंतर आर्टिफिशियल इंटेलिजन्स ऐआय अॅपने ग्रामस्थाना भुरळ घातली आहे. संकेतस्थळाच्या अॅपवर जाऊन छोट्या पासून तर मोठ्या लोकांपर्यंत फोटोने भुरळ घातली आहे. मागील काळात जिबली अॅपच्या नावावर अनेकांना मोबाईल हॅंग करून आर्थिक गंडा लागल्याचा प्रकार घडला होता. आता या आर्टिफिशल फोटो घेण्याच्या नादात व व्हाट्सअप ग्रुपवर मिरवण्यासाठी आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे मत चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांनी व्यक्त केले आहे.

त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांना सावधगिरी बाळगण्याचे आव्हान सुद्धा त्यांच्याकडून करण्यात आले आहे. सध्याच्या काळात नवनवीन फीचर्स आणि तंत्रज्ञान सतत येत आहे. या



> आर्टिफिशल फोटो घेण्यासाठी मोबाईल अकाऊंट संपूर्ण ?क्सेस परमिशन घेऊन संपूर्ण गॅलरी त्यांच्या ताब्यात जाते त्यामुळे फोटोचा दुरुपयोग होऊन आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे.
>
> **- रवींद्र लांडे,** ठाणेदार पोलीस स्टेशन चान्नी

नवनवीन तंत्रज्ञानामुळे सोशल मीडियावर काहीना काही ट्रेंड येतच असतो. सध्या सोशल मीडियावर डिजिटल प्रतिकृती बनवण्याचा एक नवीन ट्रेंड मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

टूलच्या मदतीने लोक आपल्या आवडत्या व्यक्तींचे, पाळीव प्राण्यांचे किंवा सेलिब्रिटींचे फोटो मॉडेल बनवत आहेत. या टूलला सोशल मीडियावर 'नॅनो बनाना' असे गंमतीशीर नाव देण्यात आले आहे. हे शक्तिशाली टूल कोणत्याही सामान्य फोटोचे काही सेकंदातच अगदी वास्तववादी आणि जिवंत मॉडेलमध्ये रूपांतर करते विशेष म्हणजे हे याच्यासाठी आपल्या मोबाईल एक्सेस चा संपूर्ण वापर केला जातो त्यामुळे सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. ठाणेदार लांडे यांनी वृत्तपत्राशी बोलता वेळेस सांगितले.

# जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जातींसाठी

### २५ वर्षांनंतर आलेले आरक्षण ठरणार 'गेम चेंजर'
### ५१ सदस्यांची जिल्हा परिषद,
### ७ ते ८ अनुसूचित जातीचे सदस्य निर्णायक

**वर्धा/जनमाध्यम**

तब्बल पंचवीस वर्षांनंतर वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण अनुसूचित जाती प्रवर्गासाठी जाहीर झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय घराणी व दिग्गजांचे समीकरण पूर्णपणे बदलणार आहे. जिल्हा परिषदेतील सध्याच्या ५१ सदस्यांपैकी किमान ७ ते ८ सदस्य अनुसूचित जातीतील असणार असून, पुढील अध्यक्ष या गटातूनच होणार हे स्पष्ट झाले आहे.



यापूर्वी १९९९ मध्ये हातेकर या अनुसूचित जातीतील पहिल्या महिला अध्यक्ष बनल्या होत्या. त्यावेळी 'सहकार आघाडी' व भाजप, शिवसेना, रिपाई, अपक्ष यांच्या जोरावर राज्यातील पहिला महायुती प्रयोग झाला होता. हीच इतिहासाची पुनरावृत्ती आता होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.जिल्ह्यातील पारंपरिक राजकीय वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या या आरक्षणामुळे आगामी सत्ता समीकरणे कशी रचली जातात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**जिल्हा परिषद निवडणुका लवकरच**

महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी गती घेतली असून, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत निवडणूक आयोगाच्या तयारीत वेग आला आहे. सूत्रांनुसार, येत्या दहा ते पंधरा दिवसांत जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे.अलीकडे जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी आरक्षण जाहीर झाले असून, हे निवडणूक प्रक्रियेचा भाग असून लवकरच निवडणुकींच्या तारखा जाहीर होण्याची अपेक्षा आहे. राज्यात महानगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकाही प्रलंबित असून, ऑक्टोबरमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पार पडल्यास महानगरपालिका व नगरपरिषद निवडणुका पुढील वर्षी डिसेंबरनंतर होऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.ही निवडणूक प्रक्रिया स्थानिक प्रशासनासाठी महत्त्वाची असून स्थानिक स्वराज्यवाद अधिक प्रगत करण्यासाठी मदत करेल, असेही विश्लेषक सांगत आहेत.

# शेतकरी हक्क न्याय परिषद १७ सप्टेंबर रोजी

**वर्धा/जनमाध्यम**

शेतकरी व कामगार संघटनांच्या जोरदार पाठिंब्याने १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता वर्धा येथील बजाज वाचनालयात 'शेतकरी हक्क न्याय परिषद' भव्य स्वरूपात आयोजित केली जाणार आहे. दिल्लीचे तिन काळे शेतकरी कायदे रद्द करण्यासाठी झालेल्या दीर्घकालीन आंदोलनाचा पाठिंबा देण्यासाठी वर्ध्यात ही परिषद मोठा व्यासपीठ ठरणार आहे.

दिल्लीतील आंदोलनानंतर वर्ध्यात बजाज चौकात सलग ३६३ दिवस शेतकरी व कामगारांनी धरणे आंदोलन केले आहे. या आंदोलनाला स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर विविध राजकीय पक्ष, सामाजिक व कामगार संघटनांचा पाठिंबा मिळाला आहे. मात्र शेतकऱ्यांची हमीभावाची मागणी अजूनही मान्य झालेली नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या आणि शेतकऱ्यांवरील दबाव वाढत असून विदर्भ व मराठवाडा यांसह देशभरात चिंता वाढली आहे.या परिषदेमध्ये भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय नेते मा. राजेश टिकैत, अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष कॉ. राजन क्षिरसागर, तसेच इतर राष्ट्रीय व स्थानिक शेतकरी आणि कामगार नेते उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.वर्धा जिल्हा सिटू, आयटक, शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला संघटना, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बौद्ध महासभा, लोकशाही अभियान इत्यादी पुरोगामी संघटनांनी परिषदेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

# बालरोग विभाग व परिचर्या महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

### रुग्णालयात पोषाहार सप्ताह साजरा



**वर्धा/जनमाध्यम**

सावंगी मेघे येथील जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालयाचा बालरोग विभाग, राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग आणि असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक्स, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रीय पोषाहार सप्ताह साजरा करण्यात आला.

'निरोगी आयुष्यासाठी योग्य आहार घ्या' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित या पोषाहार सप्ताहाचे उद्घाटन सावंगी रुग्णालयाच्या दालनात रुग्णालय समूहाचे विशेष कार्य अधिकारी संजय इंगळे तिगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालरोगशास्त्र विभाग प्रमुख तथा असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक्सचे अध्यक्ष डॉ. अमर ताकसांडे होते. तर, एओपी शाखा सचिव डॉ. दिनेश हिंगे, परिचर्या संचालक मंजू भट्टाचार्य, फ्लॉरेन्स नाईटिंगेल ट्रेनिंग कॉलेज ऑफ नर्सिंगच्या उपप्राचार्य सारिका खडसे, प्रा. अर्चना ताकसांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाळासाठी योग्य पोषाहार यावर नाटिका सादर केली.

सप्ताहात पोषणतज्ञ डॉ. रोमा सरनाईक मोरघडे यांचे 'बालपणापासूनच संसर्गजन्य आजारांवरील प्रतिबंधासाठी योग्य आहार आणि जीवनशैली' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. या व्याख्यानात डॉ. रोमा मोरघडे यांनी बालपणातील निरोगी खाण्याच्या सवयींचे महत्त्व तसेच शालेय जेवणाचा डबा कसा असावा, याबाबत मार्गदर्शन व पालकांना समुपदेशन केले. याशिवाय, बालरोग भरती विभाग व प्रसूती विभागात बालरुग्ण, त्यांचे पालक, स्तनदा माता व नातेवाईकांसाठी पूरक आहार, संतुलित आहार आणि बालकांची वाढ यावर समुपदेशनात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले. तर, सेवाग्राम येथील यशवंत विद्यालयात आयोजित कार्यक्रमात डॉ. अमर ताकसांडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शालेय वयात निरोगी राहण्याकरिता रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासह अभ्यासात एकाग्र होण्यासाठी पोषक आहारचे काय महत्त्व आहे, हे समजावून सांगितले. गणेशोत्सवानिमित्त दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठ परिसरात आयोजित ज्ञान विज्ञान आरोग्य प्रदर्शनीमध्ये सायंकालीन सत्रात विद्यार्थ्यांनी पोषाहाराविषयी माहिती देताना जंक फूडला हद्दपार करण्याचे आवाहन करीत दैनंदिन जेवणात कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे, चरबी, खनिजे, फायबर आणि पाणी यांचा समावेश असण्याचे फायदे स्पष्ट केले.

या सप्ताहादरम्यान बालरोग विभागात संतुलित आहार, स्तनपान आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व या विषयावर पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत वैद्यकीय आणि नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. बालरोग भरती विभागातील बालकांसाठी पोषक आहारावर मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तर, डॉ. रेवत मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय, नर्सिंग अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि रुग्णालयातील पोषणतज्ञांसाठी पोषाहारावर प्रश्नमंजूषा घेण्यात आली. यात बालरोगशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमाची चमू विजेती ठरली. सप्ताहाच्या अखेरच्या दिवशी चवदार पोषाहार पाककला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सर्वोत्तम पोषक पदार्थ, नवसर्जनशील कृती आणि कलात्मक सादरीकरण यासाठी पुरस्कार देण्यात आले. या आयोजनात एओपीचे सहसचिव डॉ. अमोल लोहकरे, कोषाध्यक्ष डॉ. शंतनू गोमासे आणि बालरोग विभागातील शिक्षक, स्नातकोत्तर विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते व अन्य कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# जिल्ह्यात गोवर, रुबेला लसीकरण मोहीम

### पालकांनी आपल्या पाल्यांचे लसीकरण करुन घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जिल्ह्यात १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीत गोवर आणि रुबेला आजाराचे उच्चाटन करण्यासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी. व मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांचे मार्गदर्शनाखाली गोवर रुबेला लसीकरण मोहीम राबवली जाणार आहे.



या मोहिमेत, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून ५ ते १५ वर्षे वयोगटातील बालकांना गोवर-रुबेला लस दिली जाणार आहे. गोवरमुळे मुलांमध्ये मेंदूज्वर, अंधत्व, अतिसार आणि न्यूमोनियासारखे गंभीर आजार होऊ शकतात, तर रुबेलामुळे गर्भवती महिला आणि नवजात बालकांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. या दोन्ही आजारांवर लस हे सर्वात प्रभावी संरक्षण आहे.या लसीकरण मोहिमेचे उद्दिष्ट ९५ टक्क्यांपेक्षा जास्त बालकांचे लसीकरण करणे आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी आरोग्य विभागासोबतच, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बाल विकास विभाग सक्रिय सहभाग घेत आहेत.वर्धा जिल्ह्यात एकूण १७ आश्रमशाळांमध्ये ३०२१ बालके आहेत. या सर्वांचे लसीकरण करण्यासाठी आरोग्य विभागाने ३४ सुसज्ज लसीकरण पथके तयार केली आहेत. प्रत्येक पथकात प्रशिक्षित लस टोचणारे, पर्यवेक्षक, आशा स्वयंसेविका आणि डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली आहे. लसीचा साठा प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी दिली आहे.शिक्षकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन आपल्या शाळेतील १०० टक्के मुलांचे लसीकरण पूर्ण करावे. तसेच पालकांनी आपल्या मुलांना या लसीपासून वंचित ठेवू नये, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले आहे.

# माध्यमांची जबाबदारी वाढविण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडिया कॅडर कॅम्प

### पत्रकारांनी उत्साहाने घेतला सहभाग
### भविष्यात कार्यक्रमांचा वाढावे निश्चय

**वर्धा/जनमाध्यम**

देशातील आघाडीची सामाजिक व जनजागृती करणारी संघटना 'व्हॉइस ऑफ मीडिया' आयोजित 'कॅडर कॅम्प' चा अंमळनेर येथे उत्साही शुभारंभ पार पडला. अंमळनेरचे आमदार अनिल पाटील यांच्या हस्ते मंगळग्रह मंदिर सभागृहात या कॅम्पचे उद्घाटन झाले. शेतकरी नेते रविकांत तुपकर प्रमुख पाहुणे



म्हणून सहभागी झाले.

उद्घाटन प्रसंगी आमदार अनिल पाटील यांनी माध्यमे समाजाचा आरसा असल्यावर भर दिला आणि पत्रकारितेत जबाबदारीची गरज स्पष्ट केली. रविकांत तुपकर यांनी माध्यमांची लोकशाहीतील भूमिका अधोरेखित करत म्हणाले की, प्रस्थापितांविरोधातील आवाज करणारे माध्यम लोकशाहीचे खरे रक्षण करतात.व्हॉइस ऑफ मीडिया चे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, जळगाव जिल्हा व अमळनेर तालुका संयोजक यांनी कॅम्पाचे उद्दिष्ट व महत्त्व स्पष्ट केले. विविध सत्रांत तज्ञांनी माध्यम क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञान व जबाबदाऱ्या यावर संवाद साधला. राज्यभरातून पत्रकार आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्धा जिल्ह्याचे विभागीय अध्यक्ष किशोर कारंजेकर व जिल्हाध्यक्ष नरेंद्र देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांनी सहभाग नोंदविला. आयोजकांनी भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा विश्वास व्यक्त केला.

## संक्षिप्त

### रेती चोरी करणाऱ्यांवर कारवाई

**देवळी-** यशोदा पात्रातून औवधरित्या वाळूचा उपसा करुन वाळू चोरी करणाऱ्यावर देवळी पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई गणेश नगर ले-आऊटच्या मागील परिसरात करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार, उमेश सुरकार रा. देवळी हा ट्रॅक्टरने देवळी शिवारातील यशोदा नदीतून वाळूचा उपसा करुन चोरी करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी कारवाई करीत ट्रॅक्टर, वाळूसह ७ लाख ५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास देवळी पोलिस करीत आहे.

### विष प्राशन केलेल्या व्यक्तीचा उपचारादम्यान मृत्यू

**देवळी-** ३२ वर्षीय व्यक्तीने विषारी औषध प्राशन केले. ही घटना देवळी तालुक्यातील चिखली येथे घडली. याप्रकरणी देवळी पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे. आशिष काशिनाथ थुल (वय ३२) रा. चिखली असे मृतकाचे नाव आहे. आशिष थूल यानी विषारी औषध प्राशन केले होते. त्याला उपचाराकरीता सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी देवळी पोलिसांनी नोंद केली.

### विदर्भस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**वर्धा-** शिक्षक निवृत्तीनाथ सावरकर गुरुजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या ग्रंथालयाच्या वतीने प्रथम वर्धापनदिनानिमित्त विदर्भस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.यशोदीप हायस्कूल शारदानगर, साईनगर चौक, वर्धा येथे ही स्पर्धा होणार असून 'सोशल मीडियाच्या व्यसनाच्या विळख्यात तरुणाई' हा विषय आहे. स्पर्धकाला मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांमधून विचार मांडता येईल. ही स्पर्धा इयत्ता ९ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठीच असून स्पर्धकांनी आपल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेटर पॅडवर संमतीपत्र व ओळखपत्र स्पर्धेच्या दिवशी सोबत आणणे अनिवार्य आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी १५ सप्टेंबरपूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर सोमवारी वर्ध्यात



**वर्धा:** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर जिल्ह्याच्या दौ-यावर येत असून त्या १५ सप्टेंबर रोजी रात्री विश्रामगृह वर्धा येथे आगमन व मुक्काम. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनसुनावणी कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २ ते ३ वाजता राखीव. दुपारी ३ वाजता आढावा बैठक सायंकाळी ५ वाजता पत्रकार परिषेदस उपस्थिती. व सायंकाळी ६ वाजता वर्धा येथून गोंदियाकडे प्रयाण करतील.

# अभियंता हेमंत ठाकरे यांना इंटरप्रेन्युअर अवॉर्ड



**आष्टी/जनमाध्यम**

आष्टी तालुक्याचे सुपुत्र व आनंद सागर मिनरल वॉटरचे संचालक अभियंता हेमंत ठाकरे यांची इंटरप्रेन्युअर अवॉर्ड साठी निवड झाली असून, १५ सप्टेंबर रोजी अमरावती येथे होणाऱ्या भव्य समारंभात त्यांचा सत्कार होणार आहे.

भारताच्या अभियांत्रिकी क्षेत्राचा अभिमान मानल्या जाणाऱ्या भारतरत्न सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त भारतीय अभियंता संस्था, शाखा अमरावतीच्या वतीने हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. ठाकरे यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात केलेल्या बहुआयामी कार्याची, तांत्रिक नवकल्पनांची आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत या सन्मानासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. अमरावतीतील अभियंता भवन येथे होणाऱ्या या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाणार असून, या प्रसंगी संस्थेचे चेअरमन अभियंता सुनील राठी आणि सचिव राम विघ्ने उपस्थित राहणार आहेत.स्थानिक स्तरावरून ते राज्यस्तरीय व्यासपीठापर्यंत पोहोचलेल्या अभियंता हेमंत ठाकरे यांच्या या यशामुळे आष्टीकरांमध्ये अभिमानाची भावना दाटून आली आहे. त्यांच्या गौरवाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विषबाधा झाल्यानंतर करावयाच्या उपाययोजनांबाबत प्रशिक्षण

### ३१४ डॉक्टरांनी घेतले प्रशिक्षण

**वर्धा /जनमाध्यम**

किटकनाशकाची विषबाधा झाल्यानंतर करावयाच्या उपाययोजनांबाबत डॉक्टर, कृषि विभागाच्या अधिकारी कर्मचा-यासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणुन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रशिक्षक डॉ. देवबन्ना करोगो, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश चांडोळकर, उपविभागीय कृषि अधिकारी स्वप्नील तोरणे, डॉ. चंद्रशेखर महाकाळकर, संचालक प्रशासन डॉ. विठ्ठल वाघ, महासचिव देवेंद्र चंद्रा, स्टीवर्डशिप समिती प्रमुख डॉ. मनीष देशपांडे, वरीष्ठ मॅनेजर डॉ. सुरेंद्रकुमार, विनायक हेगाणा आदी उपस्थित होते.जिल्ह्यातील शेतकरी विविध किटकनाशकाचा वापर करतात आणि यामुळे काही वेळा अपघाती विषबाधा व आरोग्यावर दुष्परिणाम जाणवतात. यासाठी उपाययोजना म्हणुन प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय, महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस सेवाग्राम, जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर व विद्यार्थी यांच्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.याचपार्श्वभूमीवर शेतक-यांना सुरक्षित फवारणी, विषबाधेची लक्षणे, उपाययोजना आणि शेतक-यांना करावयाचे प्रबोधन या विषयी कृषि सहाय्यक, पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी यांच्याकरीता आर्वी उपविभागीय स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा कृषि आयुक्तालय, कृषि विभाग वर्धा क्रॉप लाईन इंडिया व शिवार फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयाजित करण्यात आली होती. त्याचबरोबर वर्धा, आर्वी व हिंगणघाट उपविभागामध्ये कृषि निविष्ठा विक्रेते व कृषि अधिका-यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होत या प्रशिक्षणात जिल्ह्यातील चारशे पेक्षा जास्त अधिकारी व कर्मचा-यांनी सहभागी होऊन प्रशिक्षणाचा लाभ घेतला.डॉ. देवबन्ना करोगो यांनी किटकनाशक किंवा तत्सम रसायनांच्या वापरामुळे जगात दरवर्षी दोन लाखांहून अधिक व्यक्तींचा मृत्यु होतो. शेतक-यांनी किटकनाशके फवारतांना मास्क, हातमोजे, गॉगल व पादत्राणे वापरणे आवश्यक आहे. त्याचबरोबर विषबाधा झालेल्या व्यक्तीला सुरक्षित कसे वाचवावे कोणत्या प्रकारची तात्काळ औषधे व उपायोजना कराव्यात याबाबत मार्गदर्शन केले.प्रशिक्षणामुळे डॉक्टरांमध्ये जनजागृती निर्माण होऊन विषबाधेच्या घटना अधिक कार्यक्षमतेने हाताळू शकतील आणि विषबाधेच्या घटनांमध्ये घट होईल. तसेच रोखता येतील अशी अपेक्षा डॉ. सुरेश चांडोळकर यांनी व्यक्त केली.

# सोयाबीन पिकावर येलो मोझॅक रोगाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना



**वर्धा/जनमाध्यम**

सध्यास्थितीत सोयाबीन पिक शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. ब-याच गावांमध्ये येलो मोझॅक या रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव आढळून आला आहे. यासाठी शेतक-यांनी खालील प्रमाणे उपायोजना कराव्यात असे आवाहन कृषि विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

**रोगाची लक्षणे**

सुरवतीला पानावर पिवळ्या रंगाचे छोटे चट्टे दिसतात. कालांतराने ठिपकांच्या चट्यांचा आकारमान वाढत जातो आणि संपूर्ण पान पिवळे पडून त्यातील हरीतद्रव्याचा -हास होतो. अशा पिवळ्या पानांवर तांबूस करपट रंगाचे ठिपके दिसतात. झाडाची वाढ खुंटते. पाने आखुड, लहान होतात. नवीन पाने पिवळ्या रंगाची बाहेर पडतात. पानाच्या शिराजवळ पिवळ्या रंगाचे डाग दिसतात. झाडाच्या पानांचा काही भाग हिरवट तर काही भाग पिवळसर दिसून येतो. लहान अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास संपूर्ण झाड पिवळे दिसते. अशा झाडांना फुले व शेंगा कमी लागतात. शेंगामध्ये दाने भरत नाही किंवा आकाराने लहान दाने भरतात. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होते.

**उपाययोजना**

शेत तन मुक्त ठेवावे, विळे चिकट सापळे सोयाबीन पिकात प्रती एकरी १० ते१२ या प्रमाणे लावावेत. मोझॅक झालेली प्रादुर्भावग्रसत झाडे दिसून येताच ती वेळोवेळी तात्काळ समुह काढून बांधावर न फेकता जाळून अथवा जमिनीत पुरुन नष्ठ करावीत जेणेकरुन निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. पिक पेरणीनंतर ३०ते ३५ दिवसांनी ५ टक्के निबोंळी अर्काची किंवा ॲझडीरॅक्टीन १ हजार पिपिएम ५० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात करावी. ॲसीटामिप्रिड २५ टक्के अधिक बायफेंथ्रीन २५ टक्के डब्लयू जी ५ टक्के किंवा फ्लोनिकामिड ५० टक्के डब्लू जी ४ ग्रॅम किंवा पायरीप्रोक्झीफेन १० टक्के अधिक बायफेंथ्रीन १० टक्के इसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून वरीलपैकी एका किटकनाशकांची फवारणी करावी. असे उपविभागीय कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २८७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# एकवीरा देवी मंदिर परिसरात दहशतवाद विरोधी मॉकड्रिल -नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती पोलिसांची तयारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था तसेच सुरक्षेच्या दृष्टीने अमरावती शहर पोलिसांकडून एकवीरा देवी मंदिर परिसरात दहशतवाद विरोधी मॉकड्रिल (प्रात्यक्षिक सराव) आयोजित करण्यात आले. हे मॉकड्रिल सकाळी ११ वाजता पार पडले.



ही मॉकड्रिल पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त शाम घुगे, गणेश शिंदे, रमेश धुमाळ तसेच सहा. पोलीस आयुक्त खताळे यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आली. जलद प्रतिसाद पथकाचे प्रभारी पोउपनि अजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली क्यूआरटी पथक, बीडीडीएस (बॉम्ब डिटेक्शन अँड डिस्पोजल स्कॉड), डॉग स्कॉड, एटीबी तसेच राजापेठ पोलीस स्टेशनचा स्टाफ यांनी संयुक्तरीत्या सहभाग घेतला. या सरावाचा उद्देश दहशतवाद किंवा आपत्कालीन परिस्थितीत तातडीने कारवाई करण्याची क्षमता वाढविणे, पोलिस दलाचे समन्वय बळकट करणे आणि नागरिकांच्या सुरक्षेची खात्री करणे हा होता.

# ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे मंगळवार, दि. १६ सप्टेंबर रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत.

दौऱ्यानुसार, मंगळवार, दि. १६ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयातील मिशनच्या कार्यालयात उपस्थित राहतील. दुपारी ३.३० वाजता नांदगाव खंडेश्वर येथील विश्रामगृहात तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, तसेच शासकीय जमिनीवर चारा लागवड यासंबंधी चर्चा करतील. दुपारी ४.१५ वाजता नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियास भेट देतील. त्यानंतर सोईनुसार काटोलकडे प्रयाण करतील.

# कर्जाचे आमिष : महिलेची साडेसात लाखांनी फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्ज मिळवून देतो असे सांगून गुरुदेवनगर (ता. चांदूरबाजार) येथील एका महिलेची तब्बल ७ लाख ३६ हजार रुपयांनी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एका महिलेसह श्रीकांत राऊत (वय ४३, रा. मिल कॉलनी, परतवाडा) यांच्यावर शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




फिर्यादी आशा अनिलराव बदुकले (रा. गुरुदेवनगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून त्यांना आकर्षक अटींवर कर्ज मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विश्वास बसावा म्हणून वारंवार पैशांची मागणी केली. त्यानुसार बदुकले यांनी हप्त्यांमध्ये तब्बल ७ लाख ३६ हजार रुपये दिले. मात्र, प्रत्यक्षात लोन मिळाले नाही. लोन मंजूर झाले नाही हे लक्षात आल्यानंतर आशा बदुकले यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेतली. तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे. सदर गुन्ह्याचा तपास शिरजगाव कसबा पोलीस करीत असून, आरोपींच्या इतर फसवणूक प्रकरणांचा छडा लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# वासंती मंगरोळे यांची प्रदेश महिला कार्याध्यक्षपदी निवड

**अचलपूर/प्रतिनिधीः-** देशातील २० राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य असोसिएशन च्या महाराष्ट्र प्रदेश महिला कार्याध्यक्षपदी वासंती मंगरोळे यांची निवड घोषित करण्यात आली.



अकोला येथील कार्यक्रमांमध्ये संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष कैलास गोरे पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. गेल्या पाच वर्षापासून महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्वपक्षीय जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांच्या हक्कासाठी ही असोसिएशन कार्य करत आहे. जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य हे प्रामुख्याने २४ तास जनतेची सेवा करत असतात. आपले कार्य करत असताना सदस्यांना अनेक वेगवेगळ्या अडचणीचा सामना करावा लागतो. शासन दरबारी कामाचा पाठपुरावा करणे आणि अधिकारी वर्गाकडून जातीने लक्ष घालून योग्य त्या पद्धतीने काम करून घेणे हे प्रामुख्याने कार्य आहे. संस्थेच्या वतीने राज्यात महिला सक्षमीकरण आणि महिलांचे संघटन करण्याच्या उद्देशाने आपल्या सामाजिक कामात आणि राजकीय क्षेत्रात अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या वासंती मंगरोळे यांना महिला कार्याध्यक्ष पद देऊन संस्थेचे कार्य नक्कीच भक्कम होईल असा विश्वास गोरे पाटील यांनी व्यक्त केला.

अकोला येथील महिला सक्षमीकरण या कार्यशाळे दरम्यान सदर कार्यक्रमासाठी सम्यक या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद पवार आणि संघटनेचे राज्य उपाध्यक्ष गोपाळ कोल्हे (जिल्हा परिषद अकोला) व अमरावती जिल्हा परिषदेमधील महिला सदस्य,अकोला जिल्हा परिषद आणि यवतमाळ जिल्हा परिषद मधील महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.येणाऱ्या पंचवार्षिक मध्ये राज्यातील सर्व महिलांना एकत्र करून चांगल्या पद्धतीने कार्य करण्याचा मानस असल्याचे मत मंगरोळे यांनी यावेळी बोलून दाखवले.

# भारतीय बौद्ध महासभेचा महामोर्चा १७ सप्टेंबरला अमरावतीत

**काटपुर/प्रातिनिधीः-** महाबोधी महाविहार मुक्तीसाठी भारतीय बौद्ध महासभा, भिक्षु संघ व समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे.

हा मोर्चा भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार यांच्या नेतृत्वात निघणार असून, अमरावती महानगर व जिल्ह्यातील १४ ही तालुक्यांतील आंबेडकरी अनुयायी, विविध संस्था, संघटना व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

मोर्चाची सुरुवात दुपारी १२.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इरविन चौक) येथून होणार असून, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कूच करण्यात येईल. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, बिहारचे राज्यपाल व मुख्यमंत्री, तसेच महाराष्ट्राचे राज्यपाल व मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात येणार आहे.

महाबोधी महाविहार हा जागतिक बौद्धांचे पवित्रस्थळ असून त्याचे व्यवस्थापन बौद्ध समाजाकडे यावे, ही अनेक वर्षांची मागणी अद्याप प्रलंबित आहे. शासनाकडून योग्य निर्णय न झाल्यामुळे हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. त्यामुळे देशभरात आंदोलन सुरू असून, अमरावती जिल्ह्यातही भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

मोर्चामध्ये भारतीय बौद्ध महासभेचे प्रा. प्रकाश बोरकर, प्रा. डॉ. मुकेश सरदार, गणपतराव तिडके, प्रा. डॉ. रमेश बडगे, प्रा. डॉ. प्रमोद भालेराव, ललित कांबळे, माया धांडे, संगीता सरदार, विध्या वानखडे, उमा वानखडे, मलती मेश्राम, निर्मला नागले, राजेश चौरपगार, पुरुषोत्तम वंजारी, विलास आठवले, राहुल शेंडे, ॲड. प्रमोद वानखडे, बलवंत गाठे, प्रमोद खडे, नयन मोंढे आदींसह समस्त पदाधिकारी, संस्था व संघटनांचा मोठा सहभाग राहणार आहे.

'महाबोधी महाविहार मुक्ती हा बौद्धजनांच्या अस्मितेचा प्रश्न असून, हा मोर्चा अतिभव्य प्रमाणात यशस्वी करावा,' असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सेवा पंधरवडाः तीन टप्प्यात राबवविणार विविध उपक्रम -तहसिल कार्यालयाच्या वतीने सर्व विभागांना सुचना

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी महसूल विभागातर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. महसूल प्रशासनाला अधिक लोकाभिमुख बनवत या पंधरवड्यात शेवटच्या घटकापर्यंत शासकीय सेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने करावयाची सर्व कामे वेळेवर आणि युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना अंजनगाव सुर्जी तहसिलदारांनी महसूल सह सर्वच प्रशासन विभागाला दिल्या आहेत.

अंजनगाव सुर्जी तालुक्यात १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत.

प्रशासकीय सेवा नागरिकांना जलद आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तसेच तीन टप्प्यात ही मोहिम राबविण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात दि. १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीत पाणंद रस्ते आणि शेतीला जोडणारे मार्ग, या टप्प्यात पाणंद, शिवरस्त्यांना क्रमांक देण्याच्या महसूल विभागाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करून ते गाव नकाशावर चिन्हांकित केले जातील. निस्तार पत्रकामध्ये नोंद नसलेल्या पाणंद रस्त्यांची नोंद घेण्याची कार्यवाही केली जाईल. शेतकऱ्यांसाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्र घेतले जातील. रस्ता अदालत आयोजित करून शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जातील. शेतरस्त्यांची मोजणी आणि सीमांकन केले जाईल.




दुसऱ्या टप्प्यात दि. २३ ते २७ सप्टेंबरमध्ये या कालावधीत 'सर्वांसाठी घरे' योजनेची अंमलबजावणी केली जाईल. यात घरे बांधण्यासाठी शासकीय जमिनी कब्जेहक्काने दिल्या जातील. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील. पात्र लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप केले जातील. यामध्ये शासकीय जमिनी वाटप केलेल्या, अतिक्रमण नियमित केलेल्या तसेच २०११ पूर्वीच्या गावठाणातील अतिक्रमणे नियमित केलेल्या लाभार्थ्यांचा समावेश असेल.

तिसऱ्या टप्प्यात दि. २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. यात जनसंवाद, १५५ अंतर्गत आदेशांची तपासणी, जिवंत सातबारा मोहीम आणि 'गाव तिथे स्मशानभूमी' या उपक्रमांची अंमलबजावणी केली जाईल.

या मोहिमेत अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समिती, उपअधीक्षक भूमी अभिलेख आणि विविध विभागांचे अधिकारी सक्रिय सहभाग घेणार आहेत. नागरिकांनी या 'सेवा पंधरवडा' उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसील कार्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे

# शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७(१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. १४ सप्टेंबर ते दि. २८ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी कळविले आहे.

# दर्यापूर तालुक्यात जोरदार पाऊस -शेती पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान

**खल्लार/प्रतिनिधीः-** गेल्या वर्षांच्या तुलनेत यंदाचा पावसाळा हा अधिक बरसला असून त्यामुळे दर्यापूर तालुक्यासह संपूर्ण जिल्हाभरातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. इतर तालुक्याच्या तुलनेत दर्यापूर तालुका हा काही प्रमाणात पिक परिस्थितीबाबत समाधानकारक राहिला. परंतु गेल्या दोन-तीन दिवसापासून सतत पाऊस बरसत असल्यामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आज (दि.१३) सायंकाळच्या सुमारास तालुक्यात मुसळधार पावसाने विजांच्या कडकडासह जोरदार हजेरी लावली. हातातोंडाशी आलेले सोयाबीन पिक जळण्याच्या मार्गावर लागले आहे. तूर हे पिक जळत आहे तर कपाशीही सुद्धा पिवळी पडण्याच्या मार्गावर आहे. शेती लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी कर्ज काढून पिक उभे केले. त्याचा मोबदला निघणे सुद्धा कठीण बनले आहे.



आज (दि.१३)सायंकाळी मुसळधार पावसाला पुन्हा सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. अगोदरच नापिकी व कर्जबाजारी असल्यामुळे शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढतच चालला आहे.

शेतकरी हा कर्जमुक्त नसून कर्जयुक्त बनला. हवामान विभागातर्फे आणखी काही दिवस पाऊस बरसणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढत आहे. दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची शासन दरबारी एकमुखी मागणी केली आहे.

# जुन्या वादात तरुणावर प्राणघातक हल्ला -वलगाव येथील घटना, आरोपी अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** जुन्या वादात तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना वलगांव पोलीस ठाणे अंतर्गत शिराळा येथील आठवडी बाजारात समोर आली आहे. सचिन रमेशराव पाटील (वय ३०) असे हल्ल्यांमध्ये जखमी युवकाचे नाव आहे. पोलिसांनी आरोपी वैभव उर्फ राजेंद्र श्रीकृष्ण मुंदाणे याला अटक केली आहे.

माहितीनुसार गुरुवारी रात्री शिराळा येथील आठवडी बाजारात गजानन गवळी यांच्या दुकाना समोर सचिन पाटील उभा होता. त्याला पाहताच जुन्या वादात आरोपी वैभव मुंदाने याने त्याच्यावर चाकुने हल्ला केला. सचिन पाटीलच्या गळ्यावर, पायावर चाकूने वार करण्यात आले आहे.

यामुळे तो गंभीर जखमी झाला. त्याला रक्तबंबाळ करून आरोपी तेथून पळाला. घटनेची माहिती गावातील नागरिकांनी पोलिसांना आणि सचिन पाटील च्या कुटुंबीयांना दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून जखमी सचिन पाटील याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहे. सचिन चा भाऊ चेतन पाटील यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी वैभव मुंदानेला अटक केली आहे.

प्रो.क्र. /२०२५

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्रमांक ३४७/२०२५ — ने.ता.२८.१०.२०२५

अर्जदार : **१.संतोष नागरमल महर्षी,** वय ७७ वर्षे, धंदा- घरकाम
**२.सुनीलकुमार नागरमल महर्षी,** वय ६५ वर्षे, धंदा- शेती
**३.अरविंद नागरमल महर्षी,** वय ४६ वर्षे, धंदा- शेती
अर्जदार क्र.१ ते ३ रा.पुर्णानगर, ता.भातकुली, जि.अमरावती
**४.प्रमोद नागरमल महर्षी,** वय ५२ वर्षे, धंदा- शेती
रा.इंदिरा नगर, नाशिक, ता.जि.नाशिक
**५.राजेंद्र नागरमल महर्षी,** वय ५७ वर्षे, धंदा- शेती
रा.तुंगार्ली, लोणावळा, ता.जि.पुणे

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

ज्यापेक्षा **नागरमल प्रतापदास महर्षी हे दि.०६.०८.२०२५ रोजी मयत झाले.** अर्जदार **संतोष नागरमल महर्षी, वय ७७ वर्षे, व्यवसाय- घरकाम, रा.पुर्णानगर,ता.भातकुली, जि.अमरावती** व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.०९.०९.२०२५ रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **नागरमल प्रतापदास महर्षी** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **नागरमल प्रतापदास महर्षी** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **११.०९.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर)
भातकुली,दि.११.०९.२०२५

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अमरावती विभाग, अमरावती

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.:- १६५/ २०२५**
**सार्वजनिक न्यासाचे नांव नोंदणी क्रमांक - श्री जावरेकर मठ श्री दत्ता मंदिर संस्थान सुरळी ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**बाबत अर्जदार - निळकंठ विनायकराव देशमुख**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) -

**ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** ग्राम पंचायत सुरळी यांचे हददीतील मालमत्ता क्र. ४५६ त्यांचे एकुण क्षेत्रफळ १०७५ चौ.फुट यावर बांधलेले मंदिर व खुली जागा ज्यांची चतुसिमा पुर्वेस- देशमुख यांचे घर,पश्चिमेस- पु.देशमुख यांचे घर, उत्तरेस- वि.उल्हे यांचे घर, दक्षिणेस- खाली जागा

**स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत- रु.२,५२,८१४/-** (दोन लाख बावन्न हजार आठशे चौदा रुपये )

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १०/०९/२०२५ रोजी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**अधीक्षक (न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.पी.के.धोंडगे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८३८/२०२५
**श्री.मोहन अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०६.१०.२०२५

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. **Mohan** Dhanraj Choudhari, Age 48 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Anant Vihar Colony, Priyanka Colony, Shegaon Road, Amravati
2. **Sangita** Dnyaneshwar Ingale, Age 50 Yrs. Occu.: Household R/o Anant Vihar Colony Priyanka Colony, Shegaon Road, Amravati.
3. **Varsha** Amol Bhivapure, Age 45 Yrs. Occu.: Household R/o C/o Dipak Chawre Plot No.22, Beltarodi Road, Near Kanchore Lawn, Nagpur, Tq. Dist. Nagpur.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत धनराज रामभाऊ चौधरी** हे दिनांक 04.01.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **प्रमिला धनराज चौधरी** ही दिनांक **06.07.2023** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **मोहन अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मोहन अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.एस.बिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८१४/२०२५
**श्री.राजेश अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१९.०९.२०२५

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Rajesh Kamalalkar Nawathe, Age 53 Yrs. Occu.: Business R/o Ganesh Colony, Gaytri Mandir Road, Amravati. Tq. Dist. Amravati
2. Shivani Shekhar Pendse, Age 56 Yrs. Occu.: Household R/o Moti Nagar, Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
3. Archana Subhash Haridas, Age 55 Yrs. Occu.: Household R/o Q-102, Madhuvanti Sinhgad Road, Nanded City Pune, Tq.Dist.Pune

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **कमलाकर सखाराम नवाथे** हे दिनांक 31.01.2012 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **स्मिता कमलाकर नवाथे** ही दिनांक 17.01.2019 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **राजेश अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राजेश अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१८१६/२०२५
**शांता -वि- निरंक**
पुढील ता.२२.०९.२०२५

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. शांता विनायक तायडे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.उर्वशी नगर, गणपती मंदिर कठोरा, अमरावती
२. रोशनी विनायकराव तायडे (लग्नापुर्वीचे नांव) रोशनी सतीश सोनोने (लग्नानंतरचे नांव) रा.उर्वशी नगर, गणपती मंदिर कठोरा, अमरावती
३. धनश्री मयूर ढेरे, वय ३२ वर्षे, व्यवसाय - नोकरी रा.जयस्तंभ चौक, वडुरा, अमरावती ता.जि.अमरावती
४. राजदीप विनायक तायडे, वय ३३ वर्षे, व्यवसाय - नोकरी रा.प्लॉट नं.२८७ जुना भंडारा रोड, गरोबा मैदार भांडेवाडी, नागपूर, ता.जि.नागपूर

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विनायक नागोराव तायडे** यांचे दिनांक **०८.०४.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शांता विनायक तायडे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शांता विनायक तायडे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# पावसामुळे जिल्ह्यातील ५७२ हेक्टर जमीन बाधित

## कापूस, तूर, सोयाबीन, धान, मका पिकांसह इतर पिकांचे नुकसान

**अमरावती/का.प्र.**

२०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर मोठा परिणाम झाला आहे. ऑगस्ट महिन्यातच ४५,५८२ हेक्टर क्षेत्रातील पिके नष्ट झाली, तर ५७२ हेक्टर जमीन पूर्णपणे वाहून गेली. कापूस, तूर, सोयाबीन, धान, मका आणि इतर पिकांसह मुख्य पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे. असे असूनही, बाधित शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत सरकारी मदत मिळालेली नाही, त्यामुळे त्यांच्यात प्रचंड नाराजी आणि संभ्रम आहे.



**सोयाबीनमध्ये पिवळा मोझॅक विषाणू**

सोयाबीनमध्ये पिवळ्या मोझॅक विषाणूचा परिणाम विशेषतः अचलपूर, तिवसा आणि चांदूर बाजार तहसीलमध्ये दिसून येतो. सतत पाऊस आणि शेतात पाणी साचल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ८३.५% पाऊस पडला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. काही तालुक्यांमध्ये पाऊस समाधानकारक होता, परंतु अजूनही अनेक भागात पाण्याची कमतरता आहे. शेतकऱ्यांच्या पिकांच्या नाशाचे हे कारण बनले आहे.

**१९,९६९ शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा वेबसाइटवर अपलोड**

प्रशासनाने १९,९६९ शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड केले आहेत. जिल्हा पातळीवरही त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. २३.६९ कोटी रुपयांच्या मदतीची यादी सरकारला पाठवण्यात आली आहे, परंतु अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचलेले नाहीत. पाहिले तर, शेतकरी नैसर्गिक आपत्तीशी झुंजत असताना, दुसरीकडे पिकांवर रोगांचा प्रादुर्भावही सुरू झाला आहे. त्यामुळे कापसावर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, जो मुळांच्या कुजण्यामुळे होतो आहे.

**शेतकऱ्यांना मिळेल नुकसान भरपाई**

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी जिल्हा प्रशासन वेगाने काम करत आहे. १९,९६९ शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा अपलोड करण्यात आला आहे. यादी सरकारला पाठवण्यात आली आहे. शेतकऱ्यांना लवकरच भरपाई मिळेल.

**राहुल सातपुते, जिल्हा कृषी अधीक्षक, अमरावती**

## किराणा व्यापारी मुरारीलाल तांबी यांची फसवणूक

### दोन लाखात एक किलो बनावट सोने

**अचलपूर/वार्ताहर**

रस्ता खोदकामावर मजुरी करताना सापडलेले एक किलो सोने दोन लाखांत विकून अचलपूर येथील किराणा व्यावसायिकाची फसवणूक करण्यात आली. शहरातील नागपुरीगेट ठाण्यात दोघा तोतयांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

मुरारीलाल मदनलाल तांबी (वय ५२, टेलिफोन एक्सचेंज समोर, अचलपूर), असे फसवणूक झालेल्या व्यापाऱ्याचे नाव असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तांबी यांनी त्याचे दुकान नेहमीप्रमाणे उघडताच दोन व्यक्ती किराणा घेण्याकरिता आले. त्यातील एकाने तांबी यांना एक अत्तरची बॉटली सुगंध घेण्याकरिता दिली. त्यानंतर सदर व्यक्तीकडे असलेली पिवळ्या धातूसारखी वस्तू दाखवून त्यांनी स्वतःला राजस्थान येथे रस्त्याच्या कामावर मजुरी करीत असताना सोन्यासारखी ही वस्तू मिळाली आहे. ती वस्तू विकत घेता काय, याबाबत विचारणा केली. तांबी यांनी त्या व्यक्तीचा मोबाईल क्रमांक घेऊन त्यांना स्वतः चाही मोबाईल क्रमांक दिला. सदर ग्राहक म्हणून आलेल्या व्यक्तीने स्वतःचे नाव राजूसिंग, असे सांगून तो राजस्थान येथील रहिवासी असल्याची बतावणी तांबी यांच्यासोबत बोलताना केली होती.चर्चा करून दोघेही अनोळखी इसम निघून गेले. रात्री पावणेआठच्या सुमारास कथित राजूसिंग याने तांबी यांच्यासोबत संपर्क साधून पुन्हा सोने घेण्या बाबत विचारणा केली. मुलासोबत सोने घेण्याबाबत चर्चा करून कथित राजूसिंग याच्यासोबत संपर्क साधून व्यवहाराकरिता होकार दिला. राजूसिंग याने सोने घेण्याकरिता नागपुरीगेट परिसरा तील शासकीय अध्यापक विद्यालयाच्या लोखंडी गेटजवळ बोलविले. राजूसिंगने तांबी यांची भेट घेऊन एका व्यक्तीला फोन करून बोलावून घेतले. सदर व्यक्तीने पिवळ्या धातूची सोन्या सारखी एक किलो वजनाची वस्तू दाखवून ती तांबी यांना दिली.तांबी यांनी दोन लाख रुपये त्या व्यक्तीजवळ दिले. त्यानंतर दोघेही अनोळखी व्यक्ती निघून गेले. अचलपूरला आल्यानंतर तांबी यांच्या मुलाने सदर सोनेसदृष वस्तूची तपासणी केली असता ते सोने बनावट निघाले. दिशाभूल करून बनावट सोने देऊन आपली फसवणूक केली, असा आरोप मुरालीलाल मदनलाल तांबी यांनी नागपुरीगेट ठाण्यात दाखल तक्रारीत केला. त्याआधारे पोलिसांनी अनोळखी फसवणुकी चा गुन्हा दाखल केला आहे.

## अप्पर वर्धा धरणाचे तेराही दरवाजे पुन्हा उघडले

**मोर्शी/वार्ताहर**

अप्पर वर्धा धरणाचे १३ पैकी १३ दरवाजे ४० सेंटिमीटरने रात्री ९ वाजता पुन्हा उघडण्यात आले असून त्यामधून आता ८४४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे.



अप्पर वर्धा धरणातील पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असून मध्यप्रदेशातील जाम नदी व सालबर्डी येथून वाहणारी माडू नदी तुडुंब भरून वाहत आहे. त्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात झपाट्याने वाढ असल्याने तसेच वर्धा नदीखालील भागातील नदी नाले इत्यादींचा विसर्ग नदीच्या पात्रामध्ये राहणार असल्यामुळे नदीचे पाण्याच्या पातळीमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता बघता व अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता तसेच धरणामध्ये येणाऱ्या येव्यानुसार जलाशय प्रचलन सूची नुसार पुन्हा विसर्ग वर्धा नदी पात्रात सोडण्यात आलेला आहे. दि.२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता पाण्याच्या साठ्याची टक्केवारी ९६.२७ एवढी होती. अप्पर वर्धा धरणाची निर्धारित पाण्याची पातळी ३४२.५० मीटर एवढी ठेवण्यात आली असून सध्या ही पातळी ३४२.३७ मीटर आहे. जवळपास ९७.८७ टक्के धरण भरलेले आहे.

आता अप्पर वर्धा धरणाचे १३ पैकी १३ दरवाजे उघडण्यात आल्यामुळे व दोन दिवस समोर सुट्टी असल्यामुळे हे विहंगम दृश्य बघण्यासाठी व पाण्याचे तुषार अंगावर झेलण्यासाठी पर्यटकांची अप्पर वर्धा धरण परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळणार आहे.

## अष्टमासिध्दी ते कविठा रस्ता देत आहे अपघाताला निमंत्रण

### रस्ता दुरुस्तीची काँग्रेसची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

तालुक्यातील ग्रामस्थांसाठी जीवनदायी ठरणारा अष्टमासिध्दी ते कविठा हा मुख्य रस्ता बांधकाम विभागाच्या हलगर्जीपणामुळे अपघातग्रस्त झाला आहे.पावसामुळे तयार झालेल्या चिखलाच्या दलदलीमुळे या मार्गावरून वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



गावकऱ्यांनी या रस्त्याबाबत अनेकदा लक्ष वेधूनही संबंधित विभागाने योग्य दखल घेतली नाही.त्यामुळे या मार्गावर लहानमोठे अपघात होऊन नागरिकांना आर्थिक व शारीरिक नुकसान सहन करावे लागत आहे.शालेय विद्यार्थ्यांपासून शेतकरी,व्यापारी, कामगार सर्वांनाच या रस्त्याच्या दुर्दशेचा फटका बसत आहे.या गंभीर समस्येकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नामदेव तनपुरे यांनी पुढाकार घेतला आहे.अष्टमासिध्दी ते कविठा हा रस्ता दुरुस्त होणे अत्यावश्यक आहे. तत्काळ दुरुस्ती न झाल्यास जनतेसोबत आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. स्थानिक ग्रामस्थांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला असून, रस्ता दुरुस्तीबाबत तात्काळ कार्यवाही करावी अशी एकमुखी मागणी होत आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्ती न केल्यास ग्रामस्थ व सामाजिक संघटना मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरण्याची शक्यता आहे.

## जनसुरक्षा विधेयक हा लोकशाहीवर थेट हल्ला- प्रा.विरेंद्र जगताप

### महाविकास आघाडीतर्फे चांदूर रेल्वेत निदर्शने

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

जन सुरक्षा विधेयक हा लोकशाहीवर थेट हल्ला आहे. हा कायदा लागू झाला तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आंदोलनाचा अधिकार व संघटनांचा अधिकार धोक्यात येईल. विरोधकांना दडपण्यासाठी व सामान्य नागरिकांवर खोटे गुन्हे लादण्यासाठी सरकार या कायद्याचा दुरुपयोग करेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व माजी आमदार मा. वीरेंद्र भाऊ जगताप यांनी केले.



महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी महाविकास आघाडी तर्फे आज चांदूर रेल्वे येथे भव्य निदर्शने करण्यात आली. आंदोलनानंतर तहसीलदार कार्यालयास मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून निवेदन देण्यात आले.या वेळी कॉम्रेड देविदास राऊत, आपचे नितीन गवळी, प्रा. तेलंग सर, कॉम्रेड सतीश चौधरी, काँग्रेसचे प्रदीप उर्फ बंडूभाऊ जगताप, बंडू भाऊ यादव शिवसेना यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गणेश आरेकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख, अमोल होले तालुकाध्यक्ष काँग्रेस, मा. नगराध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व वर्तमान संचालक प्रभाकराव वाघ, अध्यक्षीय भाषण कॉम्रेड शिवाजीराव देशमुख यांनी केले.यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, नागरिक आणि विविध पक्षांचे पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले. सर्वांनी एकमुखी ठराव करून महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक तात्काळ रद्द करण्याची मागणी केली.यावेळी कॉम्रेड विनोदजी जोशी, अमोल होले तालुकाध्यक्ष काँग्रेस, विनोद काळमेघ राष्ट्रवादी, प्रशांत शिरभाते स्वाभिमानी शेतकरी संघटना, शिट्टुदादा सूर्यवंशी माजी नगराध्यक्ष, नितीन जी टाले, श्रीनिवास सूर्यवंशी, भूषण नाचवनकर, गजानन यादव शिवसेना, हर्षल वाघ, देवानंद खुणे, अशोकराव चौधरी, सागर दुर्योधन, प्रफुल कोकाटे, सुमित सरदार, सनी सावंत, भावेश देशमुख, सागर भोंडे, नरेंद्र मेश्राम, सक्षम वानखडे, सारंग देशमुख, सतीश देशमुख, प्रवीण चींचे, विजय राठोड, पंकज शिंदे, महेश कलावटे, पंकज मेश्राम, शरद घासले, भीमराव पवार, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## क्रांती चौकच्या राजाची विसर्जन मिरवणूक ठरली आकर्षण केंद्र

### भर पावसात भाविकांचा जल्लोष

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

चांदुर रेल्वे शहरातील क्रांती गणेश मंडळाच्या राजाची विसर्जन मिरवणूक आकर्षण केंद्र ठरली.



या मिरवणुकीत ढोल ताशे च्या गजरात क्रांती चौकातून निघाली. या शोभयात्रेला पाहण्याकरिता नागरिकांची अलोट गर्दी जमा झाली होती.

क्रांती गणेश मंडळ मागील ५० वर्षापासून गणेश उत्सव स्थापित करत आहे. या गणेशोत्सव दरम्यान विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजन करत असते. समाज प्रबोधन, देशभक्ती गीत, सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य शिबीर आणि लहान मुलांच्या कला गुणांना वाव मिळण्याच्या दृष्टिकोनातून विविध कार्यक्रमाचो आयोजन दहा दिवस केल्या जात असते. विविध प्रकारच्या झाकीया, भजन मंडळ, ताल,मृदंग, ढोल ताशा पथक तसेच डीजेच्या गजरात क्रांती चौक राजाच्या विसर्जनाची मिरवणूक आकर्षणाचा केंद्र ठरली.

बाळासाहेब ठाकरे चौकात भव्य फटाक्यांची आतिषबाजी करून महाआरती करण्यात आली. त्यानंतर बाप्पाला शिवनी तलावात भावापूर्ण निरोप देण्यात आला. या मिरवणुकीस यशस्वीरित्या संपन्न करण्याकरिता मंडळाचे अध्यक्ष रुपम जयस्वाल, माजी नगरसेवक सचिन जयस्वाल, नितीन गोखले, श्याम जाधव, शुभम जाधव, उमेश गोखले, अमित तळोकार, पिंटू तळोकार, लोकेश मानकर, अतुल दामले, गौरव मोरे, स्वप्निल खेरकर, आदर्श जैन, प्रवीण खेरकर, अर्जुन गजपुरिया, नितिन कोकाटे, विजय गजपुरिया, हरीश जालान, प्रणव चवरे, कृष्णा तिवारी, योगेश इंद्रावणे, अथर्व सालपे, अभिषेक काळे,ओम तळोकार, रुद्र जैस्वाल यांच्यासह अनेक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## पोटे स्कूलच्या विद्यार्थ्यांचे प्रश्नमंजुषा स्पर्धेत यश

**अमरावती-**पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल



स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल हेरिटेज प्रश्नमंजुषेमध्ये वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी तिसरी लेवल व वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी चौथी लेवल प्राप्त केली. या स्पर्धेमध्ये वर्ग सातवी ते दहावी पर्यंतचे विद्यार्थी सोहम वानखडे, बिलाल हुसेन, श्रीयांश मावले, देवांश देशमुख, निमेश मोहोड, गिष्मा काकडे, नैतिक अग्रवाल, आर्यन बारब्दे, शिवम वानखडे, प्रियांश निकम यांचा सहभाग होता. या सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये नाविन्य मिळवून यश संपादन केले. त्यासाठी शाळेच्या प्राचार्यांनी व उपप्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. या विद्यार्थी तयार करण्याच्या मागचे श्रेय विनोद शुक्ला यांना देण्यात येते.

## संक्षिप्त

### मराठी वाङमय मंडळाचे उद्घाटन



**अमरावती-**इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात मराठी वाङ:मय मंडळाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या प्रसंगी 'निरक्षरांचे अक्षर लेणे'विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे उपस्थित होते. उद्घाटन डॉ. पूनम चौधरी, कार्यकारिणी सदस्य, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या मनोगतात मराठी वाङ:मय मंडळ विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव देणारे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादित केले या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अनुराधा वऱ्हाडे यांनी 'निरक्षरांचे अक्षर लेणे' या विषयावर मार्गदर्शन केले.प्रास्ताविक डॉ. वंदना भोयर यांनी केले.संचालन भूमिका व्यवहारे आभार जिया वायरे हिने मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागातील डॉ. स्वाती भेटाळू, प्रा. स्नेहल कोरडे प्रा. मनिषा अडगावकर, प्रा सीता शिंदे,तसेच प्रा. डॉ.सीमा अढाऊ ,प्रा.वंदना गावंडे,प्रा. अनूप आत्राम , सविता टिपरे , श्रुतिका हाडोळे, साक्षी राखाडे, पायल मसराम,ईश्वरी ठाकरे, श्रुतिका अपराधे, खुशी ढोके, रसिका शेंडे यांनी प्रयत्न केले.

### गुंफाबाई मनोहर यांचे निधन



**शिराळा-**माहुली जहाँगिर येथील गुंफाबाई वामनराव मनोहर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृध्दकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले सुना चार मुली नातवंडे आहेत. अंगणवाडी सेविका सुनीता ढोके यांची आई तर शिराळा येथील पत्रकार डीआर वानखडे यांच्या सासुबाई होत्या.

### बचत गटाला ३२ लाखाचे कर्जवाटप



**आसेगाव पूर्णा**-स्थानिक ग्रामपंचायत सभागृह आसेगाव पूर्णा येथे इंडियन बँक शाखा आसेगाव पूर्णा व राजमाता जिजाऊ प्रभाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने लोन मेळावा घेण्यात आला होता. या बँक लोन मेळावाच्या माध्यमातून सात बचत गटाला ३२ लाख रुपये वाटप करण्यात आले.यावेळी इंडियन बँकेचे शाखा व्यवस्थापक आकाश भोसले तसेच प्रभाग संघ अध्यक्ष राखीताई कैथवास,बँक सखी दुर्गा महल्ले, प्रणिता उपासे, सविता चौधरी, ज्योती वाटाणे, शिल्पा गवई, अंजू इंगळे, उज्वला वाटाणे उपस्थित होते.

### पोटे पाटील महाविद्यालयात आयुर्वेद दिनानिमित्त कार्यक्रम

**अमरावती-** भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग च्या वतीने देशातील ६०० आयुर्वेद महाविद्यालयासह आयुष संशोधन संस्था आयुष विद्यापीठे आयुर्वेद चिकित्सक यांच्या सहभागाने २३ सप्टेंबरला जागतिक आयुर्वेद दिवस साजरा केल्या जाणार आहे. अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा संचालित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद च्या वतीने १० दिवसिय 'आयुर्वेद डे' साजरा करण्याची योजना आखण्यात आली आहे. या निमित्त मेडिकल तथा वेलनेस कॅम्प सेमिनार जनजागृती पदयात्रा, औषधी वनस्पती प्रदर्शनी



व मार्गदर्शन शिबिर, जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांकडून पथनाट्य आहार तथा योगाच्या माध्यमातून निरोगी राहण्याबाबत मार्गदर्शन सांस्कृतिक क्रीडा, वादविवाद, वकृत्व स्पर्धा, क्विझ कॉन्टेस्ट, आरोग्य प्रदर्शनी व रोगनिदान तथा उपचार शिबिराचे आयोजन केल्या जाईल. भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाचे सचिव मा.सच्चिदानंद मिश्रा यांना या संदर्भात दिशा निर्देश देखील जाहीर केले आहे प्रत्येकासाठी आयुर्वेद पृथ्वी कल्याणसाठी आयुर्वेद आयुर्वेद फोर पीपल्स अँड प्लॅनेट ही आहे कोविड सारख्या महाभयंकर रोगाच्या काळात आयुर्वेदातील रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या उपायामुळे आयुर्वेदाला जगमान्यता मिळाली आता आयुर्वेद जीवन पद्धती व चिकित्सा पद्धती जगभर रुजावी म्हणून भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने जागतिक आयुर्वेद दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

**तहसिलदार मंगरुळपिर यांचे कार्यालय,**

**रा.मा.क्र.टिएनसी-४६/मंगरुळपीर/ /२०२५-२६**

**जाहिरनामा**


या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोंकाना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार जावेद अब्दुल गणी रा.ता. मंगरुळपीर यांच्या अर्जान्वये सुरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे मंगरुळपीर येथील सर्वे क्र/गट क्र १७३ मधील ०.७३ हे आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये हस्तांतरणास बंदी-वतन कायद्या अन्वये हस्तातरणास बंदी कलम ५७ नुसार अहस्तांतरनिय या नावाचे शेरा / कुळ दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप/हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून (कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्थळ- मंगरुळपीर**
**दिनांक-११/०९/२०२५**
**(शिक्का)**
**तहसिलदार**
**मंगरुळपीर**

# यवतमाळ येथे ३३५ कोटींच्या विविध विकास कामांचे लोकार्पण

## -आदिवासींच्या जीवनात येत्या ३ वर्षांत आमुलाग्र परिवर्तन घडेल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**यवतमाळ/प्रतिनिधीः-** आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने महत्वाच्या योजना हाती घेतल्या असून, त्यासाठी देशात १ लक्ष कोटी रू. निधी उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातही आदिवासी समाजासाठी घरे, रस्ते, वीज, पाणी, वसतिगृह व रोजगार अशा सुविधांसाठी योजना-उपक्रम राबविण्यात येत असून, पुढील ३ वर्षांत आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे एकूण ३३५ कोटी रु.च्या विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन तसेच विविध उपक्रमांचा शुभारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार संजय देशमुख, आमदार राजू तोडसाम, आमदार किसनराव वानखेडे, सईताई डहाके, संजय डेरकर, श्याम कोडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी विकास मीना आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आदिवासी समाजासाठी ५४ हजार कुटुंबांना घरे, नळांद्वारे पाणी, उपचारासाठी दवाखाने, वसतिगृह अशा अनेक सुविधा वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासी विकासासाठी ज्या योजना व उपक्रम आणले, तशी भरीव कामगिरी त्यापूर्वी झालेली नाही. आदी कर्मयोगी योजनेतून जिल्ह्यातील ३६६ गावांची निवड झाली आहे. योजनेतून राज्यातील ३० लाख युवकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. त्यातून स्थानिक नेतृत्वाचा विकास होणार आहे.

शासनाने अनुकंपा तत्वावरील सेवाप्रवेशाचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला. त्यात पंधरा हजार युवकांना अनुकंपातून नियुक्ती देण्यात येणार आहे. सुमारे ३५ मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शेतीला १२ तास दिवसा वीज मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा दहा तास मोफत वीज देण्याचेही नियोजन आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांसाठी आवश्यक सुविधांच्या अनुषंगाने निधीची कमतरता पडू देणार नाही. पावसाने जिल्ह्यात शेती, घरे, पशुधन यांचे नुकसान झाले. त्याची भरपाईही लवकरात लवकर अदा केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कोलाम समाज, पारधी समाज यांच्या विकासासाठी विशेष पॅकेज आदिवासी विकास विभागातर्फे ☞(पान २ वर)

# भरधाव ट्रक खुल्या प्लॉटमध्ये शिरला

## -चालकासह तिघे जखमी



**नांदगाव पेठ / प्रतिनिधीः-** अमरावती वरून नागपूरकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकचे संतुलन बिघडल्याने ट्रक थेट बॅरिकेट्स तोडून रस्त्यालगतच्या खुल्या प्लॉटमध्ये शिरला. या अपघातात ट्रक चालकासह तिघे गंभीर जखमी झाले शनिवारी सकाळी ८ वाजताच्या दरम्यान नांदगाव पेठ बस स्थानकाजवळ ही घटना घडली. घटनेतील तिनही जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक (क्र. सीजी ०४ एलआर २६७८) हा लोखंडी सळई घेऊन नागपूरकडे जात होता. सकाळी आठ वाजताच्या सुमारास नांदगाव पेठ बसस्थानकाजवळ ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक बॅरिकेट्स तोडून थेट रस्त्यालगतच्या खुल्या जागेत शिरला आणि प्लॉटमधील एका ☞(पान २ वर)

# चेन स्नॅचिंगमधील सराईत गुन्हेगार गजाआड

## -अवघ्या १२ तासांत दोन प्रकरणे उघडकीस

### -७८,५०० चा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** महिलांना लक्ष्य करून भरदिवसा चैन स्नॅचिंग करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी अवघ्या १२ तासांत गजाआड केले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या या धडक कारवाईत आरोपीकडून मोटारसायकल, हेल्मेट आणि सोन्याचे मणी असा एकूण ७८,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जितेंद्र माणिकराव जावरे (वय ५५, रा. छांगानी नगर, अमरावती) असे या अटकेतील आरोपीचे नाव आहे.

११ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता चांदूर रेल्वे येथील लिनाबाई पाचकवरे (वय ६५) या मुलगी स्नेहलसह जात असताना आरोपीने त्यांच्या गळ्यातील ९० मण्यांच्या पोतीतील ३२ सोन्याचे मणी (किंमत १२,०००) हिसकावून नेले होते. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. तपास सुरू असताना पोलिसांना कळले की याच आरोपीने मोर्शी पोलीस ठाण्याच्या ☞(पान २ वर)

# केळीने भरलेला ट्रक पलटी, ३ जखमी

## -अंजनगाव बस स्थानक चौकातील घटना

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** येथील बस स्थानक चौकात केळीने भरलेला आयशर ट्रक अचानक पलटी झाल्याने परिसरात मोठी धावपळ उडाली होती. या अपघातात एक गंभीर तर दोन किरकोळ जखमी झाले आहे. स्थानिकांच्या मदतीने जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आयशर ट्रक चालक राजुर पाराशर (वय २५) , मोनू अहेरवार (वय २५, दोघे रा. देवरी ,शिवनी, मध्य प्रदेश) व अन्य एक गंभीर आहे.त्याला



उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. माहितीनुसार आयशर ट्रक भरधाव वेगात हिवरखेड येथून केळीचे कॅरेट ☞(पान २ वर)




# अप्पर वर्धा धरण परिसरात पर्यटकांची गर्दी

**मोर्शी/प्रतिनिधीः-** विभागातील सर्वात मोठे आणि जिल्ह्यातील लाईफ लाईन असणाऱ्या अप्पर वर्धा धरणाचे पुन्हा १३ पैकी १३ हि दरवाजे शुक्रवारीं रात्रीपासून ४० सेंटिमीटरने उघडण्यात आले आहे. यामुळे पर्यटकांची गर्दी शनिवार-रविवार सुटी असल्याने वाढली आहे. धरणातून ८४४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. अप्पर वर्धा धरणातील पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असून मध्य प्रदेशातील जाम नदी व सालबर्डी येथून वाहणारी माडू नदी तुडूंब भरून वाहत आहे. त्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. तसेच वर्धा नदी खालील भागातील नदी नाल्यांचा विसर्ग नदीपात्रामध्ये होत असल्याने नदीचे पाण्याची पातळी ☞(पान २ वर)

# 'विष्णू जी की रसोई' पुन्हा अमरावतीकरांच्या सेवेत

## ▪ घरगुती चव, देसी स्टाईल - आता नव्या ठिकाणी!



**अमरावती/प्रतिनिधीः-** देसी खाना देसी स्टाईल हे ब्रीद वाक्य असलेले व संपूर्ण जगभरातील खाद्यप्रेमींना तृप्त करून आता अमरावतीमध्ये सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांचे खाद्य प्रेमींसाठी त्यांची सुप्रसिद्ध असलेली विष्णू जी की रसोई या महाराष्ट्रीयन व पंजाबी भोजनाचा अनोखा संगम असलेली खाद्यशृंखला त्याच चवी सह नविन पत्यावर म्हणजेच गुणवंत लॉन एम.आय.डी.सी. रोड येथे अमरावतीकरांच्या सेवेत पुन्हा सुरू होत आहे.

सुप्रसिद्ध महिला उद्योजिका ओजस्विनी असनारे, मधू संदीप त्रिपाठी तसेच विष्णू मनोहर यांचे वडील बंधू प्रवीण मनोहर यांनी ही खास भोजनाची मेजवानी अमरावतीकर खाद्य प्रेमींसाठी आणली असून येथे लोकांकरिता बसण्याची अत्यंत आकर्षक अशी व्यवस्था केलेली आहे. संपूर्ण वातानुकूलित प्रशस्त हॉल ही याची वैशिष्ट्ये असून शुद्धता व नीटनेटकापणा यांची काळजी घेणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग हा विष्णू मनोहर यांच्या सोबतचाच असून येथील प्रत्येक खाद्यपदार्थ बनवणारा कारागीर हा विष्णू मनोहर यांच्या विशेष मार्गदर्शनात तयार झालेला असतो.

संपूर्ण जगभर त्यांच्या चवीची एकसारखी चव हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. अमर्यादित बुफे थाळ सिस्टीम हे विष्णूजी की रसोईचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. पंजाबी पदार्थ हे ओरिजनल पंजाबी चवीनुसारच बनविले जातात.

तसेच संपूर्ण महाराष्ट्रीयन पदार्थ हे विष्णूजींनी स्वतः डेव्हलप केलेल्या रेसिपीनुसार बनवल्या जातात आणि म्हणून ते पदार्थ शाकाहारी लोकांमध्ये खूप प्रसिद्ध आहेत. चविष्ट जेवणाचा आस्वाद आणि घरच्या जेवणासारखी चव याचा अनोखा मेळ म्हणजे विष्णू जी की रसोई ही खाद्यशृंखला सर्वश्रुत आहे. अमरावतीकरांसाठी ही खास खाद्य मेजवानी सुरू होत असून याचा आस्वाद घेण्याकरता एक वेळ अवश्य भेट द्यावी अशी विनंती विष्णू मनोहर व स्थानिक संचालक यांनी केली आहे.

# आदिवासी महिलेची रस्त्यावरच प्रसुती

## -डॉक्टरांच्या तत्परतेने आईसह बाळाचा वाचला जीव -मेळघाटातील धक्कादायक प्रकार



**धारणी/प्रतिनिधीः-** धारणी-बैरागड मार्गावर एक धक्कादायक घटना समोर आली आहे. रस्त्यावरील खोल खड्ड्यामुळे रुग्णालयात पोहोचण्या आधीच एका गरोदर महिलेला प्रसवेदना सुरू झाल्या आणि रस्त्यावरच तिने बाळाला जन्म दिला. ही घटना आज शनिवारी १३ सप्टेंबरला सकाळी उघडकीस आली आहे. डॉक्टरांच्या तत्परतेमुळे आई आणि बाळ दोघेही सुरक्षित आहे. मेळघाटातील दयनीय अवस्थेचे आणखी एक उदाहण यामुळे पुन्हा समोर आले.

माहितीनुसार, मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील कोट्यातरमल गावातील बिंदा अरुण साठे (वय २८) ही महिलस शुक्रवारी पती अरुण साठे सोबत सोनोग्राफीसाठी धारणी उपजिल्हा रुग्णालयात आली होती. सोनोग्राफी करताना त्यांना रात्र झाली. रात्री उशिर झाल्यामुळे त्यांनी उकूपाठी गावात नातेवाईकांकडे मुक्काम केला. शनिवारी पहाटे पाच वाजता बिंदा साठेला प्रसववेदना सुरू झाल्या. पती अरुण हे बिंदाला मोटरसायकलवर घेऊन धारणी उपजिल्हा रुग्णालयाकडे निघाले. मात्र शहरापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावरच त्यांची रस्त्यात प्रसूती झाली. तेथून जाणाऱ्या नागरिकांनी याची माहिती रुग्णालयातील डॉ. दयाराम जावरकर यांना दिली. त्यांनी उपजिल्हा रुग्णालयाची ॲम्बुलन्स व १०८ ची सेवा घटनास्थळी पाठवली. १०८ रूग्णवाहिकेत सेवेवरील डॉक्टर कविता मेंदूरकर घटनास्थळी दाखल झाल्या, पण तोपर्यंत बिंदाची प्रसूती झाली होती. त्यांनी नाळ कापून माता व बालकाला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचारादरम्यान दोघांची प्रकृती स्थिर ☞(पान २ वर)




# घराचे कुलुप तोडून चोरट्यांनी केला हात साफ

## -७३ हजारांची रोकड व ऐवज लंपास



**अंजनगाव सुजी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी शहरातील उस्मानपुरा येथे घराला कुलुप असल्याचे पाहुन चोरट्यांनी हात साफ करत ७३हजार ५०० चा ऐवज चोरी केला.

स्थानिक उस्मानपुरा येथील टेलर काम करीत असलेले अब्दुल खालीक अब्दुल जलील (वय ४६) हे दि.११ रोजी परतवाडा येथे नातेवाकाईकांकडे मुक्कामी गेले होते. दुसरे दिवशी (दि. १२) परत आले असता घराचे दरवाजाचे लॉक तुटलेले आढळले, घरात प्रवेश केला असता घरातील हॉलमधील पेट्या मधील सामान इतरत्र विखुरलेले दिसले. आलमारीमधील लॉकर मध्ये ठेवलेले नगदी रुपये १५०००, ८ व ६ ग्रॅमची सोन्याचे पोत कीमत ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वे तालुक्यात मुसळधार पाऊस

## -पळसखेडकडे जाणारा मार्ग बंद

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तालुक्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. या मुसळधार पावसाने शहरातील अनेक रस्ते जलमय झाले. सदर पावसामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली असून अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे यंदा शेतीपिकांच्या नुकसानीची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या शेवटच्या आशेवर पावसाने पाणी फेरल्याचे चित्र दिसत आहे. शहरातून बायपासकडे व पळसखेडकडे




जाणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावर नाल्याचे पाणी रस्त्यावर ओसंडून वाहू लागले. परिणामी हा मार्ग काही ☞(पान २ वर)




# जावरा फत्तेपुर गावात बिबट्याचा धुमाकूळ | गोठ्यातील वासराची केली शिकार

### -बिबट्याचे ठसे आढळले



**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील जंगल क्षेत्रालगत असलेल्या जावरा फत्तेपुर या गावात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. काल रात्री एका गोठ्यात शिरून बिबट्याने वासराची शिकार केली आहे.आज १३ सप्टेंबर रोजी ही घटना उघडकीस आली असून घटनास्थळी बिबट्याचे ठसे देखील आढळून आले आहे.जावरा फत्तेपुर या गावातील प्रशांत दिगंबर राऊत यांच्या स्वमालकीची काही जनावरे गाय, वासरू आदी गोठ्यात खुंट्याला नेहमीप्रमाणे बांधून ठेवण्यात आले होते.भुकेने व्याकुळ असलेला एक बिबट्या काल शुक्रवारी गावाच्या दिशेने आला व त्याने प्रशांत राऊत यांच्या गोठ्यात बांधून असलेल्या वासराला लक्ष्य करीत त्यावर ताव मारला.आज सकाळी प्रशांत राऊत हे ☞(पान २ वर)

# केटरिंग व्यवसायातील स्पर्धेमुळे दोघा भावांना मारहाण



**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार तालुक्यातील शिरसगाव बंड येथे केटरिंग व्यवसायातील स्पर्धेमुळे दोन भावांना दुकानात येऊन साखळी व लोखंडी सराट्याने मारहाण करण्यात आली. या मारहाणीत दोघे जण जखमी झाले असून, चांदूरबाजार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, शिरसगाव बंड येथील अनुप रामेश्वर देशमुख व त्याचा भाऊ वैभव हे दोघे आपल्या केटरिंग व्यवसायाच्या दुकानात बसले होते. आरोपी निलेश बबनराव चौधरी व त्याचा भाऊ रवी बबनराव चौधरी (दोघेही राहणार शिरसगाव बंड) यांनी दिनांक ६ सप्टेंबर रोजी काहीही कारण नसताना दुकानात येऊन, तिथेच असलेल्या पाळण्याची साखळी व लोखंडी सरडा वापरून दोन्ही भावांवर हल्ला चढवला.

यामध्ये अनुप व वैभव दोघेही गंभीर जखमी झाले. मारहाणीचे कारण केटरिंग व्यवसायातील स्पर्धा असल्याचे समजते. फिर्यादी अनुप देशमुख यांचा व्यवसाय चांगला चालत असल्याने आरोपींना हे खटकत होते, असे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी जखमीच्या वैद्यकीय अहवालावरून दिनांक ९ सप्टेंबर रोजी चांदूरबाजार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एएसआय अनुप सानप आणि सुनील खेडरे करीत आहेत.

## हास्यतरंग

**मन्या :** मला एकदा अलादिनचा दिवा सापडला होता.
**बायको :** खरं की काय? मग काय मागितलं तुम्ही जिनीकडं?
**मन्या :** माझ्या बायकोची बुद्धी दसपट वाढव म्हणालो.
**बायको :** हो का? मग काय म्हणाला तो? **मन्या :** माझ्याकडे पाहून खदाखदा हसला आणि म्हणाला, 'आका! क्यूँ मजाक करते हो। शून्याला दहाने गुणलं काय किंवा शंभरनं गुणलं ते शून्यच रहाणार.'

**मन्या :** डॉक्टर, कालपासून पोटात खूप दुखतय.
**डॉक्टर :** तू जेवण कुठे करतोस?
मन्या : साहेब, रोज हॉटेलात जेवतो.
**डॉक्टर :** अरे बाबा, रोज हॉटेलमध्ये नको खात जाऊ.
**मन्या :** ठीक आहे डॉक्टर साहेब, आतापासून पार्सल करून घरी आणून खाईन.


# सारांश

जनमाध्यम — एक प्रतिष्ठित सदर

❒ रविवार, १४ सप्टेंबर२०२५ ❒ E-paper - www.janmadhyam.com


# जातीपातीच्या लढ्यात मराठवाडा भरकटतोय!

**जातीपातीचे राजकारण हे महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील जुने सत्य आहे. गेल्या अनेक दशकांपासून राजकीय पक्षांनी स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि मतपेट्या भरण्यासाठी याच मुद्द्याचा वापर केला आहे. समाजात फूट पाडून आपली पोळी भाजणे हा सोपा मार्ग ठरला आहे. आजही तोच प्रयोग पुन्हा होताना दिसतोय..**

जातीपातीचे राजकारण गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. याच मुद्द्यावर अनेक राजकीय पक्षांनी स्वतःची पोळी भाजून घेतली आहे. समाजात तेढ निर्माण करण्यासाठी जातीपातीचे राजकारण केले की, ते नेहमीच यशस्वी होते, असा आजवरचा इतिहास आहे. नेमक्या त्याच उद्देशाने मराठवाड्यात मराठा विरुद्ध ओबीसी असे राजकारण पेटविण्यात आले. हे राजकारण कोणी पेटविले हा भाग चर्चेचा असला तरी यामुळे मात्र मराठवाड्यात जातीपातीत तेढ निर्माण झाली आहे. सध्या मनोज जरांगे यांना दिलेल्या आश्वासनानंतर मराठवाड्यात ओबीसी समाजही शासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करीत आहे. यामुळे ग्रामीण भागात मात्र मराठा विरुद्ध ओबीसी असे चित्र तयार झाले आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मागील १५ ते २० दिवसांत महाराष्ट्रात भरपूर आंदोलने झाली. मराठा विरुद्ध ओबीसी असे चित्र मराठवाड्यात निर्माण झाले आहे. प्रत्यक्षात शैक्षणिक जागृती झाल्याने अभियांत्रिकी तसेच वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रत्येकजण पुढाकार घेत आहे. या शिक्षणासाठी म्हणावे तसे आरक्षण भेटत नसल्याने ओबीसी, मराठा तसेच खुल्या प्रवर्गातील अनेकजण त्रस्त असतात. आरक्षण नसल्यामुळे अनेकांना नोकरी देखील मिळत नाही. पुरेशा संधी उपलब्ध नसल्याची ओरड होती. नोकरीसाठी व शिक्षणासाठी आरक्षणाची गरज दाखविली जात आहे.

मनोज जरांगे यांचे मुंबईतील आंदोलन यशस्वी झाल्यानंतर मराठवाड्यात मराठा समाजातर्फे जल्लोष करण्यात आला. तसेच आरक्षण मिळाले व काहींनी आरक्षण मिळूनही काही फायदा होणार नाही, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यामुळे शासनाने काढलेला जी. आर. खरोखर फायद्याचा आहे की नाही याबद्दल मराठवाड्यातील मराठा समाजही संभ्रमात आहे. दुसरीकडे मराठवाड्यातील धाराशिव, नांदेड, बीड व परभणी जिल्ह्यात ओबीसी समाजाच्यावतीने भरगच्च मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यातून शासनाने काढलेल्या जी.आर.चा निषेध करण्यात आला. तसेच मराठा समाजाला शासनातर्फे दिलेले आश्वासन पाळले जाऊ नये, अशी मागणी या मेळाव्यांमधून होत आहे. तसेच याबाबत ओबीसी समाजातर्फे न्यायालयात दाद मागण्यात येईल या दृष्टीने मराठवाड्यातून अनेक जिल्ह्यातील नेत्यांनी तयारी दर्शविली आहे. एकीकडे जल्लोष व दुसरीकडे नाराजी असे चित्र मराठवाड्यात निर्माण झाले आहे. यामुळे राजकीय वातावरण देखील तापले आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी समाजाने भाजपला मतदान करू नये, असे आवाहन मेळाव्यामधून केले आहे. तर मराठा समाज मात्र भाजपच्या पाठीशी उभा राहील, असे एकंदरीत चित्र दिसत आहे. ओबीसीमधील शंभरपेक्षा अधिक जातींनी नांदेडमध्ये वज्रामुठ आवळली. नांदेडमध्ये ओबीसी हक्क मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात ओबीसी समाजाने आपली एकजूट दाखविली. शासनाच्या अन्यायाविरुद्ध संघर्षाची भूमिका व्यक्त करत प्रत्येक तालुक्यातून ५० हजार



नागरिकांच्या मदतीने मोर्चा काढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात ओबीसी नेत्यांनी एकात्मतेचा संदेश देत आरक्षण हक्काच्या बचावासाठी संघर्ष करण्याचे आवाहन केले आहे. सर्व समाज घटकांनी संघटितपणे पुढाकार घेऊन शासनाच्या अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचे आवाहन ओबीसी, भटके विमुक्त व बलुतेदार यांच्यावतीने करण्यात आले आहे. दुसरीकडे मराठवाड्यात कुणबी समाज मोठ्या प्रमाणात आहे. सध्या कौटुंबिक परिस्थिती बदललेली आहे. मराठा समाजातील तिसऱ्या व चौथ्या पिढीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मराठा समाजाचे अर्थकारण समजून घेऊन मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण कसे आवश्यक आहे हे देखील मराठा समाजाकडून सांगितले जात आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यातील नेत्यांविरुद्ध प्रसार माध्यमाद्वारे मराठा समाजातून प्रचंड टीका होत आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण तसेच विलासराव देशमुख या दोन्ही नेत्यांवर मराठा समाजातील अनेकांनी टीका केलेली आहे. याबरोबरच शरद पवार यांच्यावरही मोठ्या प्रमाणात टीकेचा भडीमार होत आहे. तर दुसरीकडे ओबीसी समाजाने राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून मोठी अपेक्षा व्यक्त केली आहे.

न्यायालयात जाऊन शासनाने दिलेला जी. आर. रद्द करण्याबाबत पुढाकार घ्यावा व त्यास संपूर्ण ओबीसी समाज पाठिंबा देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ज्या हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण दिले जात आहे, त्याच धर्तीवर हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. मराठवाड्यातील खुल्या प्रवर्गातील नागरिकांना वगळता सर्वच जाती-धर्माच्या नागरिकांनी आरक्षणाची मागणी केली आहे. आम्हाला देखील आरक्षण मिळावे, असे प्रत्येकाला वाटू लागले आहे. त्यामुळे मराठवाड्यात ग्रामीण भागात विशेषतः मराठा विरुद्ध ओबीसी असे वातावरण तयार झाले आहे. पूर्वी एकोप्याने राहणारे हे दोन्ही समाज आता आरक्षणामुळे विभागले गेले आहेत. ही एक खूप मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

# नव्या दोस्तीची अमेरिकेला धास्ती

**प्रा. जयसिंग यादव**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ नीतीमुळे चीन, भारत, रशिया अमेरिकेची व्यूहनीती झुगारून एकत्र आले. अमेरिकन तज्ज्ञांकडून तसेच परराष्ट्र व्यवहारातील जाणकारांकडून त्याबाबत ट्रम्प यांना इशारे दिले जात होते. शांघाय सहकार्य परिषदेनंतर त्याची जाणीव व्हायला लागल्यामुळे ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. हे तीन देश एकत्र येण्याची अमेरिकेला धास्ती का आहे, याचा हा लेखाजोखा.

चीनने गेल्या आठवड्यात आपल्या शक्तीचं प्रदर्शन केले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीला ८० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित लष्करी परेडमध्ये हे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. हजारो किलोमीटर अंतरावर वॉशिंग्टन डीसीमध्ये उपस्थित असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पदेखील यावर लक्ष ठेवून होते. ते म्हणाले, की मी ते पाहावे अशी त्यांची इच्छा होती आणि मी ते खरोखर पाहत होतो. तियानमेन चौकात झालेल्या या भव्य समारंभाबद्दल अमेरिकन अध्यक्षांनी तपशीलवार काहीही सांगितले नाही; परंतु त्यांनी 'खूप, खूप प्रभावी' असे वर्णन केले. दुसरीकडे, ट्रम्प आणि उर्वरित जगासाठी चीनचा संदेश अगदी स्पष्ट होता. तो संदेश असा होता की, जगात एक नवीन शक्ती केंद्र तयार होत आहे. ते शंभर वर्षे जुन्या अमेरिकन वर्चस्व व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी सज्ज आहे. ही लष्करी परेड आयोजित केली जात होती, त्या दिवशी ट्रम्प ओव्हल ऑफिसमध्ये पोलंडच्या राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरात्स्की यांना भेटत होते. त्या वेळी ते चीनच्या या लष्करी परेडबद्दल जास्त काही बोलले नाही. चीनसोबतच्या 'टॅरिफ वॉर' दरम्यान घडलेल्या घटनांबद्दल ट्रम्प यांच्या विधानांमध्ये उदासीनता, तक्रार आणि चिंता यांचे मिश्रण स्पष्टपणे दिसून येत होते. परेडबद्दल ट्रम्प निष्काळजी दिसले. त्यांनी सांगितले, की दोन डझनहून अधिक राष्ट्रप्रमुखांसमोर चीन करत असलेल्या शक्तिप्रदर्शनाची चिंता नाही. तथापि, चीन दुसऱ्या महायुद्धातील योगदानाचे श्रेय अमेरिकेला देत नाही, याबद्दल त्यांनी तक्रार केली. तुम्ही अमेरिकेविरुद्ध कट रचत असताना कृपया पुतीन आणि किम जोंग उन यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा कळवा, असे ते उपहासाने म्हणाले. एकंदरीत, इतर राष्ट्रांचे एकत्र येणे ट्रम्प यांना अस्वस्थ करत आहे.

ट्रम्प यांना परेड आणि लष्करी शक्तीच्या प्रात्यक्षिकांबद्दल विशेष प्रेम आहे. गेल्या महिन्यात त्यांनी अलास्कामध्ये पुतीन यांचे लाल कार्पेटवर स्वागत केले. त्यांच्या डोक्यावरून स्टेल्थ बॉम्बर आणि अमेरिकन जेट उडत होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी अमेरिकन सैन्याच्या २५०व्या वर्धापन दिनानिमित्त वॉशिंग्टनमध्ये लष्करी परेडचे आयोजन केले होते. चीनची नवीनतम लष्करी परेड उच्च तंत्रज्ञानाची शस्त्रे आणि शिस्तबद्ध मार्चिंगसाठी ओळखली गेली. त्या तुलनेत अमेरिकेच्या लष्करी इतिहासाची आठवण करून देणारी अमेरिकन परेड ही एक सामान्य घटना होती. तिथे दुसऱ्या महायुद्धात वापरले जाणारे टँक आणि क्रांतिकारी काळातील सैनिक व्हाईट हाऊसजवळील कॉन्स्टिट्यूशन अव्हेन्यूवर आरामात फिरताना दिसले. ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या घोषणेवर आधारित ही एक प्रकारची आठवणींना उजाळा देणारी घटना होती. अमेरिकेच्या गौरवशाली इतिहासाकडे मागे वळून पाहताना आणि या कार्यक्रमाद्वारे ट्रम्प १९व्या शतकातील त्या काळाची आठवण करताना दिसले. त्याला ते 'अमेरिकन इतिहासातील सर्वात महान युग' म्हणतात. चीनच्या लष्करी परेडमध्ये त्याची भविष्यातील शस्त्रे प्रदर्शित करण्यात आली आणि तेथील कम्युनिस्ट सरकारने हेदेखील दाखवण्याचा प्रयत्न केला की दुसऱ्या महायुद्धात फॅसिझम आणि साम्राज्यवादाला पराभूत करण्यात चीनने मोठी भूमिका बजावली. त्या युद्धाने तथाकथित 'अमेरिकन शतका'ची सुरुवात केली असेल, तर चीन आता नवी जागतिक व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी होईल, असा त्यांचा दावा आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात त्यांचे सहाय्यक असलेले रिचर्ड विल्की म्हणाले की दुसऱ्या महायुद्धात जपानच्या पराभवात चिनी राष्ट्रवादी आणि अमेरिकन सैन्याचे योगदान चिनी कम्युनिस्ट सैन्याच्या योगदानापेक्षा जास्त होते. तथापि, या आठवड्यात चीनची लष्करी परेड हे अमेरिकेला चिंता करण्याचे एकमेव कारण नव्हते. याशिवाय अमेरिकन धोरणकर्त्यांना चिंता वाटावी, अशी आणखी बरीच कारणे होती. तियानजिनमधील शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दरम्यान, चीन आणि भारतातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे एक मोठे कारण म्हणजे ट्रम्प यांनी भारतावर लादलेले शुल्क. त्याचा भारत आणि



मैत्रीवर विपरीत परिणाम झाला आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे जगाचे आर्थिक आणि राजकीय ध्रुवीकरण बिघडले आहे. प्रतिस्पर्धी मानले जाणारे चीन, रशिया आणि भारत हे देश बदललेल्या परिस्थितीत एकत्र कसे येऊ शकतात याचे एक उत्तम उदाहरण आहे.

ट्रम्प यांनी अमेरिकन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी आणि सरकारसाठी नवीन महसूल उभारण्यासाठीच्या योजनेचा एक भाग म्हणून शुल्कांचे समर्थन केले आहे. ट्रम्प समर्थित 'अमेरिका फर्स्ट फॉरेन पॉलिसी इन्स्टिट्यूट'मधील अमेरिकन सिक्युरिटीचे सह-अध्यक्ष रिचर्ड विल्की म्हणतात, कोरियन, जपानी, फिलिपिन्स आणि व्हिएतनामी लोकांना हे चांगलेच ठाऊक आहे की खरा धोका त्यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापार भागीदारीतील किरकोळ अडथळे नसून चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा आहे. ट्रम्प अनेकदा इतर देशांमधील संघर्ष आणि चिंतांबद्दल उदासीन राहिले आहेत. त्याबाबत मदत करत नाही. त्याऐवजी ते ग्रीनलँड, पनामा आणि कॅनडासारख्या भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ असलेल्या देशांमधील समस्यांबद्दल

उत्सुकता दाखवत आहेत.

अमेरिकेतील

विजय दिनाच्या

परेडमध्ये चीनने जगाला आपले लष्करी सामर्थ्य दाखवले. त्यातून लक्षात आले की, ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांमुळे अमेरिकेचा विजय होण्याऐवजी अपयश येण्याचा धोका आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या अमेरिका केंद्रित व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून लादलेले शुल्क अमेरिकन न्यायालये रद्द करू शकतात. नव्हे, तशी चिन्हे वाढत आहेत. गेल्या आठवड्यात एका अपील न्यायालयाने निर्णय दिला, की ट्रम्प यांचे बरेच शुल्क संघीय कायद्याच्या चुकीचा अर्थ लावण्यावर आधारित होते; पण ट्रम्प यांनी या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयात ट्रम्प यांचे समर्थक मानले जाणारे रूढीवादी न्यायाधीशांचे वर्चस्व असले, तरी काँग्रेसच्या परवानगीशिवाय प्रमुख धोरणे अमलात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रपतींविरुद्ध त्यांनी खूप कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या शुल्कांवर ते सौम्य भूमिका घेतील, अशी शक्यता कमी आहे. व्यापाराच्या बाबतीत ट्रम्प नेहमीच त्यांच्या मनाचे ऐकत आले आहेत. त्यांनी अनेक पारंपरिक धोरणे बदलली असून नवीन व्यापारी भागीदार बनवले आहे. ट्रम्प यांनी दावा केला आहे, की त्यांचे व्यापार धोरण अमेरिकेला 'दुसऱ्या सुवर्णयुगाकडे' घेऊन जाईल; पण तियानमेन चौकातील चिनी लष्करी

परेड

असो किंवा अमेरिकन न्यायालये; ट्रम्प यांच्या शुल्कामुळे निर्माण झालेला धोका काल्पनिक नाही, तर वास्तविक आहे. भारताच्या वृत्तीबद्दल ट्रम्प यांची चिडचिड वाढत असल्याचे दिसून आले. एकीकडे भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकला नाही, तर दुसरीकडे अमेरिका आपल्या देशातच अनेक समस्यांनी वेढली गेली आहे. असे असूनही, ट्रम्प यांची हेकेखोरी कायम होती; परंतु आता त्यांना वास्तवाची जाणीव झाली असावी.

त्यामुळे अगोदर त्यांनी चीनमुळे भारत, रशियासारखे मित्र आम्ही गमावले, असे म्हटले होते. त्यानंतर दोनच दिवसांमध्ये त्यांनी भारताचे आणि मोदी यांचे कौतुक केले. भारत आणि अमेरिका यांच्यात एक विशेष संबंध आहे.

इतकेच नाही, तर त्यांनी आपण नेहमीच मोदी यांचे मित्र राहू असे म्हटले. ते एक महान पंतप्रधान आहेत, अशीही पुस्ती जोडली. ट्रम्प यांचे बदललेले सूर पाहता भारताच्या दबावाच्या परराष्ट्रनीतीचा परिणाम झालेला दिसतो.

# 'केवायसी'ची डोकेदुखी

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुविधा देत अडचणी दूर करणे सरकारचे प्राथमिक काम आहे. मात्र, भारतात उलटे चित्र पाहावयास मिळत आहे. त्यांना वेगवेगळ्या कामात किरकोळ गोष्टींसाठी हैराण केले जात आहे. 'केवायसी' सध्या सर्वात कळीचा मुद्दा बनला असून तो सुविधाजनक ठरण्याऐवजी कटकटीचा ठरत आहे.

गॅस कनेक्शन असो, खाते सुरू ठेवायचे असो किंवा बँकिंग अप सुरू ठेवण्याचा विषय असो, वेळोवेळी केवायसीची मागणी केली जाते. काहीवेळा केवायसीच्या नावाखाली फसवणूकदेखील होते. हा छळ सर्वसामान्यांचे जीणे मुश्किल करत आहे. आजच्या काळात सर्वात मोठी अडचण म्हणजे बँक खात्याचे केवायसी करणे. केवायसीच्या नावावर खातेधारकांना त्रास दिला जात आहे. केवायसी करण्याची सूचना न देताच सेवा बंद केली जाते. बँकेकडून कोणत्याही प्रकारचा मेसेज किंवा कॉल येत नाही. बँकेकडून मेल येणे अपेक्षित असताना तसा कोणताही प्रकार घडत नाही. अर्थात, प्रत्येक व्यवहाराचा मेसेज येतो. मात्र केवायसीच्या वेळी वेगळाच अनुभव येतो.

धनादेश वटविण्याचा मुद्दा येतो तेव्हा केवायसीच्या नावाखाली त्याचे पेमेंट रोखले जाते. पण पेमेंटला विलंब झाल्याने किंवा तो न वटल्याने ४०० ते ८०० रुपयांचा दंड आकारला जातो. एका व्यक्तीने मागच्या वर्षी एका विमा कंपनीला मेडिक्लेम पॉलिसीसाठी धनादेश दिला. बँकेत धनादेश जमा केला, पण तो पुढे सरकला नाही. त्यामुळे पेमेंट होऊ शकले नाही. यासंदर्भात चौकशी केली असता खाते सुरू असल्याचे व्यवस्थापकाने सांगितले. पण कर्मचाऱ्याचे उत्तर अगदी उलट होते. केवायसी नसल्याने खाते बंद करण्यात आल्याचे त्याने सांगितले. याबाबत ग्राहकाने संबंधित व्यवस्थापकास जाब विचारला असता, त्याने हात झटकले. सर्वकाही संगणकीय प्रणालीने होत असल्याने खात्याविषयीच्या कारवाईचे कळत नाही आणि कर्मचाऱ्यांनाही त्याची माहिती नसते, असे सांगून ते मोकळे झाले. परंतु संबंधिताकडून धनादेश रोखल्याने सहाशे रुपये जादा वसूल केले. अकारण त्यांना भुर्दंड बसला.

आता लॉकर वापरण्यासाठी एक जण गेला असता बँक कर्मचाऱ्याने केवायसी करण्यास सांगितले. संबंधित व्यक्तीचे बँकेत खाते होते आणि त्याच खात्याला लॉकरही जोडलेले होते. परंतु कर्मचारी ऐकावयास तयार नव्हते. तुमच्याकडे चार पाच बँकेचे खाते असतील तर दर दोन वर्षांनी केवायसी करण्यासाठी बँकेत जावे लागेल. आतापर्यंत खाते सुरू ठेवण्यासाठी केवायसी करावी लागत होते. आता तर वीज विभागाकडून देखील कनेक्शनचे केवायसी करण्याची मागणी केली जात आहे. आजघडीला चहुबाजूंनी फसवणूक केली जात असताना आणि हॅकर तुमच्या खात्यावर डल्ला मारण्याच्या तयारीत असताना कोणता मेसेज खरा मानायचा, कोणता नाही, हे कळत नाही.

आता परिवहन विभागाकडून देखील आधार ऑथरायजेशनच्या माध्यमातून वाहन परवान्याला मोबाइल नंबर जोडून घेण्यास सांगितले जात आहे. एकंदरीतच सर्वसामान्य लोकांनी काय काय करावे, हे कळत नाही. या गोष्टी सर्वांनाच जमतील असे नाही. याचा अर्थ दररोज सेवा केंद्रावर रांगेत उभे राहा.

# तो एक गुंड आहे...

## सलमान खानबद्दल अभिनव कश्यपचे धक्कादायक दावे


२०१० मध्ये आलेल्या सुपरहिट 'दबंग' चित्रपटाचे दिग्दर्शक अभिनव कश्यप यांनी अभिनेता सलमान खानसोबतच्या अनुभवा बद्दल एका मुलाखतीत स्पष्ट आणि परखड वक्तव्य केले आहे.

माध्यमांशी संवाद साधताना, कश्यप यांनी सलमानवर कामाविषयी गंभीर आरोप केले. त्यांनी सांगितले की सलमान खानच्या अभिनयात कधीच उत्साह नव्हता आणि तो आपल्या अभिनयाबाबत फारसा गंभीरही नव्हता. कश्यप म्हणाले, 'सलमान कधीही कामात पूर्णपणे सहभागी होत नाही.

त्याला अभिनयात आजिबात रस नाही, तो शूटिंगला येतो, हे तो स्वतःवर उपकार करतो . त्याचं लक्ष सेलिब्रिटी इमेजवर जास्त असतं, अभिनयावर नाही.'

अभिनव यांनी सलमानला 'असभ्य' आणि 'गुंड' असंही संबोधलं. त्यांनी आरोप केला की खान कुटुंब बॉलीवूडमध्ये वर्चस्व ठेवतं आणि त्यांच्या विरुद्ध कोणी गेलं, तर ते सूड घेतात. 'सलमान एक फिल्मी घराण्यातून येतो आणि ते लोक सगळ्यावर नियंत्रण ठेवतात. जर कोणी त्यांच्या विरोधात गेला, तर ते त्याच्याविरुद्ध कारवाई करतात,' असं त्यांनी ठामपणे सांगितलं.

**अनुराग कश्यपलाही आले होते असेच अनुभव**



अभिनव यांनी सांगितले की त्याचा भाऊ, चित्रपट दिग्दर्शक अनुराग कश्यप यालाही याच प्रकारचा अनुभव 'तेरे नाम'च्या वेळी आला होता. 'दबंगपूर्वीच अनुरागने मला सांगितलं होतं की तू सलमानसोबत चित्रपट करू शकणार नाहीस. पण त्यावेळी त्याने मला सविस्तर काही सांगितलं नाही. त्याला माहिती होतं की मला त्रास दिला जाईल, कारण तो या गिधाडांना ओळखतो,' असं अभिनव म्हणाले.

त्यांनी हेही उघड केलं की 'तेरे नाम'ची पटकथा अनुरागने लिहिली होती, पण नंतर त्याला प्रोजेक्टमधून बाजूला केलं गेलं आणि त्याला योग्य श्रेयही दिलं नाही. 'बोनी कपूरने त्याच्याशी गैरवर्तन केलं आणि नंतर त्याला चित्रपटातून काढून टाकलं,' असं त्यांनी नमूद केलं.

**अनुराग कश्यपचा खुलासा २०२३ मध्ये**

२०२३ मध्ये अनुराग कश्यपने 'अनफिल्टर्ड बाय समदीश' या शोमध्ये हे स्पष्ट केलं होतं की त्याला एका मोठ्या अभिनेत्याला दिलेल्या सल्ल्यामुळे प्रोजेक्टमधून काढून टाकण्यात आलं.

त्याने सांगितलं, 'मी नायकाला त्याच्या छातीवर वॅक्स लावू नका, असं सांगितलं, आणि त्यामुळं मला त्या चित्रपटातून हटवण्यात आलं.' असं ते म्हणाले .

# ऐश्वर्या रायचे आक्षेपार्ह फोटो



अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन यांनी मंगळवारी दिल्ली उच्च न्यायाल याला तिच्या व्यक्तिमत्त्वा च्या अधिकारांचे रक्षण करण्याची आणि ऑनलाइन मंचांना तिचे नाव, छायाचित्रे आणि एआय-व्युत्पन्न अश्लील सामग्रीचा बेकायदेशीर वापर करण्यापासून रोखण्याची विनंती केली होती.

दिल्ली उच्च न्यायालयाने ऐश्वर्या राय बच्चन यांची विनंती मान्य केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी करताना न्या. तेजस कारिया यांनी ई-कॉमर्स वेबसाइट्स आणि गुगल एलएलसीसह प्रतिवादी प्लॅटफॉर्मना याचिकेत ओळखल्या गेलेल्या युआरएल काढून टाकण्याचे आणि ब्लॉक करण्याचे निर्देश दिले आहेत.

गुगलने नोटीस मिळाल्यापासून ७२ तासांच्या आत याचिकेत ओळखल्या गेलेल्या युआरएल काढून टाकाव्यात, डिसेबल आणि ब्लॉक कराव्यात.

खरं तर, न्या. कारिया यांनी तोंडी संकेत दिले होते की ते प्रतिवादींना इशारा देणारा अंतरिम आदेश पारित करतील.

हा खटला अभिनेत्रीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा गैरवापर करण्याशी संबंधित आहे, ज्यामध्ये तिचे नाव, छायाचित्र, व्यक्तिमत्व आणि आवाज यांचा समावेश आहे आणि प्रतिवादी तिच्या (राय) संमतीशिवाय त्यांच्या व्यावसायिक फायद्यासाठी त्यांचा वापर करत आहेत.

राय यांच्या वतीने बाजू मांडणारे वरिष्ठ वकील संदीप सेठी म्हणाले की, अभिनेत्री तिच्या प्रसिद्धी आणि वैयक्तिक अधिकारांचा वापर करू इच्छिते. इंटरनेटवर काही पूर्णपणे अवास्तव छायाचित्रे प्रसारित केली जात होती.

त्याविरुद्ध न्यायालयाची मदत घ्यावी लागली.

# अभिनेत्री 'करिश्मा शर्मा'ने धावत्या ट्रेनमधून मारली उडी



बॉलिवूड अभिनेत्री करिश्मा शर्मा मुंबईत रेल्वे अपघाताची बळी ठरली आहे. बुधवारी झालेल्या या घटनेनंतर तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. अभिनेत्रीने तिच्या सोशल मीडियावर ही माहिती शेअर केली.

करिश्माने तिच्या इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आणि सांगितले की, ती चर्चगेटमध्ये शूटिंगसाठी जात होती, तेव्हा ट्रेनचा वेग वाढला तेव्हा तिला भीतीमुळे ट्रेनमधून उडी मारावी लागली. या अपघातात तिच्या डोक्याला आणि पाठीला दुखापत झाली.

तिच्या डोक्याला आणि पाठीला सूज आल्याचे तिने उघड केले. तिच्या शरीरावर जखमाही आहेत. दुखापत गंभीर नाही याची खात्री करण्यासाठी डॉक्टरांनी तिला एमआरआय करून एक दिवस निरीक्षणाखाली ठेवण्याचा सल्ला दिला आहे.

करिश्माने तिच्या चाहत्यांना तिच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करण्याची विनंती केली. तिने लिहिले, 'कालपासून मला वेदना होत आहेत पण मी खंबीर राहिले आहे. कृपया मला तुमच्या प्रार्थना पाठवा, हे माझ्यासाठी खूप अर्थपूर्ण आहे.' असं तिने म्हंटलं आहे.करिश्माची मैत्रीण तियाशा पॉलने तिचे हॉस्पिटलमधील फोटो आणि व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर केले. तिने लिहिले की अपघाताच्या वेळी ती तिच्यासोबत होती आणि तिला करिश्मा जमिनीवर पडलेली आढळली. व्हिडिओमध्ये करिश्माला आयव्ही ड्रिप लावलेले दिसत आहे.

अभिनेत्री करिश्मा शर्माने चित्रपट आणि वेब सीरिज या दोन्हीमध्ये आपली छाप पाडली आहे. ती 'प्यार का पंचनामा २', 'हॉटेल मिलन', 'फसते फसते', 'उजदा चमन' आणि 'एक व्हिलन रिटर्न्स' यांसारख्या चित्रपटांसाठी ओळखली जाते.

वेब सीरिजमध्ये तिने 'रागिनी एमएमएस: रिटर्न्स', 'हम – आय एम बिज ऑफ अस' आणि 'फिक्सर' सारख्या शोमध्ये काम केले आहे. याशिवाय करिश्माने 'पवित्र रिश्ता', 'प्यार तूने क्या किया', 'ये है मोहब्बतें' आणि 'सिलसिला प्यार का' यांसारख्या अनेक लोकप्रिय टीव्ही मालिकांमध्येही काम केले आहे.

# करिष्माच्या मुलांनाही हवाय हिस्सा

प्रिया कपूरने संजय कपूर यांचे मृत्युपत्र नसल्याचा दावा केल्याचा आरोप मुलांनी केला आहे. त्यावेळी संजय कपूरची सर्व मालमत्ता आर. के. फॅमिली ट्रस्टच्या ताब्यात असल्याचं प्रियाने म्हटलं होतं. नंतर २१ मार्च २०२५ या तारखेला प्रियाने एक दस्तऐवज सादर केला, ते संजयचे मृत्युपत्र असल्याचा दावा प्रियाने केला, त्यामुळे ते बनावट असू शकतं, असा संशय मुलांनी व्यक्त केला आहे.



दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या तब्बल ३०,००० कोटी रुपयांच्या मालमत्तेवरील वादात एक नवीन ट्विस्ट आला आहे. बॉलीवूड अभिनेत्री करिश्मा कपूरच्या दोन्ही मुलांनी त्यांच्या संपत्तीतून वाटा मिळवण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. करिश्मा ही संजय यांची दुसरी पत्नी होती. संजय व करिश्माला समायरा व कियान ही दोन अपत्ये आहेत.

मात्र संजय कपूर यांच्या संपत्तीत फक्त करिष्मा कपूर आणि तिच्या दोन मुलांचाच दावा नाहीये तर त्याच्या अनेकांची दावेदारी आहे. दरम्यान, करिष्माच्या मुलांनी त्यांची सावत्र आई म्हणजे संजय कपूरची तिसरी पत्नी प्रिया कपूरने संजय कपूरच्या मृत्यूपत्रात फेरफार करत संपूर्ण संपत्तीवर ताबा मिळवल्याचा आरोप केला आहे. याबाबत न्यायालयात दावा देखील ठोकण्यात आला आहे.

करिष्मा कपूरची मुलं अजून अल्पवयीन असल्यानं त्यांच्या वतीनं करिष्मा ही लीगल गार्डियन म्हणून त्यांचं प्रतिनिधित्व करणार आहे. या मुलांनी संपत्तीचं वाटप करण्यात यावं अशी मागणी केली आहे. संजय कपूरची संपत्ती ही ३० हजार कोटी रूपयांच्या घरात असल्याचं सांगण्यात येत आहे. यामध्ये या मुलांना त्यांच्या वडिलांचे निधन होईपर्यंत त्यांच्या संपूर्ण संपत्तीची कोणतीही कल्पना नव्हती. त्यामुळं त्यांची किती संपत्ती होती याची माहिती मिळावी अशी देखील मागणी करण्यात आली आहे. करिष्माच्या मुलांनी सांगितलं की जोपर्यंत त्यांचे वडील जिवंत होते तोपर्यंत त्यांचं त्यांच्या वडिलांसोबत जवळचं नातं होत. ते कायम वडिलांकडे सुट्टीसाठी जात होते. ते त्यांच्या वैयक्तीक आयुष्यात सहभागी होत होते.

प्रिया कपूरने संजय कपूर यांचे मृत्युपत्र नसल्याचा दावा केल्याचा आरोप मुलांनी केला आहे. त्यावेळी संजय कपूरची सर्व मालमत्ता आर.के. फॅमिली ट्रस्टच्या ताब्यात असल्याचं प्रियाने म्हटलं होतं.

नंतर २१ मार्च २०२५ या तारखेला प्रियाने एक दस्तऐवज सादर केला, ते संजयचे मृत्युपत्र असल्याचा दावा प्रियाने केला, त्यामुळे ते बनावट असू शकतं, असा संशय मुलांनी व्यक्त केला आहे.

# अभिनेत्री नेहा पेंडसेचा ग्लॅमरस लुक

अभिनेत्री नेहा पेंडसेने मालिकासह चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. आपल्या अभिनय आणि डान्स शैलीच्या जोरावर तिने सिनेसृष्टीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'भाभी जी घर पर हैं' या मालिकेमुळे नेहाला मोठी प्रसिद्धी मिळाली आहे. नेहा पेंडसे बऱ्याचदा सोशल मीडियावरील ग्लॅमरस फोटोंमुळे चर्चेत येते. आता तिने बोल्ड



लूकमधील फोटो शेअर केले आहेत.

या फोटोशूटमध्ये नेहा पेंडसेने ऑफ शोल्डर व्हाइट रंगाचा वन पीस घातला आहे. यात तिने केस मोकळे सोडले आहेत आणि कानात गोल्डन रिंगचे इअररिंग्स घातले आहेत. नेहा पेंडसे या फोटोत खूपच बोल्ड आणि ग्लॅमरस दिसते आहे. तिच्या या फोटोंवर चाहत्यांसह कलाकारांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे.

नेहा पेंडसेने वयाच्या १० व्या वर्षी बालकलाकार म्हणून तिच्या करिअरची सुरुवात केली. तिने १९९५ मध्ये एकता कपूरच्या 'कॅप्टन हाऊस' या टीव्ही शोमध्ये काम केले होते. नेहाने हिंदी, मराठी, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम भाषेतील अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे.

१९९९ मध्ये 'प्यार कोई खेल नहीं' या हिंदी चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. 'मे आय कम इन मॅडम?' आणि 'भाभीजी घर पर है!' या हिंदी मालिकांमध्ये तिने मुख्य भूमिका साकारल्या आहेत. नेहा 'बिग बॉस १२' ची स्पर्धक देखील होती. नेहाने २०२० मध्ये शार्दुल ब्यास या उद्योगपतीसोबत लग्न केले. नेहा सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. इंस्टाग्रामवर तिचे लाखो फॉलोवर्स आहेत. ती नेहमीची आपले हॉट अँड ग्लॅमर्स फोटो-व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत अनेकांचे लक्ष वेधून घेते.

# महेश मांजरेकर यांचा 'पुन्हा शिवाजीराजे भोसले'

मराठीसह हिंदी सिनेविश्वात आपल्या सिनेमांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करणारे प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते म्हणजे महेश मांजरेकर. २००९ मध्ये प्रदर्शित झालेला त्यांचा 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' हा चित्रपट चांगलाच गाजला. आजही या चित्रपटाचा तेवढाच बोलबाला आहे. अशातच काही दिवसांपूर्वी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती.






येत्या दिवाळीत हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता, मात्र आता या सिनेमा येत्या दिवाळीत प्रदर्शित न होता काही महिने लांबणीवर गेला असून पुढील वर्षी म्हणजेच १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

या सिनेमाच्या लांबणीचे अधिकृत कारण अद्याप समोर आलेले नाही. 'पुन्हा शिवाजी राजे भोसले' या सिनेमामध्ये अभिनेता सिद्धार्थ बोडके, सयाजी शिंदे, त्रिशा ठोसर, भार्गव जगताप, विक्रम गायकवाड, मंगेश देसाई, शशांक शेंडे, संदीप जुवाटकर आणि इतर अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. 'पुन्हा शिवाजी राजे भोसले' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले असून, निर्मितीची धुरा राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध यांनी सांभाळली आहे, तर संगीत व पार्श्वसंगीताची जबाबदारी हितेश मोडककडे आहे. दरम्यान, 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' नंतर प्रेक्षकांना 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या सिक्वेलकडून खूप अपेक्षा आहेत. आजच्या काळात मराठी अस्मितेवर नव्याने भाष्य करणारा हा चित्रपट आता २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# मंडला मर्डर्स सिरीजचा प्लॉट नेमका कसा?

कथेचं केंद्रस्थान आहे 'चरंदासपूर'नावाचं उत्तर प्रदेशमधील एक गूढ आणि रहस्यमय गाव. या गावच्या वेशीवर एक घनदाट जंगल आहे आणि जंगलाच्या मधोमध एक अघोरी दैवी आणि वैज्ञानिक विचारांच्या सुशिक्षित महिलांचाएक गुप्त संप्रदाय 'Aayastis' चं एक स्थान पाहायला मिळते, या Aayastis ज्यांचं उद्दिष्ट आहे त्यांचा एक मृत देव 'Yast'ला पुन्हा जिवंत करणष्ठ यस्तचं पुनरुत्थान घडवणं. या सगळ्यामागे असतात श्रद्धा, हत्या, शरीराचे तुकडे, वरदान आणि त्या बदल्यातल बलिदानष्ठ एकामागून एक भयानक खून घडू लागतात, खुनांचा सिक्वेन्स एका मंडल मधे दडलेला असतोया प्रकरणाची चौकशी करायला येते ण्ँ्ऑफिसर्री ऊप्दर्र्े(वाणी कपूर) जी आपल्या भूतकाळाशी जोडलेली आहे. तिला वेगवेगळे भास होताना पाहायला मिळतात. ीं ला साथ देतो एक खटला उघड करणारा दिल्लीचा पोलिस विक्रम सिंग.

दोघं मिळून या हत्याकांड, पुरातन संप्रदाय आणि अंधश्रद्धेचं गूढ उलगडायला निघतात पण गोष्ट इतकी सोपी नाही! बरेच ट्विस्ट आहेत गोष्टी मागे गोष्ट दडलेली आहे ते सगळ या सिरीजमध्ये दडलेलं आहे.

**का पाहावी सिरीज?**

गूढ जग :अंधारलेलं गाव, रहस्यमय खून, आणि पुराण कथांवर आधारित सिरीजचा प्लॉट! वाणी कपूरचा दमदार परफॉर्मन्स, थरारक इन्वेस्टिगेशन्स आणि ट्विस्ट्स: कथा जसजशी पुढे जाते, तशी रहस्यं वाढतात उलघडतात. दृश्य रचना, पार्श्वसंगीत, गावाचं वातावरण, पुरातन चिन्हं, आणि एकंदरीत आर्ट डिपार्टमेंटच प्रभावी काम, यशराज फिल्म्सची the railway सह नंतरची दुसरी पैसा ओतलेली सिरीज, काय कमी? स्लो इन फास्ट आऊट, सिरीजची सुरुवात प्रचंड कंटाळवाणी आहे पाहिले तीन ते चार एपिसोड पाहिल्यानंतर तुमचा इंटरेस्ट वाढेल.


लेखक दिग्दर्शक गोपी पूथन साहेब सिरीजच्या गूढ पुराणातच एवढे रमलेत की रियल टाईम मधील ड्रामा नाटकी वाटतो कथेचे गांभीर्य ठराविक कलाकारांच्या अभिनयात दिसत काहींच्या नाही.


शेवटच्या दोन एपिसोडमध्ये घिसाड घाई करून उलघडून फटाफट सांगितलेली स्टोरी

मंडला मर्डर्स पाहावी का नाही ?जर तुम्हाला गूढ कथेवर आधारित थ्रिलर, आणि सस्पेन्स आवडत असेल आणि वेळ घालवण्यासाठी दुसर काही नसेल तर जास्त जजमेंटल न होता

ही सिरीज मानवी मानसशास्त्र, श्रद्धा, धर्म, आणि सत्य यामधील धूसर रेषा दाखवते सोबतच तुमच्या बुद्धीला चावी सुद्धा देते, विचार करायला लावते.

# 'मी माझ्या प्रत्येक चित्रपटाची मालकीण'





बॉलिवूड अभिनेत्री काजोल नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. कधी आपल्या चित्रपटामुळे तर कधी आपल्या वक्तव्यातून अभिनेत्री काजोल सर्वांचे लक्ष वेधून घेत असते. अभिनेत्री काजोलच्या 'द ट्रायल' या वेबसीरिजचा दुसरा सीझन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच अभिनेत्रीने आपल्या हिट आणि फ्लॉप चित्रपटासंदर्भात वक्तव्य केले आहे. त्यावेळी अभिनेत्री काजोल म्हणाली की, 'मी माझ्या प्रत्येक चित्रपटाची मालकीण आहे. ती कलाकृती हिट होऊ देत अथवा फ्लॉप'. आपल्या प्रत्येक कलाकृतीत काजोल १००ङ प्रतिसाद देत असते. 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' आणि 'कभी खुशी कभी गम'सारखे चित्रपट किंवा 'गुंडाराज' आणि 'हलचल'सारखे फ्लॉप चित्रपट असो. प्रत्येक चित्रपटात काजोलने जीव ओतून काम केले आहे.

# मूळव्याधीवर रामबाण घरगुती उपाय

मूळव्याध ग्रस्त व्यक्तीला उठणे आणि बसणे खूप त्रासदायक असते. या रोगात, लोकांना बर्याचदा तीव्र वेदना होतात आणि रक्तस्त्राव देखील होतो. वयाच्या पन्नाशीनंतर अनेकांना या समस्येचा सामना करावा लागतो. वास्तविक, मूळव्याधमुळे गुदद्वाराच्या रक्तवाहिन्या मोठ्या होतात, त्यामुळे जळजळ होण्याबरोबरच वेदनांच्या समस्येला सामोरे जावे लागते. मात्र, घरगुती उपायांच्या मदतीने तुम्ही मूळव्याध कमी करू शकता.



स्वयंपाकघरात मिळणाऱ्या हळदीमुळे मूळव्याधही दूर होतात. हळदीमध्ये असे अनेक औषधी गुणधर्म आहेत जे मूळव्याधमुळे होणाऱ्या समस्यांपासून आराम देतात. हळदीमध्ये दाहक-विरोधी, अँटिऑक्सिडंट, अँटीट्यूमर, अँटीसेप्टिक, अँटीव्हायरस, अँटी-बॅक्टेरियल, अँटीबायोटिक आणि अँटी-कार्सिनोजेनिक असे अनेक औषधी गुणधर्म आहेत. हळदीमुळे पचनक्रिया सुधारण्यासोबतच मुळव्याधच्या समस्येपासूनही आराम मिळतो.

मूळव्याध साठी हे उपाय करून पहा :-

हळद आणि कोरफड : अर्धा चमचा कोरफड एक चमचा हळद मिसळून प्रभावित भागावर लावल्यास मूळव्याधमध्ये खूप फायदा होतो. कोरफडीपासून बनवलेले पेन क्रीम वेदना कमी करण्याचे काम करते. त्यामुळे मूळव्याध झाल्यास ते हळद मिसळून वापरण्याचा सल्ला दिला जातो.

हळद आणि खोबरेल तेल : नारळाच्या तेलात दाहक-विरोधी गूळ असतो, म्हणून हळदीबरोबर मिसळल्यास ते मूळव्याध दरम्यान वेदना आणि सूज कमी करण्यासाठी प्रभावी आहे. एक चमचा हळदीमध्ये थोडे खोबरेल तेल मिसळून मिश्रण तयार करा आणि मूळव्याध झालेल्या भागावर लावा. काही तास ठेवा आणि नंतर धुवा.

हळद आणि कांदा : कांद्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात जे मूळव्याधातील वेदना आणि सूज टाळण्यास देखील मदत करतात. १ चमचे हळद अर्धा चमचा कांद्याचा रस आणि १-२ चमचे मोहरीच्या तेलात मिसळून मूळव्याध झालेल्या भागावर लावल्यास त्वरित आराम मिळतो. याशिवाय कांद्याचा रस चिमूटभर हळद मिसळून पिऊ शकता.

हळद आणि मोहरीचे तेल : मोहरीच्या तेलात हळद मिसळून प्रभावित भागावर लावल्यास मूळव्याधमुळे होणारा रक्तस्त्राव थांबण्यास मदत होते. हे हळद आणि मोहरीच्या तेलामध्ये असलेल्या दाहक-विरोधी औषधी गुणधर्मांमुळे असू शकते. मग काही लोक हळद आणि मोहरीच्या तेलाचे मिश्रण मूळव्याध भागावर लावतात आणि आराम मिळतो.

# गर्भवतींचे मूड स्विंग्ज

गरोदरपण हा स्त्रीच्या आयुष्यातील अतिशय नाजूक पण सुंदर टप्पा असतो. या काळात आई होण्याचा आनंद असला तरी, अनेक महिलांना हार्मोनल बदलांमुळे मानसिक आणि शारीरिक त्रासांचा सामना करावा लागतो. त्यात सर्वात सामान्य म्हणजे मूड स्विंग्ज. क्षणात आनंद, क्षणात रडू, चिडचिड, थकवा अशी मनःस्थिती. तज्ज्ञांच्या मते, हा अनुभव नैसर्गिक आहे आणि योग्य उपाययोजना केल्यास सहज सांभाळता येतात.

**मूड स्विंग्ज का होतात?**

तज्ज्ञ सांगतात की गर्भवतीच्या शरीरात इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन हे हार्मोन्स झपाट्याने वाढतात.

हे हार्मोन्स गर्भाच्या आरोग्यासाठी आवश्यक असले तरी, त्याचा थेट परिणाम झोपेवर व भावनिक संतुलनावर होतो.



पोटाचा वाढता आकार, पाठदुखी, वारंवार लघवी होणे, अपचन, पायांना सूज येणे या शारीरिक बदलांमुळे अस्वस्थता निर्माण होते. पहिल्यांदाच आई होणाऱ्या महिलांना बाळंतपणाची आणि बाळाच्या आरोग्याची चिंता भेडसावते.

आयुर्वेदानुसार गर्भधारणेत वात दोष वाढतो, तर दुसऱ्या तिमाहीत पित्त दोषही सक्रिय होतो. त्यामुळे निद्रानाश, चिडचिड, राग आणि थकवा वाढतो.

योग आणि प्राणायामाचे फायदे

योगतज्ज्ञांच्या मते, गर्भवतींनी हलकी योगासने आणि प्राणायाम केल्यास मूड स्विंग्जवर नियंत्रण मिळवता येते.

**वज्रासन** – जेवणानंतर ५-१० मिनिटे बसल्यास पचन सुधारते आणि झोपही चांगली लागते.

**भ्रामरी प्राणायाम** – चिंता, अस्वस्थता आणि चिडचिड कमी करण्यास उपयुक्त.

**मार्जरी आसन** – पाठीचा कणा लवचिक ठेवते, पाठदुखीपासून आराम देते.

जीवनशैलीत बदल गरजेचे

रात्री उशिरा जागरण टाळा; १० वाजेपर्यंत झोपणे उत्तम. मोबाईल, टीव्हीचा वापर कमी करा. निळा प्रकाश झोपेवर परिणाम करतो.

दररोज शांत वातावरणात फेरफटका मारा. शांत संगीत, मंत्र ऐकल्याने मन प्रसन्न राहते. आपल्या जवळच्या व्यक्तींशी संवाद साधल्याने मानसिक ताण कमी होतो.

**आयुर्वेदिक उपाय**

**तेल मालिश** – नारळ, मोहरी किंवा तीळ तेलाने डोकं व पाय मालिश केल्यास ताण कमी होतो, झोप सुधारते.

**शतावरी आणि अश्वगंधा** – मानसिक संतुलनासाठी उपयुक्त, परंतु फक्त डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच घ्यावेत.

**सात्विक आहार** – दूध, तूप, मूग डाळ, भाज्या, फळं आणि सुका मेवा गर्भवतीसाठी फायदेशीर. मसालेदार, तळलेले पदार्थ टाळावेत. गर्भवती महिलांमधील मूड स्विंग्ज ही अतिशय सामान्य बाब आहे.

# अळूच्या पानांचे अनोखे फायदे

भारतीय स्वयंपाकघरात पालेभाज्यांना नेहमीच विशेष स्थान मिळाले आहे. पालेभाज्यांमधील चव, पौष्टिकता आणि औषधी गुणधर्म यामुळे त्यांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते. यामध्ये अळूची पाने ही एक महत्त्वाची भाजी आहे. ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत या पानांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. महाराष्ट्रात तर अळूच्या पानांचे पकोडे, अळूवडी, पातळ भाजी आणि इतर पारंपरिक पदार्थ विशेष लोकप्रिय आहेत.

अळूच्या पानांमध्ये जीवनसत्त्व-ए, जीवनसत्त्व-सी, लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, प्रोटीन आणि भरपूर फायबर असते. शिवाय, अँटिऑक्सिडंट्सही मुबलक प्रमाणात असल्यामुळे शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो.

अळूच्या पानांचे प्रमुख आरोग्यदायी फायदे

१. रक्तदाब नियंत्रण

अळूची पाने पोटॅशियमने समृद्ध असतात. पोटॅशियम रक्तदाब कमी करण्यास मदत करते आणि हृदयाचे आरोग्य चांगले राखते. उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांनी आहारात या पानांचा समावेश केल्यास नैसर्गिकरित्या फायदा होऊ शकतो.

२. हाडे व दात मजबूत करणे

कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांचे हाडे मजबूत ठेवण्यास मदत करते. लहान मुलांच्या वाढीसाठी, वृद्धांच्या हाडांच्या आरोग्यासाठी ही भाजी उपयुक्त ठरते.

३. मधुमेहावर नियंत्रण

अळूची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. यामध्ये असलेले फायबर शुगर शोषणाची गती कमी करते. त्यामुळे डायबेटीस असणाऱ्यांसाठी ही भाजी सुरक्षित आणि आरोग्यदायी पर्याय आहे.

४. पचनक्रिया सुधारते

फायबरयुक्त असल्यामुळे ही पाने पचन सुधारतात. बद्धकोष्ठता दूर होऊन आतड्यांची हालचाल सुरळीत राहते. नियमित सेवन केल्यास पोट हलके वाटते आणि पचनशक्ती वाढते.

५. वजन नियंत्रणासाठी उपयुक्त



कमी कॅलरी आणि जास्त फायबरमुळे वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी अळूची पाने उत्तम पर्याय आहेत. ही भाजी खाल्ल्यावर दीर्घकाळ भूक लागत नाही, ज्यामुळे अति खाण्याची सवय कमी होते.

६. त्वचा व डोळ्यांचे आरोग्य

जीवनसत्त्व-ए डोळ्यांच्या दृष्टीसाठी फायदेशीर ठरते. नियमित सेवनाने डोळ्यांचे आजार टाळण्यास मदत होते. तसेच, अँटिऑक्सि डंट्समुळे त्वचा निरोगी, तरुण आणि चमकदार राहते.

७. रोगप्रतिकारशक्ती वाढवते

अळूच्या पानांतील जीवनसत्त्व-सी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. त्यामुळे सर्दी, खोकला यांसारख्या संसर्गजन्य आजारांपासून बचाव होतो.

अळूची पाने विविध प्रकारे वापरली जातात:

पारंपरिक पद्धतीने बनविलेले आणि लोकप्रिय असलेली अळूवडी.

पानांचे कुरकुरीत पकोडे

सूप किंवा पातळ रस्सा

स्मूदी आणि सॅलडमध्ये आधुनिक प्रकारे वापर

अनेक ठिकाणी अळूच्या पानांपासून खास सणावाराच्या पदार्थांचीही तयारी केली जाते.

वापरताना घ्यायची काळजी

काही वेळा अळूच्या पानांमध्ये कॅल्शियम ऑक्सलेट असते, ज्यामुळे जिभेला किंवा घशाला खाज येऊ शकते. म्हणून ही भाजी शिजवताना पुरेशी उकळणे आवश्यक आहे.

अति सेवन टाळावे, कारण त्यामुळे पोटदुखी किंवा गॅस होऊ शकतो.


ज्यांना ॲलर्जीचा त्रास आहे, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच सेवन करावे.

गर्भवती महिलांनी आहारात समावेश करण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घ्यावा.

अळूची पाने ही फक्त चवदार भाजी नाही तर आरोग्यासाठी एक नैसर्गिक औषध आहेत. रक्तदाब नियंत्रण, हाडांची मजबुती, पचन सुधारणा, वजन कमी करणे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणे यांसारखे अनेक फायदे या पानांमुळे मिळतात. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन केल्यास अळूची पाने प्रत्येकासाठी वरदान ठरतात.

**जगभरात वेगाने बदलणाऱ्या जीवनशैलीत आणि डिजिटल जगाच्या धावपळीत माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. याचाच गंभीर परिणाम म्हणून जागतिक आरोग्य संघटना ने नुकत्याच सादर केलेल्या अहवालात एकटेपणाचा वाढता धोका अधोरेखित केला आहे. या अहवालानुसार, जगातील ६ पैकी १ व्यक्ती एकटेपणाचा शिकार आहे, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होत आहे.**

# जगभरात वाढतेय एकटेपणाचे संकट



सामाजिक संपर्क आयोगाने केलेल्या जागतिक सर्वेक्षणात धक्कादायक निष्कर्ष समोर आले आहेत. १३ ते २९ वर्ष वयोगटातील १७ ते २१ टक्के तरुणांनी एकटेपण जाणवत असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, किशोरवयीन मुलांमध्ये ही समस्या सर्वाधिक आढळून आली.

निम्न उत्पन्न असलेल्या देशांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर असून, येथे २४ टक्के लोकांना एकटेपण जाणवतं, तर उच्च उत्पन्न असलेल्या देशांत ही टक्केवारी ११ आहे.

एकटेपणामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम

अभ्यासानुसार, एकटेपण हा फक्त मानसिक त्रास नसून तो अनेक घातक आजारांना कारणीभूत ठरतो.

मानसिक आजार- डिप्रेशन, चिंता, आत्महत्येचे विचार

झोपेच्या समस्या - अनिद्रा, स्मरणशक्ती कमी होणे

शारीरिक आजार- हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, स्ट्रोक

आयुष्याचा धोका- अकाल मृत्यूची शक्यता वाढतेडिजिटल जग- एकमेकांना जोडणं की दुरावा?

महासंचालक म्हणाले की, ‘या युगात जिथे माणसांना जोडण्यासाठी असंख्य मार्ग उपलब्ध आहेत, तिथेच अधिकाधिक लोकांना स्वतःला एकटं आणि वेगळं वाटत आहे.’

मानसोपचारतज्ज्ञांच्या मते, ‘तंत्रज्ञानाने जीवन बदलले आहे पण ते मानवी नातेसंबंध अधिक मजबूत करण्यासाठी वापरणं गरजेचं आहे. अन्यथा दीर्घकाळचा एकटेपणा मानसिक व शारीरिक आरोग्यास गंभीर धोक्यात टाकतो.’

एकटेपणातून बाहेर पडण्यासाठी उपाय

तज्ज्ञांच्या मते, एकटेपणा कमी करण्यासाठी दैनंदिन जीवनात छोटे-छोटे पाऊल उचलणं आवश्यक आहे.

मित्र, शेजारी किंवा सहकाऱ्यांशी संपर्क ठेवणं.

संवाद करताना मोबाईल बाजूला ठेवून प्रत्यक्ष संवाद साधणं.

स्थानिक गट, स्वयंसेवी संस्था, क्लब किंवा धार्मिक कार्यक्रमात सहभागी होणं.

नियमित व्यायाम, छंद जोपासणे आणि सामूहिक उपक्रमांचा भाग होणं.

परिस्थिती गंभीर असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणं.

सार्वजनिक जागांची महत्त्वपूर्ण भूमिका

अहवालात सार्वजनिक जागांच्या भूमिकेवर विशेष भर देण्यात आला आहे. उद्याने, शाळा, वाचनालये, सामुदायिक केंद्रे आणि धार्मिक स्थळे या ठिकाणी लोक परस्पर संवाद साधू शकतात, खेळ किंवा सांस्कृतिक उपक्रमांतून नाती घट्ट करू शकतात.

तज्ज्ञांचे मत आहे की, डिजिटल जग कितीही प्रगत झालं तरी समोरासमोर संवाद, आपलेपणा आणि भावनिक आधार हेच एकटेपणावरचं प्रभावी औषध आहे.

एकटेपण ही फक्त मानसिक समस्या नसून ती संपूर्ण आरोग्यावर परिणाम करते.

वेळेत पावले उचलली नाहीत तर ही समस्या समाज आणि अर्थव्यवस्थेसाठीही मोठा धोका ठरू शकते.

एकटेपण टाळण्यासाठी खास टिप्स

१. मित्र व कुटुंबाशी संपर्क ठेवा – फोनवर किंवा प्रत्यक्ष भेटून संवाद साधा.

२. डिजिटल वेळ कमी करा – सोशल मीडियाऐवजी समोरासमोर बोलण्याला प्राधान्य द्या.

३. छंद जोपासा – संगीत, वाचन, चित्रकला किंवा कोणताही आवडता छंद सुरू ठेवा.

४. स्थानिक गटात सामील व्हा – क्लब, स्वयंसेवी संस्था किंवा क्रीडा उपक्रमात सहभागी व्हा.

५. व्यायाम व योगा करा - शारीरिक कार्यामुळे मन आनंदी राहतं.

६. शेजाऱ्यांशी संवाद वाढवा -छोटं अभिवादनसुद्धा नातं मजबूत करतं.

७. तज्ज्ञांची मदत घ्या – एकटेपण गंभीर वाटल्यास मानसिक आरोग्य तज्ज्ञांशी बोला.

# रत्नागिरीत तिळाच्या शेतीचे क्षेत्र घट

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात पूर्वी भरभराटीत असलेली तिळाची शेती आता दुर्मिळ होत चालली आहे. औषधी गुणधर्म असलेल्या आणि अन्नतेल म्हणून वापरल्या जाणाऱ्या तिळाची शेती पूर्वी भात आणि नाचणीसोबत केली जायची. मात्र, आता ही परंपरा झपाट्याने लोप पावत असून, स्थानिक पातळीवर या शेतीच्या संवर्धनाची नितांत गरज भासत आहे.

पूर्वी ग्रामीण भागात तिळापासून तेल काढून अन्नात वापरण्याची पद्धत होती. हे तेल शुद्ध आणि गुणकारी समजले जाई. त्यामुळे शेतकरी घरातच तयार होणाऱ्या तेलामुळे स्वयंपूर्ण होते. सपाट भागावर तिळाचे झाडे फुलताना संपूर्ण परिसर पिवळसर फुलांनी सजलेला दिसे. आज मात्र तिळाची शेती हळूहळू मागे पडताना दिसत आहे. वाढते औद्योगीकरण, बदलते हवामान, आधुनिक शेतीच्या पद्धती आणि बाजारपेठेतील बदलते तांत्रिक निकष यामुळे या पारंपरिक शेतीचा ऱ्हास होत आहे. पूर्वी भातशेतीबरोबर पूरक शेती म्हणून केली जाणारी तिळाची लागवड आता जवळजवळ थांबली आहे.



शेतीच्या या प्रकाराचे जतन न झाल्यास ही परंपरा काळाच्या ओघात नामशेष होण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक प्रशासन, कृषी विभाग व स्वयंसेवी संस्थांनी याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. तिळाच्या शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या योजनांची आखणी करून शेतकऱ्यांना आर्थिक आणि तांत्रिक मदत दिल्यास ही शेती टिकवणे शक्य आहे. ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांचे जतन करत पारंपरिक शेतीचे संवर्धन करणे, ही काळाची गरज आहे.

# केक टिकावा म्हणून...

वाढदिवस साजरा करताना कधी-कधी मोठा केक आणला जातो. केक मोठा आणि माणसे कमी असतात. त्यामुळे बऱ्याचदा केक तसाच शिल्लक राहतो. जर केक खराब होऊ द्यायचा नसेल तर त्यासाठी काही सोप्या टिप्स आहेत. केक हवाबंद डब्यात ठेवल्यास त्यात हवा आणि ओलावा जाण्यास प्रतिबंध होतो, ज्यामुळे तो जास्त काळ ताजा राहतो.

केकचे थर थोडे उबदार असताना प्लॅस्टिक रॅपने गुंडाळा, त्यामुळे ओलावा टिकून राहतो. कापलेल्या कडा प्लॅस्टिक रॅपने घट्ट गुंडाळा. जर केक क्रीम फ्रॉस्टिंग, व्हीप्ड क्रीम, ताजी फळे किंवा दुधाचे पदार्थ असलेले असतील, तर ते खराब होऊ नयेत म्हणून लगेच रेफ्रिजरेटरमध्ये ठेवण्याची गरज आहे.



# घराच्या उत्तर दिशेला ठेवा या गोष्टी

घराची उत्तर दिशा ’या’ वस्तूंनी सजवल्यास होईल धनलाभ वास्तुशास्त्रानुसार, घराची उत्तर दिशा ही धन आणि समृद्धीची मानली जाते. कुबेर देवता आणि धनाची देवी लक्ष्मी यांचा वास या दिशेला असतो, असे मानले जाते. त्यामुळे, या दिशेची विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

उत्तर दिशेत ठेवा ‘या’ वस्तू:

कुबेर यंत्र: कुबेर यंत्र उत्तर दिशेत ठेवल्याने धन आकर्षित होते आणि घरात समृद्धी येते. गणपतीची मूर्ती: गणपतीची मूर्ती उत्तर दिशेत ठेवल्याने घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि सकारात्मकता येते. तुळशीचे रोप: उत्तर दिशेत तुळशीचे रोप लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा आणि शांतता टिकून राहते. पाण्याची व्यवस्था: या दिशेला पाण्याचा छोटासा कारंजा किंवा पाण्याची व्यवस्था करणे शुभ मानले जाते. यातून घरात आर्थिक प्रगती होते. हिरवीगार झाडे: छोटी हिरवीगार झाडे किंवा रोपटी या दिशेला ठेवल्याने घरात सुख-समृद्धी येते. उत्तर दिशेची काळजी: स्वच्छता: ही दिशा नेहमी स्वच्छ आणि नीटनेटकी ठेवा. येथे कचरा किंवा निरुपयोगी वस्तू ठेवू नका. जड वस्तू टाळा: या दिशेला जड फर्निचर किंवा इतर जड वस्तू ठेवू नका, कारण यामुळे सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह थांबतो. या उपायांचा वापर केल्यास घरात सुख, शांती आणि समृद्धी येईल, असे वास्तुशास्त्र सांगते.



# शैक्षणिक गळती

**देशातील शैक्षणिकदृष्ट्या आणि औद्योगिकदृष्ट्या सर्वात प्रगत राज्य मानल्या गेलेल्या महाराष्ट्र राज्याची शैक्षणिक परिस्थिती स्पष्ट करणारा एक अहवाल नुकताच जाहीर करण्यात आला. त्यातील काही निष्कर्ष निश्चितच चिंताजनक आहेत. गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्यात माध्यमिक स्तरावर म्हणजेच नववी आणि दहावी या स्तरावर शिक्षण सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले असल्याचे या अहवालात म्हटले आहे.**



आठवीनंतर नववी आणि दहावीला न बसता शिक्षणा लाच रामराम ठोकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण तब्बल साडेअकरा टक्के असल्यामुळे महाराष्ट्रासारख्या राज्यात शिक्षणतज्ज्ञांना आणि राज्य सरकारलाही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे १२.६३ विद्यार्थी आणि १०.३ टक्के विद्यार्थिनींनी आपले शिक्षण अर्धवट सोडल्याची धक्कादायक माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या यू-डायस प्लस या अहवालात देण्यात आली आहे.

एकीकडे केंद्रीय पातळीवर आणि राज्याच्या पातळीवरही शैक्षणिक स्तर सुधारण्यासाठी विविध प्रकारच्या योजनांचा भडिमार होत असताना अशा प्रकारे नववी आणि दहावीमध्येच विद्यार्थी शिक्षण सोडत असतील तर कोठेतरी काही चुकते आहे हे समजून घ्यावे लागणार आहे. शिक्षण हक्क कायदा, समग्र शिक्षण अभियान, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अशा अनेक प्रकारच्या योजना शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कार्यरत असल्या तरी त्या पुरेशा पडत नाहीत किंवा अंमलबजावणीत काहीतरी गडबड आहे असेच यू-डायसच्या अहवालावरून सिद्ध होत आहे. तब्बल आठ वर्षे शिक्षण घेतल्यानंतर ११३पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना नववी किंवा दहावीमध्ये शिक्षण का सोडावेसे वाटते याची कारणेही शोधणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्यात इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा पद्धती अस्तित्वात नसल्याने म्हणजेच परीक्षा घेऊन त्या मूल्यमापनाच्या आधारे विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात पाठवण्याची पद्धत अस्तित्वात नसल्याने नववी, दहावीत गेल्यानंतर ह्या परीक्षा पद्धतीचा बाऊ विद्यार्थ्यांना वाटत असावा. आठवीपर्यंत आपण सहजपणे एक एक पायरी चढत वर आलो आहोत पण नववीमध्ये किंवा दहावीमध्ये परीक्षा पास झाल्याशिवाय पुढे जाता येणार नाही ही भीती विद्यार्थ्यांच्या मनात तयार होत असल्यामुळे अनेकांनी शिक्षण अर्धवट सोडले असावे, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे विद्यार्थ्यांना आपल्या गावाजवळच शाळेची सोय उपलब्ध व्हायला हवी, असे जरी सांगण्यात येत असले तरी राज्यात तशी परिस्थिती नाही.

अनेक ठिकाणी माध्यमिक शिक्षणासाठी आपल्या गावापासून लांब शिक्षणासाठी जावे लागते. दुर्गम ठिकाणी असलेल्या प्रदेशांमध्ये नद्या ओलांडून आणि डोंगर-दऱ्या उतरून विद्यार्थ्यांना कसेतरी शाळेपर्यंत पोहोचावे लागते. दररोज अशा प्रकारची कसरत करणे अवघड असल्यामुळेही कदाचित अनेक विद्यार्थ्यांना शाळेत जावेसे वाटत नसावे. आठवीपर्यंत इतर सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे मूल्यमापन होणाऱ्या विद्यार्थ्यांना नववीमध्ये जेव्हा एखाद्या परीक्षेत नापास व्हावे लागते तेव्हा त्यांच्या मनामध्ये एखादा गंड तयार होऊन शिक्षणाबद्दल घृणा आणि भीती निर्माण होऊ शकते. याचा एकत्रित परिणाम म्हणूनच नववी आणि दहावीमध्ये विद्यार्थ्यांनी शाळा सोडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये उच्च शिक्षणाच्या अनेक सोयी उपलब्ध होत असतानाच माध्यमिक पातळीवर अशा प्रकारे शैक्षणिक गळती वाढत असेल तर त्या उच्च शिक्षणाचा नक्की फायदा कोणाला होणार आहे याचाही शोध घेण्याची गरज आहे. नववी किंवा दहावीमध्ये अशाप्रकारे शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना नंतर अंगमेहनत करूनच रोजगार मिळवावा लागतो. नंतरच्या आयुष्यामध्ये आर्थिक विकास होण्याची त्यांची शक्यता खूपच कमी होऊन जाते. ही परिस्थिती लक्षात घेऊनच आता सरकारला यू-डायसच्या अहवालात ज्या गोष्टी सूचित करण्यात आल्या आहेत त्याची गंभीर दखल घेऊन शिक्षणक्षेत्राला शिस्त लावण्याबाबत काही ठोस निर्णय घ्यावे लागणार आहेत.

अजूनही ग्रामीण भागामध्ये खासगी शिक्षण संस्थांपेक्षाही जिल्हा परिषदेच्या शाळा आणि काही प्रमाणात स्थानिक संस्थांच्या शाळांच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. त्या सोयी पुरेशा नसतात. विद्यार्थ्यांना आपल्या घराजवळ शिक्षण उपलब्ध करून देण्याचा आदर्श विचार मांडण्यात आला असला तरी तो अद्याप प्रत्यक्षात आलेला नाही. पण त्या दिशेने ठोस प्रयत्न मात्र करावे लागणार आहेत. देशात अनेक ठिकाणी दहावीनंतरच्या शैक्षणिक स्तरासाठी मुक्त विद्यापीठासारखे प्रयोग उपलब्ध आहेत.

याच प्रकारचे प्रयोग नववी, दहावीत शाळा सोडण्याची मानसिकता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आले, तर त्यांना घरबसल्या शिक्षण घेता येईल. महाराष्ट्राचे शिक्षण खाते, राज्यातील सर्व शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक संघटना यांनी एकत्रित विचार करून या समस्येवर तोडगा काढायला हवा. गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये साडेअकरा टक्केपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नववी, दहावीमध्ये शिक्षण सोडले आहे असेच नाही, तर गेल्या काही वर्षांमध्ये हे प्रमाण सातत्याने वाढत चालले आहे हे जास्त महत्त्वाचे आणि गंभीर आहे. शैक्षणिक गळतीची ही गंभीर समस्या संपवायची असेल, तर राज्य सरकारला आता प्राधान्याने उपाययोजना करावी लागणार आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अवकाश दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात आभासी पोर्टलवर बोलताना आर्यभट्ट ते गगनयानापर्यंतचा भारताचा इतिहास आत्मविश्वास आणि भविष्यातील संकल्पाचे दर्शन घडविणारा असल्याचे सांगितले. भारत अवकाशात नवीन खनिजांचा शोध घेण्यासाठी मोहीम पुढे नेणार आहे. या दृष्टिकोनातून भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्त्रो) 'इस्त्रो स्पेस रोडमॅप २०४०'देखील तयार केला आहे. भारताची स्वदेशी अवकाश प्रयोगशाळा अंतराळात स्थापन झाल्यास तो गेल्या साडेसात दशकांतील अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरेल.**

# 'इस्त्रो स्पेस रोडमॅप २०४०'



श्रीनिवास औधकर

भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्थेने दिल्लीतील भारत मंडपम येथे नुकतेच भारतीय अंतरिक्ष स्थानकाचा पहिला नमुना म्हणजेच 'बीएएस-०१'चे मॉडेल प्रदर्शित केले. हा क्षण अवकाश संशोधनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा होताच; पण त्याचबरोबर तो भारताच्या स्वावलंबी अंतरिक्ष युगाचा प्रारंभ बिंदू म्हणूनही नोंदला जाणार आहे. येत्या २०२८ पर्यंत पहिले मॉडयूल प्रक्षेपित करण्याचे निश्चित लक्ष्य इस्त्रोने ठेवले असून २०३५ पर्यंत एकूण पाच मॉडयूल अंतरिक्षात पाठवण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

सद्यस्थितीत अंतराळात केवळ दोनच प्रयोगशाळा आहेत. एक म्हणजे पाच देशांच्या संयुक्त प्रयत्नातून चालवले जाणारे आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष स्थानक आणि चीनचे तियांगोंग स्थानक. या दोन प्रयोगशाळांबरोबर भारताची स्वतःची प्रयोगशाळा अंतरिक्षात स्थिरावणार आहे. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी डिसेंबर २०२४ मध्येच जाहीर केले होते की, भारत २०३५ पर्यंत आपले अंतरिक्ष स्थानक उभारेल आणि २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीराला चंद्रावर पाठवेल. हा केवळ वैज्ञानिक कार्यक्रम नसून राष्ट्रीय आत्मनिर्भरतेचा प्रकल्प आहे.

भारताने अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात गेल्या दशकभरात नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या अथक परिश्रमांतून भारताने साकारलेल्या मोहिमांनी जगाला आश्चर्यचकित केले आहे. चंद्र आणि मंगळावर भारताने आधीच दस्तक दिली आहे. आता सूर्याच्या कक्षेतील अभ्यास सुरू आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाण्याचा सर्वप्रथम शोध भारतानेच लावला आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आता भारत अवकाशात नवीन खनिजांचा शोध घेण्यासाठी मोहीम पुढे नेणार आहे. या दृष्टिकोनातून भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्त्रो) 'इस्त्रो स्पेस रोडमॅप २०४०'देखील तयार केला आहे. हा उपक्रम केवळ भारताच्या अवकाशासंबंधीची महत्त्वाकांक्षा सांगणारा नसून आगामी काळात जागतिक स्तरावर आघाडी घेत अवकाश संस्थांच्या रांगेत पुढे राहण्याचा संकल्प यातून प्रतिबिंबित होत आहे.

भारतीय अंतराळ स्थानकाचा उपयोग जीवन विज्ञान, वैद्यक, ग्रह संशोधन तसेच सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात होणारे परिणाम जाणून घेण्यासाठी होणार आहे. मानवाच्या प्रकृतीत अंतरिक्षातील दीर्घ वास्तव्यात कोणते बदल होतात, त्यावर कोणते उपचार प्रकार उपयुक्त ठरू शकतात, याचा सखोल अभ्यास होईल. या प्रयोगातून दीर्घ पल्ल्याच्या अंतराळ मोहिमांसाठी भक्कम आधार तयार होईल. स्वदेशी अवकाश प्रयोगशाळा स्थापन झाल्यास तो भारताच्या अवकाश कार्यक्रमातील माईलस्टोन ठरणार आहे.

२०४० पर्यंत भारत चंद्रावरून माती आणि दगडाचे नमुने आणण्याच्या दृष्टिकोनातून काम करत आहे. या रोडमॅपमध्ये 'चांद्रयान ४', डीपस्पेस मिशन आणि नेक्स्ट जनरेशन लाँचरसारख्या (एनजीएल) महत्त्वाकांक्षी योजनांचा समावेश आहे. अवकाश संशोधनातील यश भारताला जागतिक अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात आघाडीचे स्थान मिळवून देऊ शकते. 'चांद्रयान-३'च्या यशस्वी प्रक्षेपणानंतर चंद्रावर पाण्याचा आणि खनिजांचा शोध घेण्यासाठी सातत्याने काम केले जात आहे.

या ठिकाणी पाण्याबरोबर अग्नीचादेखील शोध घेतला जाणार आहे. अग्नी आणि पाण्याचे पुरावे सापडत असतील तर चंद्रावर मनुष्यप्राणी असल्याच्या आशा पल्लवित होतील.

प्रत्यक्षात आताच्या काळात चंद्र अणि मंगळाबरोबरच अन्य मोहिमाही भविष्यातील जागतिक रणनीतीसाठी महत्त्वाचे माध्यम बनल्या आहेत. भविष्यातील अर्थकारण याच माध्यमातून निश्चित होणार आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अतार्किक भाषणावरून आणि शुल्काच्या बंधनावरून भारत अणि अमेरिका यांच्यातील संबंध ताणलेले आहेत. रशियाकडून तेल खरेदी केल्यावरूनही ट्रम्प आणि मोदी यांच्यात तणाव निर्माण झाला आहे.

अशा वेळी भारत अमेरिकेला बाजूला ठेवत रशिया किंवा चीनसह चंद्रावर आण्विक ऊर्जा प्रकल्पाची स्थापना करण्याची शक्यता बळावली आहे. कारण आता चांद्र मोहीम ही केवळ विज्ञान स्पर्धा राहिलेली नसून ती भविष्यातील रणनीतीचा भाग ठरताना दिसत आहे. प्रत्यक्षात भारताने २०२३ मध्ये 'चांद्रयान' अभियानाच्या माध्यमातून दक्षिण ध्रुवावर रोव्हर उतरवून स्वतःची क्षमता सिद्ध केली आहे. आता चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पायाभूत व्यवस्थेची आखणी कोण करेल, याबाबत उत्सुकता लागली आहे. कारण या ठिकाणी पाणी किंवा खनिजांचा शोध घेण्यासाठी व्यापक प्रमाणात ऊर्जा लागणार आहे. या ऊर्जेसाठी एकमेव साधन म्हणजे आण्विक ऊर्जा. भविष्यात चंद्र असो किंवा अन्य ग्रहापर्यंतचा प्रवास करण्यासाठी आण्विक ऊर्जा हा महत्त्वाचा आधार राहू शकतो. अमेरिकेने २०३० पर्यंत चंद्रावर १०० किलोवॉट क्षमतेचे न्यूक्लिअर रिॲक्टर स्थापन करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. त्याच वेळी चीन आणि रशियाने २०३५ पर्यंत निम्म्या मेगावॉटचे रिॲक्टर तयार करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

प्रत्यक्षात रशियाची आण्विक ऊर्जा संस्था रोसाटॉमच्या दाव्यानुसार भारत आंतरराष्ट्रीय चांद्र संशोधन संस्थेच्या (आयएलआरएस) प्रकल्पात सहभागी होण्याबाबत उत्सुक आहे. त्यात चीनदेखील आहे. अर्थात भारताने यासंदर्भात अधिकृत घोषणा केलेली नाही, परंतु बदलत्या भूराजकीय समीकरणात रशियाचा दावा नाकारणेदेखील कठीण आहे. अमेरिकेबरोबरच तणाव आणि भारत आणि चीन यांच्या संबंधांतील सुधारणा पाहता नवीन पर्याय खुला होताना दिसतोय, परंतु तो आव्हानात्मक आहे. अमेरिकेशी मर्यादित प्रमाणात द्विपक्षीय संबंध ठेवायचे की रशिया आणि चीनसोबत काम करत आण्विक ऊर्जेच्या क्षेत्रात वाटचाल करायची आहे, हे भारताला ठरवावे लागणार आहे. दोन्ही मार्गांवर संधी आणि धोका आहे.

## म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक घटली

**भार**तात म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. दरमहा एसआयपीच्या माध्यमातून म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक केली जाते. जुलैमध्ये इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये विक्रमी गुंतवणूक झाली होती. ऑगस्ट महिन्यातील म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीची आकडेवारी समोर आली आहे. त्या आकडेवारीनुसार ऑगस्ट महिन्यात इक्विटी म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक २२ टक्क्यांनी घटून ३३४३० कोटी रुपयांवर आली आहे. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड इन इंडियाकडून आकडेवारी जारी करण्यात आली आहे. ऑगस्ट महिन्यात एसआयपी इन्फ्लो देखील घटला आहे. जुलै महिन्यात एसआयपीद्वारे २८४६४ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. तर, एसआयपीद्वारे २८२६५ कोटी रुपयांची गुंतवणूक एसआयपीद्वारे झाली आहे.

इक्विटी फंड कॅटेगरीत ऑगस्ट महिन्यात फ्लेक्सी कॅप फंडमध्ये ७६७९ कोटी रुपयांचा इनफ्लो आला. यानंतर मिडकॅप फंडमध्ये ५३३० कोटी रुपयांचा इन्फ्लो आला.

ईएलएसएस मध्ये ५९ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. ऑगस्ट महिन्यात लार्ज कॅप फंडमध्ये २८३५ कोटी, स्मॉल कॅफ फंडमध्ये ४९९३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली.

तर, सेक्टरल आणि थीमॅटिक फंडमध्ये ३८९३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. दुसरीकडे न्यू फंड ऑफर मधील गुंतवणूक घटली आहे. ऑगस्ट महिन्यात २३ नवे फंड लाँच झाले. त्या माध्यमातून फंडने २८५९ कोटी रुपये कमावले.

ओपन एंडेड डेट फंडसमध्ये ७९८० कोटी रुपयांची गुंतवणूक ऑगस्ट महिन्यात झाली. भारतातील म्युच्युअल फंड इंडस्ट्रीत ऑगस्ट महिन्यात एकूण ५२४४३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली.

जुलै महिन्यात १.८ लाख कोटी रुपये आले होते. ऑगस्ट महिन्याच्या शेवटी असेट अंडर मॅनेजमेंटची रक्कम ७५.२ लाख कोटी रुपये झाली आहे.



# उत्तर भारतातील पावसाचा हाहाकार

हवामान खात्याकडून हवामानाचा दोनदा अंदाज जारी केला जातो. पहिला एप्रिल महिन्यात आणि दुसरा आकडेवारीत सुधारणा करत मे महिन्यात. या वर्षी दोन्ही वेळा हवामान खात्याने सामान्य पावसाच्या तुलनेत १०४ ते १०६ टक्के अधिक पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविला. यंदा अधिक पाऊस पडण्यामागचे कारण म्हणजे बंगालच्या उपसागरात निर्माण होणारे दबाव क्षेत्र आणि दुसरे म्हणजे प्रशांत महासागरात निर्माण होणारा उष्णकटिबंधीय चक्रीवादळाचा प्रवास. परिणामी उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, पंजाब, एवढेच नाही तर उत्तर पाकिस्तानातही पावसाने हाहाकार माजविला आहे.

उत्तर आणि पश्चिम भारतात सध्या सतत पाऊस आणि महापुराने थैमान घातले आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-कश्मीर, लडाख, पंजाबसारख्या अनेक राज्यांत सलग चार आठवड्यांपासून पाऊस पडत असून तो सामान्यापेक्षा अधिक आहे. हवामान खात्याने आणखी काही दिवस पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या वर्षीचा पाऊस उत्तम असला तरी काही ठिकाणी तो बेहाल करणारा ठरत आहे. यामागे कारणे बरीच असली तरी सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे मानवी हस्तक्षेप.

भारतात दोन प्रकाराने पावसाचे आगमन होते आणि हे दोन्ही घटक सध्या सक्रिय आहेत. एक तर बंगालच्या उपसागरात निर्माण होणारे दबाव क्षेत्र आणि दुसरे म्हणजे प्रशांत महासागरात निर्माण होणारा उष्णकटिबंधीय चक्रीवादळाचा प्रवास. परिणामी उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-कश्मीर, पंजाब, एवढेच नाही तर उत्तर पाकिस्तानातही पावसाने हाहाकार माजविला आहे. असंख्य नागरिक मृत्युमुखी पडल्याच्या बातम्या येत आहेत.

या वर्षी उत्तर भारतातील नद्यांमध्ये स्थानिक पातळीवर पडणा?या पावसाचे पाणी मिसळत असताना वरच्या भागातील पश्चिम तिबेटमध्येही जोरदार पाऊस पडत आहे. या भागात सिंधू नदीचे पात्र आहे. या कारणामुळे सिंधू नदीच्या पात्राभोवती असलेल्या भागात महापुराची स्थिती निर्माण झाली आहे. गंगा आणि यमुना यांच्या उपनद्यांची देखील हीच स्थिती आहे. आता तर निम्न दबावाचे क्षेत्र पश्चिमेकडे वाटचाल करत असल्याने गुजरात आणि राजस्थानसारख्या भागातही मुसळधार पाऊस पडताना दिसत आहे. एवढेच नाही तर ८ आणि ९ सप्टेंबर रोजी बंगालच्या उपसागरात आणखी एक निम्न दबावाचे क्षेत्र निर्माण होणार आहे आणि तेथेही पावसाचा तडाखा बसणार आहे. याचाच अर्थ पुढील काही दिवस पावसापासून सुटका नाही असे दिसते.

अडचणीची बाब म्हणजे हवामान बदलाचीदेखील त्याला साथ मिळत आहे. या कारणामुळे पावसाचे प्रमाण आणि तीव्रता वाढलेली आहे. प्रत्यक्षात जागतिक तापमानात एक टक्का वाढ होत असेल तर वातावरणातील आर्द्रता शोषून घेण्याचा दर सात टक्क्यांपर्यंत वाढतो. सध्या ग्लोबल वॉर्मिंग दीड अंश सेल्सिअस अंशापर्यंत पोचला आहे. याचाच अर्थ वातावरणात पाणी थांबण्याची क्षमता ही अगोदरच दहा टक्क्यांनी वाढली आहे. यावर अडचणीची बाब म्हणजे हिमाचल, उत्तराखंडसारख्या पर्वतीय राज्यांत दोन ते तीन अंशांपर्यंत तापमान वाढले आहे आणि म्हणूनच तेथील वातावरणातील आर्द्रता १५ ते २० टक्क्यांनी वाढलेली आहे. अर्थात वातावरणातील आर्द्रता प्रचंड पावसामुळे वाढत आहे आणि कधी कधी ढगफुटीच्या घटना घडत आहेत.

पर्वतरांगेतील अनियोजित विकास कामे हे नुकसानीचे प्रमाण वाढवत आहे. उदा. हिमालयाच्या स्थितीत बदल घडवून आणणारे जलविद्युत केंद्र, साठवण तलावांची निर्मिती, खाण उत्खनन, बोगद्यांची निर्मिती, स्फोटकांचा सततचा वापर यामुळे पर्वतात ठिसूळपणा वाढत चालला आहे. या कारणामुळे मुसळधार पाऊस पडताच डोंगर खचण्यास सुरुवात होते. गेल्या तीन चार वर्षांत नुकसानीचे प्रमाण वाढले आहे. तरीही आपण आवश्यक उपाय करताना दिसत नाहीत आणि त्यामुळे प्राणहानी आणि वित्तहानीत वर्षागणिक वाढ होत आहे.

दुसरीकडे सखल भागातही अडचणींचा डोंगर आहेच. गुरुग्राम येथील महाकोंडीची चर्चा दोन तीन दिवस माध्यमांत होती. सखल भागात पाणी साचत असल्याने पाच सेंटीमीटर पाऊसदेखील गुडघाभर पाणी साचण्यास पुरेसा आहे. सर्व रस्ते जलमय होतात आणि वाहनांच्या रांगा लागतात, अन्यथा काही ठिकाणी वाहने तरंगताना दिसतात. यामागचे प्रमुख कारण म्हणजे पावसाचे पाणी जाण्यासाठी मार्गच राहिलेला नाही. नाल्यावर बांधकामे उभी राहिल्याने रस्त्यांचे पाणी पुरेशा प्रमाणात वाहून जाताना दिसत नाही. त्यामुळे अर्धा तासभर मुसळधार पाऊस पडला की पाणी जमा होऊ लागते. हे चित्र देशातील बहुतांश मेट्रो शहरात पाहावयास मिळत आहे.

काहीजण केरळबाबत बोलताना मॉन्सुनची एंट्री आणि एक्झीटच्या वेळी या राज्याला बरेच काही भोगावे लागते, असे म्हणतात. परंतु तेथे पाणी साचल्याच्या बातम्या का येत नाहीत? असा प्रश्न करतात. केरळ पश्चिम घाटावर असून तेथे तत्काळ पाणी वाहून जाते. अर्थात २०१८ मध्ये तेथेदेखील महापूर आला, पण त्याचे कारण धरणात अडवून ठेवलेले पाणी अचानक सोडण्याचे होते. या घटनेनंतर केरळ सरकार ताकही फुंकून पित आहे. तेथे आता अचानक पाणी सोडले जात नाही. टप्प्याटप्प्याने धरणातून विसर्ग होतो, जेणेकरून शहरावर दबाव वाढणार नाही.

मग शेवटी यावर तोडगा काय? असा प्रश्न राहतो. धरालीच्या घटनेचा संदर्भ घेत या प्रश्नाचे गांभीर्य समजून घेऊ. प्रत्यक्षात एक महिन्यापूर्वी उत्तराखंडच्या धराली भागात ढगफुटीची घटना घडली आणि खीरगंगा नदीतील महापुराने परिसराची अपरिमित हानी केली. विशेष म्हणजे या नदीत गेल्या चार पाच दशकांपासून पाणीच आले नव्हते आणि त्यामुळे त्याच्या उदरात बिनदिक्कत बांधकाम झाले होते. नदीपात्र अरुंद झाले होते. तेथे बाजारपेठच वसविली होती. पण हा भाग जोखमीचा होता. परिणामी जेव्हा नदीने अक्राळविक्राळ रूप धारण केले तेव्हा सर्वांनाच ती सोबत घेऊन गेली. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे प्रत्येक भागात बांधकाम करायचे असेल तर तेथील जोखमीचे आकलन करणे गरजेचे आहे. लोकांना पूररेषा सांगणे आवश्यक असून यानुसार ते पावसाळ्यात सजग राहतील. बँका आणि आर्थिक संस्थांनी देखील अशा भागात बांधकामासाठी कर्ज देताना विचार करावा, जेणेकरून संवेदनशील भागातील बांधकामांना वेळीच चाप बसेल. तरीही काही जण बांधकाम करत असतील तर त्यांना नोटिसा बजावून धोक्याची सूचना द्यायला हवी आणि त्यांना वेळेत बाहेर कसे काढता येईल, याचे नियोजन करायला हवे. या उपायातून मनुष्यहानी होणार नाही.